सप्टेंबर २०१७ / पाने ७६ / किंमत ₹ १०

# लोकराज्य




## आपले जिल्हे विकासाची केंद्रे

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

सत्यमेव जयते

प्रधान मंत्री आवास योजना-नागरी
Pradhan Mantri Awas Yojana -URBAN

म्हाडा MHADA



श्री.नरेंद्र मोदी, मा.प्रधानमंत्री

जुन्या वसाहतींना देऊ नवीन आकार, स्वप्नातील घरं होतील साकार...

मुंबई शहर व उपनगरातील
म्हाडा वसाहतींमधील

# जुन्या इमारतींचा पुनर्विकास होणार गतिमान व सुलभ



**माननीय मुख्यमंत्र्यांचा लोकाभिमुख निर्णय!**

३३ (५) च्या अधिसूचनेची प्रमुख वैशिष्टये :

४००० चौ. मी. पेक्षा कमी क्षेत्राच्या भूखंडावरील इमारतींचा ३ च.क्षे.नि. अन्वये अधिमूल्य आधारित पुनर्विकास शक्य

म्हाडाच्या १०४ अभिन्यासातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासास गती

४००० चौ.मी. पेक्षा मोठया क्षेत्रफळाच्या व १८ मीटर रुंदीच्या रस्त्यालगत असलेल्या भूखंडावरील इमारतींच्या पुनर्विकासास ४ च.क्षे.नि. अनुज्ञेय.
पैकी ३ च.क्षे.नि.चे वितरण अधिमूल्य आधारित व १ च.क्षे.नि.चा म्हाडास गृहसाठा उपलब्ध होणार

किमान ३५ चौ.मी.
चटई क्षेत्रफळाची पुनर्वसन सदनिका



श्री. देवेंद्र फडणवीस मा. मुख्यमंत्री

अधिक माहितीकरिता- https://mhada.maharashtra.gov.in

# अंतरंग

## ६ स्मार्ट आणि सुरक्षित




पायाभूत सुविधांच्या विकासासोबतच नागपूर मेट्रो प्रकल्प, आयआयएम, एम्स, आयआयआयटी यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था नागपूरमध्ये होत असलेल्या सकारात्मक परिवर्तनांची नांदी ठरत आहेत.

## २० परिपूर्ण आणि समतोल



अमरावती जिल्ह्यात औद्योगिक व कृषी विकासासाठी शासनाने अनेक पावले उचलली आहेत. त्यामुळे सिंचन आणि आरोग्य सुविधांबरोबरच कृषी, आदिवासी विकास, पर्यटन, उद्योग, रोजगारनिर्मिती अशा विविध क्षेत्रात चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

## ४२ विस्तारलेले रस्ते...



सुरक्षित, आरोग्यदायी, दुर्घटनाविरहित, पर्यावरणपूरक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनाचे जगभरात कौतुक झाले. या महासोहळ्याच्या निमित्त नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.

## ३५ सुविधा आणि सुव्यवस्था

जगभरात औरंगाबादचे नाव अजिंठा, वेरुळ लेण्यांमुळे प्रसिद्ध आहे. पूर्वीपासूनच जिल्ह्याला वेगळी ओळख निर्माण झाली आहे. गेल्या तीन वर्षात जिल्ह्याची सर्वच क्षेत्रात प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे.



## ५२ सुबक आणि सुंदर

पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी म्हणून वेगळी ओळख आहे. गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत माहिती तंत्रज्ञान आणि ऑटोमोबाइलचे स्टार्टअप हब म्हणून जिल्हा विकसित झाला आहे. सरकारने राबवलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून पुणे हे विकासाचे नवे स्मार्ट मॉडेल म्हणून विकसित होत आहे.



## ६९ वेगवान महामुंबई

मागील ३ वर्षात मुंबईच्या गतिमान विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मेट्रो टप्पा ३ चे काम वेगाने सुरू आहे. शहरातील अंतर्गत रस्ते अधिक चांगले करण्यात येत आहेत. कोस्टल रोडचा प्रकल्प मार्गी लागण्याच्या टप्प्यात आला आहे. सीसीटीव्हीचा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे.





| | |
|---|---|
| स्मार्ट आणि सुरक्षित (नागपूर) | ६ |
| नवी दिशा (वर्धा) | १२ |
| गतिमानतेला आधुनिकतेची जोड (चंद्रपूर) | १४ |
| जलसमृद्धी (भंडारा) | १६ |
| स्थैर्याकडून संपन्नतेकडे... (गडचिरोली) | १८ |
| रोजगाराचा आधारवड (गोंदिया) | १९ |
| परिपूर्ण आणि समतोल (अमरावती) | २० |
| सन्मान आणि समाधान (यवतमाळ) | २२ |
| संकल्पसिद्धी (अकोला) | २४ |
| सिंचन प्रकल्प पूर्णत्वाकडे... (वाशिम) | २५ |
| उत्कर्ष आणि उन्नती (बुलडाणा) | २७ |
| उज्ज्वल 'उडान' (नांदेड) | २९ |
| समृद्ध आघाडी (लातूर) | ३१ |
| उमेद आणि चेतना (उस्मानाबाद) | ३२ |
| टँकरमुक्ती (हिंगोली) | ३४ |
| सुविधा आणि सुव्यवस्था (औरंगाबाद) | ३५ |
| संधी आणि साहाय्य (परभणी) | ३७ |
| चौफेर गतिमानता (जालना) | ३९ |
| अग्रेसर (बीड) | ४१ |
| विस्तारलेले रस्ते... (नाशिक) | ४२ |
| शिवार भरले, शेतकरी आनंदला... (अहमदनगर) | ४४ |
| घरकुलात आघाडी (धुळे) | ४६ |
| सिंचन क्षमतेत वाढ (जळगाव) | ४८ |
| पर्यटनातून परिपूर्णतेकडे... (नंदूरबार) | ४९ |
| आदर्श पुनर्वसन (सातारा) | ५१ |
| सुबक आणि सुंदर (पुणे) | ५२ |
| पाऊल पडते पुढे... (सोलापूर) | ५४ |
| पर्व प्रगतीचे... (सिंधुदुर्ग) | ५६ |
| पुरोगामी आणि उपक्रमशील (कोल्हापूर) | ५८ |
| लोकाभिमुख आणि गतिमान (सांगली) | ६० |
| कुशल मुद्रा (ठाणे) | ६२ |
| सेवा आणि सुविधा (रायगड) | ६४ |
| स्वच्छतेतून समृद्धीकडे... (पालघर) | ६६ |
| फळबाग फुलली... (रत्नागिरी) | ६८ |
| वेगवान महामुंबई (मुंबई) | ६९ |
| सामाजिक न्यायाच्या दिशेने | ७२ |
| येथे कर माझे जुळती... | ७४ |

वर्ष ६९ वे | अंक ३ | सप्टेंबर २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

**प्रशासन**

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

**मांडणी**

- मुखपृष्ठ — मनीषा अडसुळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in



# 'सप्तमुक्ती'चा संकल्प

देशाला बलशाली करण्यासाठी दुष्काळापासून मुक्ती, शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्ती, प्रदूषणापासून मुक्ती, भ्रष्टाचारापासून मुक्ती, करजंजाळ मुक्ती, अस्वच्छतेपासून मुक्ती, बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्ती अशा 'सप्तमुक्ती'चा संकल्प केला पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर एक मोठा बदल किंवा परिवर्तन देशामध्ये घडताना दिसत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून नवभारताची संकल्पना मांडण्यात येत आहे. २०२२ साली देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यास अनुसरुन येत्या ५ वर्षात प्रत्येक नागरिकाला नवभारताच्या निर्मितीसाठी योगदान द्यावयाचे आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता कर्जमाफी जाहीर केली. ८९ लाख शेतकऱ्यांना ३४ हजार कोटींची कर्जमाफी मिळणार आहे. मात्र, कर्जमुक्ती हेच आपले उद्दिष्ट आहे. त्यासाठी शेतीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून शेती क्षेत्राचा शाश्वत विकास करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग तसेच सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्तीद्वारे ६०५ अभ्यासक्रमांसाठी सर्व प्रवर्गातील आर्थिक मागासवर्गीयांना सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे विद्यार्थी यांच्याकरिता निवासाची व्यवस्था व्हावी, वसतिगृहात जागा मिळाली नसल्याने खासगी वसतिगृहात राहिल्यास जेवणाची व्यवस्था व इतर बाबींसाठी ७ हजार रुपयांची मदत त्यांना शासनाकडून देण्यात येते. 'सर्वांसाठी घरे' या योजनेंतर्गत ३ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्याची सुरुवात करण्यात आली आहे. येत्या काळात ग्रामीण भागात १२ लाख घरे आणि शहरी भागात १० लाख घरे बांधली जातील. २०१९ पर्यंत राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या बेघरांना घर देण्याचा संकल्प शासनाने केला आहे.


महिलांना सुरक्षितता मिळावी यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना शासनाने केल्या आहेत. विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. युवकांना रोजगार देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. गेल्यावर्षी संपूर्ण देशामध्ये जेवढी परकीय गुंतवणूक आली, त्यापैकी ५० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली. राज्यामध्ये इतर मागासवर्गीयांसाठी वेगळा मंत्रालयीन विभाग निर्माण करून या घटकाच्या कल्याणाकरिता विविध योजना सुरू केल्या आहेत.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

# दिशा आणि गती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राची वाटचाल नवनिर्माणाच्या दिशेने झपाट्याने सुरू आहे. गेल्या तीन वर्षात अनेक नावीन्यपूर्ण योजनांचा शुभारंभ राज्यात झाला. वैशिष्ट्यपूर्ण निर्णय घेण्यात आले. या निर्णयांची अंमलबजावणी प्रभावीरीत्या सुरू झाली. त्यामुळे आज महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलला आहे.

जलयुक्त शिवार योजना, आपले सरकार, स्वच्छता अभियान, वृक्षलागवड मोहीम, स्मार्ट सिटी योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, मेट्रो प्रकल्प, आरोग्य योजना, डिजिटल महाराष्ट्र, विविध महामार्ग, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत ३४ हजार कोटींची कर्जमाफी अशा अनेक योजनांमुळे ग्रामीण व नागरी भागातील नागरिकांना दिलासा मिळत आहे. विकासकामांचे नवे नवे प्रकल्प सुरू झाले असून बरेच प्रकल्प पूर्णत्वासही जात आहेत.




मुख्यमंत्र्यांच्या सोबतच प्रत्येक जिल्ह्यांचे पालकमंत्री आपल्या जिल्ह्यांचा सर्वांगीण व परिपूर्ण विकास व्हावा यासाठी प्रयत्नशील आहेत. राज्यस्तरीय सर्व प्रमुख योजना आपल्या जिल्ह्यामध्ये अधिकाधिक प्रभावशाली पद्धतीने राबवण्यावर पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखालील सर्व जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे बहुतेक सर्व जिल्ह्यांमध्ये विविध प्रकारच्या विकास कामांना सूत्रबद्धरीत्या गती प्राप्त झाली आहे. विकासाचे नवे मॉडेल तयार होत आहे. काही जिल्हे अधिक वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने कार्यरत असून, त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात राज्यात पहिला क्रमांक पटकावून इतरांसाठी आदर्श निर्माण केला आहे.

महाराष्ट्राच्या या स्थित्यंतराची दखल आम्ही या अंकात घेतली आहे. प्रत्येक जिल्ह्यात राबवण्यात येत असलेल्या, पूर्णत्वास गेलेल्या व नजीकच्या काळात सुरू होणाऱ्या विविध योजना व विकास कामांचा आढावा या विशेषांकात आम्ही घेतला आहे. महाराष्ट्राच्या नवनिर्माणाची दिशा आणि गती सिद्ध करण्यासाठी हा विशेषांक उपयुक्त ठरणार आहे.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने पहिल्यांदाच 'महाराष्ट्र वार्षिकी २०१७' चे प्रकाशन १५ ऑगस्ट, २०१७ रोजी करण्यात आले. महाराष्ट्राची एकत्रित अधिकृत, वस्तुनिष्ठ माहिती असणारे पुस्तक असण्याची गरज अनेक वर्षापासून व्यक्त केली जात होती. ही गरज या पुस्तकाच्या रूपाने पूर्ण होत आहे.

महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, समाजकारण, साहित्य, क्रीडा, समाजजीवन, सण–उत्सव, शासनाच्या विविध विभागांची कार्यरचना व कार्यपद्धती, महाराष्ट्राच्या जिल्ह्यांची घटकनिहाय माहिती, विधिमंडळ सदस्य, महाराष्ट्रातील लोकसभा सदस्य, राज्य व केंद्रीय मंत्रिमंडळ, आतापर्यंतचे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्रातील भारतरत्न, महाराष्ट्र भूषण, महाराष्ट्राची मानचिन्हे आदी विविध घटकांवरील उपयुक्त माहितीचा समावेश या पुस्तकात करण्यात आला आहे. या पुस्तकाची किंमत ३०० रुपये असून ते सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध आहे. हे पुस्तक स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार, पत्रकार, संपादक, अभ्यासक, शिक्षक, विद्यार्थी आणि महाराष्ट्राचे सर्वसामान्य ज्ञान प्राप्त करण्याची इच्छा असलेल्या सर्व वयोगटातील नागरिकांसाठी अतिशय उपयुक्त ठरेल असा आम्हास विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**

# स्मार्ट आणि सुरक्षित

**नागपूर हे मध्य भारतातील सर्वात मोठे शहर आहे. मागील तीन वर्षात जिल्ह्याचा झालेला सकारात्मक बदल हा येथील विविध प्रकल्पांच्या सुरू असलेल्या कामांमुळे ठळकपणे दिसून येतो. आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात जिल्ह्याचे महत्त्व वरचढ असल्याने येथील शहरीकरणाचा वेग खूप मोठा आहे. आयटी, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी आणि आरोग्य क्षेत्रामध्ये जिल्हा नेत्रदीपक प्रगती करत आहे. पायाभूत सुविधांचा झपाट्याने होणाऱ्या विकासासोबतच मेट्रो प्रकल्प, आयआयएम, एम्स, आयआयआयटी यासारख्या राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था नागपूरमध्ये होत असलेल्या गतिमान विकासाचे प्रतिक ठरत आहेत.**

नागपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या विविध विकास प्रकल्पांना मूर्त रूप प्राप्त होत आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब (मिहान प्रकल्प), तसेच स्पेशल इकॉनामी झोन (एसईझेड) च्या माध्यमातून मोठ्या आर्थिक विकासाची संधी उपलब्ध होत आहे. या प्रकल्पाच्या उभारणीमध्ये येणाऱ्या सर्व अडचणी दूर करून हा प्रकल्प आता साकारत आहे. त्याची फळे आता झाडावर लागली असून येत्या काळात त्याचा मधाळ स्वाद येथील तरुणाईला रोजगाराच्या स्वरूपात चाखता येणार आहे. रिलायन्स, वेदांता किंवा टॉल, बोइंग एमआरओ यांसारख्या आयटी क्षेत्रातील कंपन्यांच्या निमित्ताने नागपूर विकासाची झेप घेण्यास सज्ज झाले आहे. पतंजलीचा फळ प्रक्रिया हा महत्त्वाकांक्षी प्रकल्पसुद्धा साकारत आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेत भारतीय उत्पादन पाठवण्यासाठी आंतरराष्ट्रीय बहुविद प्रवासी व माल वाहतूक हबच्या विकासामुळे नागपूरचे नाव जागतिक नकाशावर आले आहे. त्यासोबतच लॉजिस्टिक हबसुद्धा सुरू होत आहे.

## ई-जिल्हा

नागरिकांना शासनाच्या सर्व सेवा घरपोच मिळाव्यात यासाठी 'आपले सरकार' या पोर्टलअंतर्गत नागरिकांना आपले प्रश्न थेट शासन दरबारी मांडण्याची सुविधा व्हावी म्हणून २ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्र्यांनी नागपूर जिल्ह्याला ई-जिल्हा म्हणून घोषित केला आहे. राज्यातील पहिला डिजिटल जिल्हा होण्याचा मान नागपूर जिल्ह्याला मिळाला असून जिल्ह्यातील ७७६ ग्रामपंचायती ऑप्टिकल फायबरने जोडण्यात आल्यामुळे शाळा, ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे वायफायची सुविधा व नेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध झाली आहे. नागपूर जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना सातबारा एटीएस मशिनच्या माध्यमातून केवळ वीस रुपयामध्ये उपलब्ध करून देण्यात आला.






### महामेट्रो

नागपूर मेट्रो रेल्वे ही ग्रीन मेट्रो आहे. यासाठी सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्यात येणार असून ग्रीन पिलर हे त्याचे वैशिष्ट्ये राहणार आहे. संपूर्ण देशात पिलरवर व्हर्टिकल गार्डन तयार करण्याचा पहिलाच प्रयोग नागपुरात राबवण्यात आला आहे. शोभिवंत झाडांमुळे हवेतील कॉर्बन डायऑक्साईड कमी होऊन परिसरसुद्धा थंडगार ठेवण्यास यामुळे मदत होणार आहे. नागपूर मेट्रोची स्थानके थीम स्वरूपात राहणार आहेत. यामध्ये रायगड, टॉगर, डच शैली आदींचा समावेश, त्यासोबतच १३ एकर जागेवर इकोपार्क, ॲग्रो टुरिझम, इकॉनामिक झोन, इकोपार्क स्टेशन, क्लब हाऊस आदी सुविधा राहणार आहेत. महामेट्रो हा प्रकल्प देशातील इतर प्रकल्पांसाठी एक आदर्श प्रकल्प राहावा या दृष्टीने नियोजनबद्ध आणि कालबद्ध कार्यक्रमानुसार वाटचाल सुरू आहे.

### समाधान शिबिर

मुख्यमंत्री समाधान शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारी व गाऱ्हाणी सोडवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतल्यामुळे, जनतेच्या तक्रारींचे समाधान तसेच शासनाकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होत आहेत. नागपूर शहरासह ग्रामीण भागातही हा उपक्रम लोकप्रिय ठरत आहे. शासन आपल्या दारी पोहचले आहे. महानगरपालिकेच्या दहा झोनमध्ये या शिबिराचे यशस्वी आयोजन झाले आहे.

### कमांड ॲण्ड कंट्रोल केंद्र

सुरक्षित शहर म्हणून ओळख निर्माण व्हावी या दृष्टीने शहरातील सातशे ठिकाणी ३ हजार ८०० सीसीटीव्ही कॅमेरे लावून त्या माध्यमातून वाहतूक नियंत्रित करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे गुन्हेगारीवर सुद्धा नियंत्रण राहणार आहे. कमांड ॲण्ड कंट्रोल केंद्राच्या माध्यमातून गुन्ह्यांची तत्काळ नोंद तसेच तत्काळ उकल करणे व गुन्हेगारीवर नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने पोलीस आयुक्तालयात हे केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. हा संपूर्ण प्रकल्प ५२० कोटी रुपये खर्चाचा आहे.



नागपूर शहर वायफाययुक्त करण्यात येत असून शहरातील काही भागात ही सेवा सुरू झाली आहे. स्मार्ट शहराला साजेशी स्मार्ट वाहतूक तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था सुरू झाली आहे. ग्रीन बसेस, देशातील पहिली इलेक्ट्रिक टॅक्सी सुविधा, ई-रिक्षा आदी प्रकल्पामुळे वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होत आहे.

'नागपूर मेट्रो, माझी मेट्रो' हे ब्रीदवाक्य घेऊन नागपूर शहरातील नवीन ओळख देश-विदेशात निर्माण करणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा वेग म्हणजे अवघ्या दोन वर्षाच्या कालावधीत ४३ टक्केपेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहे. लवकरच 'माझी मेट्रोचा' पहिला टप्पा पूर्ण होण्याकडे वाटचाल करीत आहे. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त प्रकल्पाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाल्यानंतर या प्रकल्पाने घेतलेल्या गतीमुळे नागपूरकरांच्या मनात या प्रकल्पाबाबत उत्सुकता वाढली आहे. सुमारे ३८.२१५ कि.मी. लांबीचा नागपूर मेट्रो प्रकल्प ८ हजार ६८० कोटी रुपये गुंतवणुकीचा आहे. हा प्रकल्प उत्तर-दक्षिण (ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान) आणि पूर्व-पश्चिम नागपूर (प्रजापती नगर ते लोकमान्य नगर) असा दोन कॉरिडारमध्ये निर्माण होत आहे. यामध्ये ३४ स्थानकांचा समावेश आहे.

### कृषी व्हिजन

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना ही देशातील सर्वाधिक शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची योजना राबवण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे. जिल्ह्यातील सुमारे ६५ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामासाठी पत आराखड्यानुसार कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या विविध उपक्रमांमुळे जिल्ह्यात सर्वाधिक शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होत आहे. या वैशिष्ट्यपूर्ण नागपूर कर्ज वितरण पॅटर्नची अंमलबजावणी इतर जिल्ह्यातही राबवण्यात येत आहे. शेतीला शाश्वत सिंचनाच्या सुविधेसोबतच, विजेची मागणी करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. मागेल त्या शेतकऱ्याला वीजजोडणी देतानाच सौर ऊर्जेच्या वापरालाही प्राधान्य देण्याचे धोरण जिल्ह्यात राबवण्यात आले आहे.

जलयुक्त शिवार हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम नागपूर जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून प्रभावीपणे राबवल्यामुळे सुमारे पाचशे गावांमध्ये आठ हजारापेक्षा जास्त कामे झाली आहेत. या योजनेच्या कामांमुळे

### शैक्षणिक हब

नागपूरची आंतरराष्ट्रीय क्षेत्रात औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरू असतानाच मध्य भारतातील सर्वात मोठे शैक्षणिक हब म्हणून हे शहर हे शहर नवी झेप घेत आहे. येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम) चा अभ्यासक्रम सुरू झाला असून अत्याधुनिक आवश्यक सुविधांसाठी या संस्थेला मिहान परिसरात १४२ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नॅशनल लॉ स्कूलच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य विधी विद्यापीठाचा पाच वर्षांच्या कायदेविषयक अभ्यासक्रमाला सुरुवात झाली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वाचा टप्पा ठरलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (आयआयआयटी) या अभ्यासक्रमालासुद्धा सुरुवात झाली आहे. नागपूरसह मध्य भारतासाठी महत्त्वपूर्ण अशी भारतीय आयुर्विज्ञान संस्था (इंडियन इन्स्टिट्युट सायन्स) नागपूरला सुरू होत आहे. या संस्थेसाठी मिहान प्रकल्पांतर्गत १५० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून सुमारे १५७७ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थासोबतच रोबोटिक तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी बेंगळुरु येथील रोबोट बनवणारे एशिया ब्राउन बोवरी (एबीबी) या संस्थेच्या पुढाकाराने रोबोटिक सेंटर सुरू झाले आहे. नागपूरसाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासोबत कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाला, जागेसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शिवारात मुबलक पाणी उपलब्ध झाल्यामुळे, पेरणीचे क्षेत्र वाढले असून दुबार पेरणीचे संकट टळले आहे. खरीप पिकांनाही याचा लाभ झाला आहे. जलयुक्त शिवारांतर्गत झालेल्या कामांचे ड्रोनमार्फत छायांकन करण्यात आले असता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जिल्ह्यातील जलयुक्तच्या कामाचे कौतुक केले आहे.

### समृद्धी महामार्ग विकासाचे नवे दालन

या महामार्गामुळे नागपूरसह विदर्भात विकासाच्या नवीन दालनाचा शुभारंभ होत असल्याची भावना लक्षात घेऊन सर्वप्रथम शेतजमीन देण्याची सकारात्मकता दाखवली आहे. या प्रकल्पासाठी प्रत्यक्ष जमिनीचा ताबा देऊन या प्रकल्पाला जिल्ह्यातून सुरुवात होत आहे. समृद्धीचे दुसरे दालन म्हणजे पर्यटन. नागपूर आता वाघांच्या संख्येच्या बाहुल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर 'वाघापूर' म्हणून ओळखले जात आहे. पेंच, ताडोबा, बोर, नागझिरा आदी व्याघ्र प्रकल्पासाठी मध्य प्रदेशातील कान्हाकिसली, कर्माझरी (पेंच) येथील पर्यटकांना नागपूर हेच महत्त्वाचे डेस्टिनेशन असल्यामुळे पर्यटकांच्या सुविधांसाठी सुनियोजित पद्धतीने मागील तीन वर्षापासून विकास करण्यात येत आहे. पर्यटकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात जगातून पर्यटक येथे भेट देत आहेत. नागपूरसह विदर्भातील नैसर्गिक वनसंपदा, खाण पर्यटन तसेच धार्मिक पर्यटनासोबतच गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयाचा विकास करण्यात येत आहे.

दीक्षाभूमी, ड्रॅगन पॅलेस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चिचोली (नागपूर) येथील वस्तुसंग्रहालय ही स्थळे पर्यटनाच्या दृष्टीने बुद्धिष्ट सर्किट म्हणून जोडण्यासाठी विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार विविध कामांना सुरुवात झाली आहे. धार्मिक स्थळांचा विकास करताना कोराडी येथील सुप्रसिद्ध जगदंबा महालक्ष्मी मंदिर परिसरासोबत पर्यटन विकासाचा ३५० कोटी रुपयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ताजबाग, तसेच रामटेक विकासासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. पर्यटकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मागील तीन वर्षापासून कालबद्ध कार्यक्रमाची आखणी केल्यामुळे पर्यटकांचा ओढा निसर्ग, व्याघ्र, तसेच खाण पर्यटनाकडे वाढत आहे.

लोकप्रतिनिधींचा विकास कामात प्रत्यक्ष सक्रिय सहभाग असावा म्हणून गाव दत्तक घेण्याच्या केंद्राच्या योजनेनुसार मुख्यमंत्र्यांनी नागपूर जिल्ह्यात दत्तक घेतलेले फेटरी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दत्तक घेतलेले पाचगाव आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दत्तक घेतलेले सुराबर्डी आणि धर्मापुरी गाव-आज सर्वांगीण विकास कामात आघाडीवर आहेत. जिल्ह्यातील अन्य गावांसाठी ही गावे आदर्श ठरत आहेत. तद्वतच नागपूरसह जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, कृषी विकासाला चालना, मिहानच्या माध्यमातून औद्योगिक विकासाला नवी दिशा, मेट्रो रेल्वेच्या माध्यमातून प्रगतीला वेग, एज्युकेशन हब म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक विकास, त्यासोबतच स्मार्ट व सेफ सिटी म्हणून नागपूरची सुरू असलेली वाटचाल ज्या वेगाने सुरू आहे, ते पाहून देशातील प्रमुख शहरे तसेच जगातील नामांकित संस्था व उद्योगसमूह नागपूरकडे आकर्षित होऊ लागले आहेत. पर्यायाने नागपूर हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गुंतवणुकीसाठी महत्त्वाचे ठिकाण ठरत आहे. मागील तीन वर्षात विकासासोबत विश्वासाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे हा सकारात्मक बदल घडला आहे.

### स्मार्ट नागपूर

'इंडियाज् हार्ट, नागपूर स्मार्ट' असे घोषवाक्य घेऊन दिमाखात नागपूर शहराची वाटचाल स्मार्ट सिटीच्या दिशेने सुरू झाली आहे. गेल्या काही वर्षात नागपूरचा ज्या वेगाने विकास होत आहे, त्या




विकासासोबतच स्मार्ट सिटी प्रकल्पामुळे शहराला नियोजनबद्ध विकासाने नवा आयाम मिळाला आहे. नागपूर केवळ स्मार्ट न राहता सुरक्षितसुद्धा (सेफ) राहावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये नागपूर सेफ अॅण्ड स्मार्ट सिटी, तसेच एरिया बेस्ड डेव्हलपमेंट या दोन प्रकल्पाचे काम वेगाने प्रगतिपथावर आहे. यामध्ये स्मार्ट वाहतूक व्यवस्था, स्मार्ट पर्यावरण, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि स्मार्ट प्रशासन या चतु:सूत्रीचा समावेश करण्यात आला आहे.

एरिया बेस्ड डेव्हलपमेंट अंतर्गत नियोजनबद्ध विकास करताना त्या भागाचा क्षेत्राधिष्ठित विकास करून, मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये १२४० एकर क्षेत्रावर विकासाचे मॉडेल तयार होत असून हा प्रकल्प सुमारे ८१६ कोटी रुपयांचा आहे.

**– अनिल गडेकर**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

# सुसंवाद



**‘लोकांच्या तक्रारी काय आहेत आणि प्रशासन कोणत्या दिशेने जात आहे, याची पुरेपूर कल्पना यावी, यासाठी ‘नागरिकांशी थेट संवाद’ हा उपक्रम सुरू केला. त्यामुळे उपाययोजनाही करणे सोपे झाले. दीर्घ काळापासून सुरू असलेला हा उपक्रम ऊर्जा विभागातही राबवला जात आहे. त्यामुळे ऊर्जा विभागाशी संबंधित प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीस पारदर्शकता प्राप्त झाली आहे.’**

**– चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री, नागपूर**

ऊर्जा विभागात काम करताना सर्वसामान्य जनतेच्या वीज पुरवठ्या बद्दलच्या तक्रारी आणि समस्या यांच्या मुळाशी जाण्यासाठी ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना नागरिकांशी थेट संवादाची कल्पना सुचली. हा उपक्रम गेल्या १५ वर्षांपासून नागपूर जिल्ह्यात बावनकुळे राबवत आहेत. या उपक्रमातून नागरिकांशी थेट संवाद तर होतोच. शिवाय समस्यांच्या मुळाशी जाता येते. त्यावर उपाययोजना करणे सोईस्कर होते.

नागरिकांशी थेट संवाद, अर्थात जनता दरबार हा उपक्रम सर्व जिल्हा स्तरावर राबवला जात आहे. आतापर्यंत पुणे, अकोला, वाशिम, बुलडाणा, हिंगोली या ठिकाणी हा उपक्रम राबवला गेला. आगामी काळात अन्य जिल्ह्यांमध्येही राबवला जाणार आहे.

या थेट संवादाच्या कार्यक्रमात येणाऱ्या तक्रारी, त्यावर झालेली कारवाई आणि अनुभव थक्क करून सोडणारे आहेत. केवळ वीज जोडणीसाठी शेतकऱ्याला आणि सर्वसामान्य ग्राहकाला किती खेटे घालावे लागतात, याचे प्रत्यक्ष दर्शन या उपक्रमातून अनेकदा होते.

या उपक्रमाच्या माध्यमातून शासनाच्या योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतात की नाही, याचा आढावा घेतला जातो. ग्रामीण भागात ३ ते ४ हजार लोक या उपक्रमात, भर उन्हात उपस्थित राहतात.

**– विवेक जोशी**

## सकारात्मक बदल

- नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री व ऊर्जा व राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री. बावनकुळे प्रत्येक महिन्यात ४ जिल्ह्यात जनता दरबार घेतात. वर्षातील १२ महिन्यांपैकी अधिवेशनाचे ३ महिने वगळता प्रतिमहिने ४ या प्रमाणे एका वर्षात ३६ जिल्ह्यांमध्ये जनता दरबार घेण्याचे प्रस्तावित आहे.
- या वित्तीय वर्षात पुणे, यवतमाळ, बुलडाणा, हिंगोली, वाशिम, अकोला, उस्मानाबाद, लातूर, नांदेड जिल्ह्यात जनता दरबार घेण्यात आले.
- प्रत्येक जिल्ह्यात आयोजित जनता दरबार व लोकप्रतिनिधी यांच्या समवेत होत असलेल्या बैठकांमुळे महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या कामाच्या दर्जामध्ये सकारात्मक फरक पडला आहे. महावितरणच्या योजना ज्या लोकप्रतिनिधींनांही माहीत नव्हत्या त्या लोकांपर्यंत पोहोचून व या योजना राबवण्याला गती प्राप्त झाली.
- पहिल्यांदाच संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून महावितरणला मिळणाऱ्या निधीत वाढ झाली आहे. संबंधित जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या वसुलीचे प्रमाण वाढले आहे. महापारेषण कंपनीमार्फत सुरू केलेले प्रकल्प, वेळेअगोदर पूर्ण होण्यासाठी युद्धस्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

# परिवर्तनाची नांदी

**'नागपूर सुधार प्रन्यास'मार्फत नागपूर शहराच्या विकासाला गती देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यातून सुंदर आणि स्मार्ट शहराच्या परिवर्तनाची नांदी ध्वनित होत आहे.**

## दीक्षाभूमी स्तुपाचे मजबुतीकरण



दीक्षाभूमी, नागपूर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान. पर्यटनासाठी सुप्रसिद्ध अ वर्गात मोडणारे हे पर्यटन स्थळ. येथील जुन्या स्तूपाचे बांधकाम कालपरत्वे कमकुवत व क्षतिग्रस्त झाले आहे. स्तूपाचे मजबुतीकरण व वॉटर प्रूफिंग करणे आवश्यक आहे. यासाठी ९.४१ कोटी रुपयांचे दुरुस्तीचे काम प्रस्तावित आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर



उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्रातील कामठी रोड लगत असलेल्या धान्य गोदामाच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटरचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने रु. ११३.७४ कोटी च्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिलेली असून, नागपूर सुधार प्रन्यासला नोडल एजन्सी म्हणून घोषित केले आहे. या प्रकल्पामध्ये डॉ. आंबेडकरांचा भव्य पुतळा (उंची ४० फूट), पार्किंग, जिना, लिफ्ट, बँक्वेट हॉल, बिझनेस सेन्टर, रिसेप्शन, मीडिया सेंटर, प्रतीक्षालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन कार्यालय, उपहारगृह, अतिथी कक्ष, सार्वजनिक ग्रंथालय, बुद्धीस्ट स्टडीज् डिव्हीजन, रिसर्च सेंटर, संग्रहालय, आर्ट गॅलरी, प्रेक्षागार, प्रशिक्षण सभागृह आणि भांडारकक्ष इत्यादीचा समावेश आहे. हा प्रकल्प शक्य तेवढ्या लवकर पूर्ण करण्यात येणार आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना:** प्रत्येकाला त्याचे हक्काचे घर मिळावे, यासाठी शासनाकडून राबवण्यात येत असलेल्या स्वस्त घर योजनेचे प्रत्यक्ष काम आता सुरू झाले आहे. वाठोडा आणि वांजरी येथे १२६८ घरे बांधण्यात येत आहेत. येत्या १५ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागपुरात ५० हजार स्वस्त घरे उपलब्ध करून देण्याचे नियोजन असून, पहिल्या टप्प्यात १० हजार घरे तयार करण्यात येणार आहेत.

**योजनेची वैशिष्ट्ये:** या संकुलातील गाळ्यांकरिता सोलर लॅम्प, नेट मिटरींग, सामाजिक सभागृह, नित्योपयोगी वस्तूची दुकाने, रस्ते, कुंपण भिंत, मुलांकरिता क्रीडांगण, पार्किंगची सोय राहणार आहे.

## ऐतिहासिक संपदेचे जतन – चिचोली प्रकल्प



नागपूर जिल्ह्यातील चिचोली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैयक्तिक वापरातील वस्तूंचे संग्रहालय आहे. या संग्रहालयाचे आधुनिकीकरण आणि परिसराच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी स्व.वामनराव गोडबोले यांनी शांतीवन चिचोली येथील संग्रहालयात डॉ. बाबासाहेबांच्या वैयक्तिक वापराच्या वस्तूंचे जतन करून ठेवले आहे.




हा प्रकल्प राबवण्यासाठी नासुप्र, विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर व भारतीय बौद्ध परिषद यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या १७३ वस्तूंचे संवर्धन करण्यात येत आहे. या वस्तूंच्या संवर्धनाचे काम केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सांस्कृतिक संपदा संरक्षण अनुसंधान संस्था, लखनऊद्वारे करण्यात येत आहे.

## हजरत बाबा ताजुद्दीन दर्गा (मोठा ताजबाग)



नागपूर शहरातील उमरेड रोडवर स्थित मोठा ताजबाग हे हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. विकास प्रकल्पासाठी हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टच्या जमिनीवर मोठा ताजबाग परिसरातील पायाभूत सुविधा व सौंदर्यीकरणाची कामे २४ एकर परिसरात नासुप्रमार्फत केली जात आहेत. ही सर्व विकास कामे मार्च २०१९ पर्यंत पूर्णत्वास जाणे अपेक्षित असून, या कामांवर रु. ११४ कोटी खर्च अपेक्षित आहे.

## श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर, कोराडी



संपूर्ण महाराष्ट्रात भक्तिभावाने उपासना केली जाणाऱ्या श्री महालक्ष्मी जगदंबेचे एक महत्त्वाचे मंदिर म्हणजे श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी. या क्षेत्राचा विकास करण्यासाठी, नागपूर सुधार प्रन्यासला नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या विकास कामांवर रु. १८५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

## दलित वस्ती सुधार योजना

दलित वस्ती सुधार योजना, आमदार निधी, खासदार निधी, मनपा क्षेत्रात मुलभूत सुविधा पुरवण्यासाठी ३८ कोटींचा निधी खर्च करण्याचे नियोजित करण्यात आले आहे. यात समाजभवन, रस्ते, फूटपाथ, मलवाहिका, जलवाहिका, पावसाळी पाणीवाहिका आदी कामांचा समावेश आहे.

## सी प्लेन प्रकल्प



नागपूर-शेगांव, नागपूर-ताडोबा, नागपूर-नवेगाव खैरी, नागपूर-नागझीरा, नागपूर-नवेगाव बांध (पेंच), इत्यादी ठिकाणी जॉय राईड, सुलभ परिवहन पर्याय, आपत्ती व्यवस्थापन, हवाई रुग्णवाहीका सेवा, व्याघ्र पर्यटन, इत्यादींच्या दृष्टिकोनातून सी प्लेन प्रकल्प राबवण्यात येणार आहे. यामुळे विदर्भातील पर्यटनास चालना मिळेल. नागपुरातील नागरिकांचे आकर्षण केंद्र असलेल्या फुटाळा तलाव येथे जागतिक दर्जाचे व भारतातील सर्वात मोठे म्युझिकल फाऊंटन उभारले जाणार आहे. अंबाझरी तलाव येथील उद्यानात स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर आधारित डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जागतिक दर्जाच्या लाइट साऊंड ॲण्ड मल्टी मीडिया शो प्रस्तावित आहे.

## इतर विकास कामे

■ **आदिवासी मुलांसाठी वसतिगृह :** चिखली देवस्थान येथे ११२ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी २८ खोल्यांचे वसतिगृह बांधण्याचे काम हाती घेतले. नोव्हेंबर २०१८ मध्ये काम पूर्ण होणार आहे. ■ **पोलिसांसाठी निवासी संकुल इमारती :** पोलिसांसाठीही लकडगंज परिसरात गृहनिर्माण प्रकल्प उभा होत आहे. लकडगंज परिसरात १९ हजार चौरस मीटरवर हा प्रकल्प साकारण्यात येत आहे. ■ नागपूर शहरातून वाहणाऱ्या नाग नदीचे प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने, नागपूर शहरातील विविध ठिकाणी, एकूण १० सिव्हेज ट्रीटमेंट प्लांट बांधण्याचा प्रकल्प नागपूर सुधार प्रन्यासद्वारे हाती घेण्यात आलेला आहे. ■ मौजा. चिखली (देवस्थान) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बांधकाम, मौजा-चिखली व मौजा-पारडी येथे वसतिगृहाचे निर्माण, दीक्षाभूमी चौकातील संत चोखामेळा वसतिगृह, कृषी विद्यापीठाच्या जागेवर स्व. वसंतराव नाईक सभागृह, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना.

– **डॉ. दीपक म्हैसेकर** (भा.प्र.से.)
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास




वर्धा येथे शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आलेला रूरल मॉल

### शेतकऱ्यांसाठी रूरल मॉल

शेतकरी बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांना खात्रीचे विक्री ठिकाण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यांना थेट बाजाराच्या प्रवाहात आणून विपणन प्रक्रियेशी जोडण्यासाठी; जिल्हा प्रशासनाने वर्धा येथे रूरल मॉल उभारण्याचे काम सुरू केले आहे. येत्या महिनाभरात हा मॉल ग्राहकांच्या सेवेत दाखल होणार आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना त्यांनी प्रक्रिया केलेला माल या रूरल मॉलच्या माध्यमातून विक्री करता येईल, त्यामुळे ग्राहकांना चांगल्या प्रतीचा माल वाजवी दरात मिळेल.

# नवी दिशा

**वर्धा जिल्हा विकास आराखड्यात सेवाग्राम, वर्धा आणि पवनार विभागातील सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन, पवनार येथील दिल्ली गेट आणि परिसराचे वारसा संवर्धन, धाम नदी काठाचा विकास, नूतनीकरण व सुशोभीकरण, पवनार आश्रम ते आचार्य विनोबा भावे यांच्या समाधीपर्यंत चालण्यासाठी पादचारी रस्त्याची निर्मिती, नदी काठाची स्वच्छता तसेच पर्यटकांसाठी सुविधा, सेवाग्राम परिसरामध्ये अंगुरी बागेजवळ १००० व्यक्तींसाठी सभागृह, यात्री निवासाच्या परिसरातील प्रदर्शन हॉलची दुरुस्ती, गांधी चित्र प्रदर्शनी येथील दुरुस्ती, हेरिटेज पर्यटन विकासासाठी नागरी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.**

महात्मा गांधींच्या सेवाग्राम येथील वास्तव्याला २०१३ मध्ये ७५ वर्षे पूर्ण झालीत तेव्हा सेवाग्राम येथे पायाभूत सुविधा आणि परिसर विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. महात्मा गांधी यांची १५०वी जयंती २०१९मध्ये साजरी होणार असून त्याअनुषंगाने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

वित्त मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी १ ऑक्टोबर २०१६ रोजी २६६.५३ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यास मान्यता दिली आहे. ३४.९९ कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. महात्मा गांधी प्रशिक्षण व संसाधन केंद्र हे विकास आराखड्यातील सर्वात जास्त आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. जिल्ह्यात यावर्षी विक्रमी म्हणजे १२ लक्ष ३८ हजार वृक्षलागवड झाली आहे.

### पाणीसाठा निर्मिती

या वर्षी वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यात पाणी फाऊंडेशनच्या वतीने सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ५२ गावांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. लोकसहभागातून झालेल्या कामामुळे ३ लाख द.ल.घ.मी. पाणी साठा क्षमता निर्मिती झाली आहे. शिवाय कमलनयन बजाज फाऊंडेशनच्या सहकार्याने यशोदा नदी पुनर्जीवन विकास प्रकल्प राबवण्यात येत आहे. जिल्ह्यात मागील तीन वर्षांत शासन, सामाजिक संस्था व लोकसहभागातून झालेल्या जलसंधारणाच्या कामामुळे ३ लाख ५० हजार द.ल.घ.मी. पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे.

### स्वच्छ भारत अभियान

स्वच्छ भारत अभियानात वर्धा जिल्ह्यातील ५१३ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. मुख्य म्हणजे ३१ जानेवारी २०१७ रोजी



**“ जलयुक्त शिवार अभियानात जिल्ह्यात तीन वर्षांत ५७१ गावांची निवड करण्यात आली. त्यापैकी ७५ टक्के गावे जलसंपन्न झाली आहेत. त्यामुळे मागील वर्षी २५ हजार हेक्टरवर संरक्षित सिंचन होऊ शकले.**

**– सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री, वर्धा ”**




वर्धा हा नागपूर, मराठवाडा आणि नाशिक विभागातून हागणदारीमुक्त होणारा पहिला जिल्हा ठरला आहे. जिल्ह्यात २०१२ च्या सर्वेक्षणानुसार ९१ हजार ५९३ कुटुंबांकडे शौचालय नव्हती. २०१५ ते जानेवारी २०१७ या कालावधीत सर्व ९१ हजार ५९३ शौचालयाचे काम पूर्ण करून जिल्हा हागणदारीमुक्त करण्यात आला.

## शेतकरी कंपन्या झाल्या उद्योजक

शेतमाल प्रक्रियेद्वारे उत्पादनाची निर्मिती व स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध व्हावी याकरिता कृषी विभागाद्वारे जिल्ह्यात १० शेतकरी कंपन्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या प्रत्येक शेतकरी कंपनीत भाग भांडवलदार म्हणून ५०० शेतकऱ्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील तब्बल ५ हजार शेतकऱ्यांच्या पुढाकारातून शेतकरी कंपन्या उद्योजक झाल्या आहेत. जिल्ह्यातील शेतमाल उत्पादक कंपन्या उत्पादित शेतमालाची प्रतवारी आणि प्रक्रिया करून थेट विक्री करीत आहेत. कंपन्यांना संलग्न असणाऱ्या शेतकरी गटांना १७ दालमील देण्यात आल्या आहेत. महागडी शेती अवजारे प्रत्येक शेतकरी विकत घेऊ शकत नसल्यामुळे जिल्ह्यातील ६ शेतकरी कंपन्यांनी 'अवजार बँक' स्थापन केली आहे. ९० टक्के अनुदान शासनाकडून देऊन शेतकरी कंपन्यांना त्यांचा नाममात्र हिस्सा देऊन, अवजार बँकेचा लाभ देण्यात आला. गावातच माती परीक्षण करून घेणे शेतकऱ्यांना सोईचे व्हावे यासाठी जिल्ह्यात पाच कंपन्यांना माती परीक्षण प्रयोगशाळा स्थापन करून देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत वर्धा जिल्ह्यात मदर डेअरी दूध खरेदी करीत आहे. जिल्ह्यातील आर्वी, कारंजा, आष्टी, वर्धा, सेलू या पाच तालुक्यातील २४८ गावांमध्ये दूध खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुधासाठी चांगला दर मिळत आहे.

### डिजिटल स्वाक्षरीचा सातबारा




सातबारा मिळण्यासाठी तलाठ्याकडे खेटे घेणाऱ्या शेतकऱ्याला घरूनच 'आपले सरकार' वेब पोर्टल, गावातील आपले सरकार सेवा केंद्र, किंवा 'महा-ई सेवा' केंद्राच्या माध्यमातून डिजिटल स्वाक्षरीचा सातबारा उपलब्ध करून दिला जातो. सामान्य रुग्णालयात सातबारा देणारी एटीएस मशीन बसवण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना सात बारा मिळणे सोपे झाले आहे.

## केसांपासून पीकवर्धक औषध निर्मिती

कृषी विभागातर्फे शेतकरी कंपन्यांना केसांपासून पीकवर्धक औषधी निर्मिती केंद्रे देण्यात आली आहेत. शेतकऱ्यांची बाजारात होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी उत्कृष्ट दर्जाचे पीकवर्धक औषध शेतकरी कंपन्यांनी निर्माण केले आहे. आतापर्यंत शेतकरी कंपन्यांनी तब्बल ४ हजार लिटर औषधाची निर्मिती केली आहे. या विक्रीतून दहा लाखांचा नफा शेतकऱ्यांना मिळाला आहे.

## ड्रायपोर्ट विदर्भासाठी वरदान

कच्चा आणि पक्का माल गतीने देशाच्या वेगवेगळ्या भागात तसेच इतर देशात पोहोचवण्यासाठी एक कार्यक्षम वाहतूक व्यवस्था असावी लागते. भविष्यात अशी यंत्रणा उभारण्यासाठी केंद्र सरकारच्या जलवाहतूक मंत्रालयाच्या वतीने सागरमाला प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत केंद्र शासनाने वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील सिंदी (रेल्वे) येथे ड्राय पोर्ट स्थापन करण्याची घोषणा केली आहे. सिंदी येथील ड्रायपोर्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट विकसित करीत आहे. हे ड्राय पोर्ट नागपूर वर्धा औद्योगिक वसाहतीजवळ असून विदर्भातील इतर औद्योगिक विभागांना सुद्धा जोडले जाईल. यामुळे तांदूळ निर्यातदार, कापड आणि वस्त्र उद्योजक, पोलाद आणि खनिज उद्योजक, प्लॅस्टिक आणि कागद पल्प, विद्युत मशिनरी, ऑटोमोटिव्ह पार्ट निर्माते इत्यादी उद्योजकांसाठी हे पोर्ट अतिशय महत्त्वाचे ठरणार आहे. या प्रकल्पामुळे १२०० लोकांना थेट रोजगार मिळणार असून सुमारे ४० ते ५० हजार बेरोजगारांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होईल.

यासाठी ३५० एकर जागा लागणार असून २३ हेक्टरच्या पहिला टप्प्याचे काम पूर्ण करण्यासाठी १०० कोटी रुपये खर्च येणार आहे. यामध्ये सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे, ज्यामध्ये सिमा शुल्क मंजुरी सुविधा, कंटेनर वाहतूक केंद्र, गोदाम, शीतगृह, लिक्विड स्टोरेज, ट्रक टर्मिनल्स इत्यादी सुविधांचा समावेश असणार आहे. या प्रकल्पासाठी भूमी अधिग्रहणाचे काम पूर्ण झाले असून जागा जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टला हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच रेल्वे लाईनसाठी थेट बाजार पद्धतीने जागा घेण्याचे प्रस्ताव तयार आहेत. वर्धा जिल्ह्यातील ड्रायपोर्ट तयार झाल्यावर विदर्भातील उद्योग वाढीसाठी ते वरदान ठरेल.

**– मनीषा सावळे**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा



वृक्षारोपण, चंद्रपूर

**तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन झाले. नवी टीम राज्यात सक्रिय झाली. या नव्या टीममध्ये चंद्रपूर जिल्ह्यामधून सलग पाच वेळा निवडून आलेले सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे राज्याचे वित्त, नियोजन, वने मंत्री या विभागांची जबाबदारी सोपवण्यात आली. जिल्ह्यासाठी हे परिवर्तन विकासाचा नवा झंझावात घेऊन आले. जिल्ह्याचा कायापालट करण्याचा त्यांचा ध्यास आहे.**

# गतिमानतेला आधुनिकतेची जोड



बाबा आमटे अभ्यासिका, चंद्रपूर



प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह, चंद्रपूर



कर्मवीर मा.सां. कन्नमवार सांस्कृतिक सभागृह, मूल

तीन वर्षात चंद्रपूर म्हणजे दारूबंदी झालेला जिल्हा, चंद्रपूर म्हणजे वाघांची संख्या वाढलेल्या नव्या स्वरूपातील ताडोबा अभयारण्याचा जिल्हा, नवे वैद्यकीय शासकीय महाविद्यालय सुरू झालेला जिल्हा, जपान-दुबईच्या तोडीची बांबू संशोधन व प्रशिक्षणाची इमारत उभारणारा जिल्हा, डेहराडून येथील वनप्रबोधिनीपेक्षा देखणी व आधुनिक सोयींनीयुक्त वनप्रबोधिनी साकारत असलेला जिल्हा, बेंगळुरूपेक्षा अधिक क्षमतेच्या वनस्पतींवर संशोधन करणारे बॉटनिकल गार्डन निर्माण करणारा जिल्हा, मुंबई-पुण्यातील नाट्यगृहांपेक्षा चंद्रपूर व मूल येथे सरस नाट्यगृह साकारलेला जिल्हा, बारामतीसारखा सिंचनाचे प्रयोग करणारा जिल्हा, नदी जोडप्रकल्पाच्या धर्तीवर मोठ्या प्रकल्पातील पाण्यातून दुष्काळी प्रकल्पांना जोडणारा जिल्हा म्हणून चंद्रपूरने ख्याती प्राप्त केली आहे.

> **“ जिल्हा परिषदेच्या शाळांना डिजिटल करून खासगी शाळांशी स्पर्धा करणारा जिल्हा, ग्रामीण भागातील जनतेला पाण्याच्या ‘ एटीएमनी’ शुद्ध पाणी देण्याचा प्रयोग करणारा जिल्हा, हातातल्या मोबाइलवरून प्रशासनाला आपले प्रश्न सोडवण्यास भाग पाडणारा प्रगत जिल्हा म्हणून चंद्रपूरची ओळख निर्माण करण्यात यश आले. या जिल्ह्याने पायाभूत व प्राथमिक सुविधांचे नवे आदर्श राज्यापुढे उभे केले आहेत.**
>
> **- सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री, चंद्रपूर ”**



## वृक्षलागवडीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर

चंद्रपूरच्या समाज जीवनात आलेला फरक दारूबंदीचा प्रभाव सांगून जातो. जिल्ह्यातील गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. अपघात, कौटुंबिक हिंसाचार आदी गुन्हे कमालीचे घटले आहे. प्रदूषण करणाऱ्या अनेक प्रकल्पांच्या मुसक्या बांधून जागतिक मानकाच्या आधारे कारखाने चालवण्याची ताकीद कामी आली आहे. उलट प्राणवायूचे जनक संबोधल्या जाणाऱ्या हरीतपट्ट्याची वाढ झाली असून याच जिल्ह्यातून महाराष्ट्राला ५० कोटी वृक्षलागवडीचे स्वप्न पडले आहे. यामध्ये या वर्षी, महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकावर, ४३ लक्ष वृक्षलागवडीचा विक्रम चंद्रपूर जिल्ह्याने केला आहे.

## प्रकल्पांना संजीवनी

जिल्ह्यातील जुन्या प्रकल्पाची क्षमता वाढवण्यासाठी राष्ट्रीय प्रकल्प




### झंझावात

- जिल्ह्यामध्ये संपूर्ण दारूबंदी.
- हॅलो चांदा पालकमंत्री तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित.
- राष्ट्रीय दर्जाच्या वनप्रबोधिनीची सुरुवात.
- विसापूर येथे राष्ट्रीय दर्जाची महाराष्ट्रातील दुसरी सैनिकी शाळा.
- विसापूर येथे भारतातील दुसरे मोठे बोटॅनिकल गार्डन
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित.
- जंगल परिसरातील ९० गावातील प्रत्येक कुटुंबाला मोफत गॅस
- वाघ हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबाला ८ लाख रुपये.
- चंद्रपूरला पुराचा धोका असणाऱ्या इरई नदीचे रुंदीकरण व खोलीकरण.
- ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय दर्जा.
- ताडोबा-काजीपेठ व आनंदवन एक्सप्रेस रेल्वेची सुरुवात..
- चंद्रपूर शहरात पद्मश्री बाबा आमटे अभ्यासिकेची निर्मिती.
- गोसीखुर्द प्रकल्पातून आसोलामेंढा प्रकल्पाला पाणी पुरवठा.
- गोसीखुर्दमधून मूल आणि पोंभुर्णा तालुक्यातील शेतकऱ्यांना पाणी पुरवठा.
- ए.पी.जे.अब्दुल कलाम अद्ययावत पार्कची निर्मिती.
- जिल्ह्यातील १५०० जिल्हा परिषद शाळांना डिजिटल शाळेच्या सोईसुविधा.
- शिवणीचोर सिंचन प्रकल्पासह ८ उपसासिंचन प्रकल्पांचे पुनरुज्जीवन.
- मूल, पोंभर्णा व चंद्रपूर तालुक्यात अनेक ठिकाणी आरोमशीनचा शुद्ध पाणी पुरवठा.
- 'चला, आपल्या ताडोबाला' या मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांना ताडोबाचे मोफत पर्यटन.
- आगरझरी येथे विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण केंद्र.
- जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अगरबत्ती उद्योगाला प्रारंभ.

असणाऱ्या गोसीखुर्द प्रकल्पातील पाणी लोखंडी पाईपने आसोला मेंढा प्रकल्पात सोडण्यात येणार आहे. हे दोन प्रकल्प जोडल्या गेल्यामुळे या आजारी प्रकल्पाला नवसंजीवनी मिळणार असून १२ हजार हेक्टरची सिंचन क्षमता ५८ हजार हेक्टर क्षमतेवर जाणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बंद करण्यात आलेले १६ पैकी ८ उपसा सिंचन प्रकल्प पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. २५ वर्षांपासून बंद असलेले प्रकल्प सुरू होत आहेत, हे विशेष. वर्धा नदीवरील शिवणी चोर, हडस्ती, धानोरा, सोईट कोहपरा, सोईट दिंडोरा, भरोसा, नंदवर्धन, जिबगाव हे प्रकल्प आता पुन्हा सिंचनासाठी सज्ज झाले आहेत. मूल व बल्लारपूर तालुक्यातील शेतीला बोरघाट व पळसगाव आमडी येथून पाणी उपलब्ध केले जाणार आहे. शेतकऱ्यांना आता वर्षातून तीन पिकांची सोय या पाणीपुरवठ्याने होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्याला वर्धा, इरई, वैनगंगा अशा बारमाही नद्यांची साथ लाभली आहे. नव्या प्रकल्पाच्या अभावी सिंचनापासून दूर राहिलेल्या शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याची धडपड सुरू आहे.



### शेतकऱ्यांना फायदा

२०२२ पर्यंत जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटीने करण्यासाठी जिल्हा प्रशासन कार्यरत झाले आहे. ज्या ठिकाणी नदीचे पाणी देणे शक्य नाही त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जलयुक्त शिवार योजनेतून ओलीत क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये २०१५ ते २०१७ या दोन वर्षात २२ हजार ६७० हेक्टर हंगामी ओलीत क्षेत्र निर्माण झाले आहे. यासाठी ३९ हजार ७५८ टिसीएम पाणी साठवले गेले आहे. ४३१ गावांना यासाठी निवडण्यात आले असून २०१७ ते १८ साठी पुन्हा १६२ गावांची आतापर्यंत निवड झाली आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी पतपुरवठा करण्यातही जिल्हा प्रशासनाने आघाडी घेतली असून, पीक कर्जासाठी २०१४-१५ ते २०१६-१७ या काळामध्ये २०४० कोटी २१ लाख रुपयांचा लाभ शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. या भागातील आदिवासीबहुल जनतेसाठी जिल्हा विकास यंत्रणेमार्फत मोठ्या प्रमाणात कृषिपूरक यंत्रणा उभारण्यात येत आहे. आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबाला आता ८ लाखाचा सानुग्रह निधी दिला जातो. याशिवाय पशुधनासाठी पैसे वाढवून दिले आहेत. वन्यजीव व मानव संघर्ष येऊच नये यासाठी या परिसरातील जनतेचे वनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विविध गृहोद्योगांची सुरुवात करण्यात आली आहे. बांबूवर आधारित वस्तुनिर्मिती करणे, अगरबत्ती तयार करणे, याशिवाय कुक्कुटपालन, मत्स्यपालन, दुग्धव्यवसायाला गती दिली जात आहे. आगरझरी येथे एकीकडे अगरबत्ती क्लस्टर तयार होत असून दुसरीकडे यासाठी लागणाऱ्या बांबूच्या प्रजातींचे रोपण सुरू होणार आहे.

**- प्रवीण टाके**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर


गोसीखुर्द प्रकल्प

# जलसमृद्धी

**भंडारा जिल्ह्याने गेल्या तीन वर्षात कृषी, सिंचन, आरोग्य व पायाभूत सुविधा या क्षेत्रात लक्षणीय विकास केला आहे. जलयुक्त शिवार अभियान, मनरेगा, राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, ऑनलाइन सातबारा, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आदी योजनांमध्ये जिल्ह्याने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. शासनाने गोसीखुर्द प्रकल्पाच्या १८,४९४.५७ कोटी रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. जून २०१९ पर्यंत गोसीखुर्द प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यात येणार असून, हा प्रकल्प जिल्ह्याच्या विकासाचा मानबिंदू ठरणार आहे. केवळ भंडाराच नव्हे तर नागपूर, चंद्रपूर जिल्ह्याच्या सिंचन विकासासाठी हा प्रकल्प वरदान ठरेल.**

भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात वैनगंगा नदीवर उभारण्यात येत असलेला गोसीखुर्द हा राज्यातील एकमेव राष्ट्रीय प्रकल्प आहे. त्यास केंद्र शासनाकडून ९० टक्के अर्थसाहाय्य प्राप्त होत आहे. पूर्व विदर्भातील या सर्वात मोठ्या बहुउद्देशीय प्रकल्पाद्वारे सिंचन सुविधेबरोबरच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, औद्योगिक पाणीपुरवठा, मत्स्यव्यवसाय व जलविद्युत निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे पूर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील एकूण १ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार असून त्यापासून २ लाख ५० हजार ८०० हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. जून २०१९ पर्यंत गोसीखुर्द प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

### कर्जमाफी

कर्जमाफीच्या निर्णयाचा जिल्ह्यातील ४३ हजार शेतकऱ्यांना ३२८ कोटी रुपयांचा लाभ होणार आहे. यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्यास सुरुवात केली असून जिल्हा प्रशासनाने प्रत्येक बँक शाखेत अर्जाचा नमुना उपलब्ध करून दिला आहे.

**‘डिजिटल महाराष्ट्र’ या कार्यक्रमांतर्गत सातबारा ऑनलाइन करण्याचे काम जिल्ह्यात १०० टक्के करण्यात आले आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील सातही तालुक्यातील ५ लाख ७२ हजार एवढे सातबारा, महसूल विभागाने ऑनलाइन केले आहेत.**

**– डॉ. दीपक सावंत, पालकमंत्री, भंडारा**






## लोकसहभागातून काम

धरणातील गाळ काढून तो शेतात पसरवण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार हे अभियान शासनाने नुकतेच राबवले आहे. या अभियानांतर्गत भंडारा जिल्ह्यातील ५२ तलावातून ४५ हजार ३७ घनमीटर गाळ काढण्याचे संपूर्ण काम लोकसहभागातून प्रशासनाने केले. तलावातून काढलेला गाळ ६७० हेक्टर शिवारात टाकण्यात आला. यामुळे तलावाच्या पाणी पातळीत वाढ होऊन जमिनीचा पोत सुधारण्यास मोठी मदत होणार आहे.

५ मे २०१७ रोजी शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान राबवण्याचा निर्णय घेतला. जलसाठ्यांची पुनर्स्थापना करणे तसेच जलस्रोतांच्या उपलब्धतेत शाश्वत स्वरूपाची वाढ करणे आणि शेत जमिनीचा पोत सुधारून, उत्पन्न वाढीसाठी मदत करणे या हेतूने हे अभियान राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला. या मोहिमेत जिल्हाभर ७३६ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. या योजनेचा फायदा सिंचन वाढीसाठी होणार आहे. तलावात पाणी साठण्यास सुरुवात झाली आहे. सिंचनासोबतच मत्स्य उत्पादनालाही या योजनेचा लाभ होणार आहे.

## जलयुक्त शिवार



जलयुक्त शिवार योजनेंतर्गत जिल्ह्यामध्ये २०१५-१६ या वर्षात एकूण ८६ गावांची निवड करण्यात आली होती. या अभियानाच्या आराखड्यामध्ये एकूण १५४२ कामे प्रस्तावित होती. त्यापैकी १११९ कामे पूर्ण झाली आहेत. २०१५-१६ अंतर्गत निवडलेल्या ८६ गावांमध्ये पूर्वी एकूण पाण्याची गरज ९८५०२.६२ टीएमसी होती. या कामांमुळे त्या गावांची पाण्याची गरज ८७५८८.९० टीएमसी पर्यंत पूर्ण झालेली आहे. एका पाण्याने जाणाऱ्या धानाला जलयुक्त शिवारमुळे संजिवनी मिळाली आहे. २०१६-१७ मध्ये ५९ गावांचा समावेश आहे. या गावात १७२२ कामे होणार आहेत. या कामामुळे जलस्तर वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे.

## दृश्य परिणाम

महाराष्ट्र शासनाने दुष्काळावर मात करण्यासाठी सुरू केलेल्या जलयुक्त शिवार योजनेचे दृश्य परिणाम दिसायला सुरुवात झाली आहे. भंडारा जिल्ह्यात जलयुक्त शिवार योजनेत २०१५-१६ मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या ८६ गावे वॉटर न्युट्रल झाली आहेत. शिवारात पावसाचे पडलेले पाणी व अडवलेले आणि जिरवलेले पाणी यांचा ताळेबंद करण्याची पद्धत जलयुक्त शिवारमध्ये ठरवून दिली आहे. त्यानुसार गावाची सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता जलयुक्त शिवारच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामामुळे पावसाच्या पाण्याचा जमाखर्च व ताळेबंद तयार करणे म्हणजेच वॉटर न्यूट्रल टक्केवारी होय.

## मनरेगा : भंडारा जिल्हा राज्यात अव्वल

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची अंमलबजावणी करताना मजुरांना मजुरीचे विहित वेळेत वाटप करणे कायद्याने बंधनकारक आहे. यास शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून यामध्ये भंडारा जिल्हा राज्यात अव्वलस्थानी आहे. जिल्ह्यात ९३.५८ टक्के मजुरीचे विहित वेळेत वाटप करण्यात आले आहे. 'भंडारा पॅटर्न' राज्यात लागू करण्यात आला आहे. जिल्ह्यात आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये ९२ टक्के व आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये ९३.५८ टक्के मजुरी विहीत वेळेत प्रदान करण्यात आली. या वर्षाअखेर ५५ टक्क्यांपेक्षा जास्त मजुरांना विहित वेळेत मजुरी प्रदान करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष कार्यप्रणाली अवलंबिल्याने जिल्हा राज्यात पहिला आला आहे.

## राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमात जिल्ह्याने १५९ टक्के उद्दिष्ट पूर्ण केल्यामुळे, जिल्ह्यास राज्यात सर्वोत्कृष्ट बहुमान प्राप्त झाला आहे. २०१६-१७ मध्ये जिल्हा रुग्णालयाने २ हजार ३२ स्त्री शस्त्रक्रिया, २ हजार ११ पुरुष शस्त्रक्रिया व कुटुंब नियोजनासाठी प्रसुतिपश्चात ४४२५ महिलांना तांबी (पीपीआययूसीडी) बसवणे अशी कामगिरी केली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आतापावेतो वर्षामध्ये ५ हजार ३९८ रुग्णांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान

या अभियानासाठी शासनाने २०१६-१७ मध्ये १० जिल्ह्याची निवड केली होती. यात भंडारा जिल्ह्याचा समावेश होता. या अनुषंगाने जिल्ह्याने ३१ मार्च २०१७ पर्यंत संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला आहे. त्या दृष्टीने पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद भंडारा यांनी कृती आराखडा तयार केला आहे.

**- रवी गिते**
जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा






**महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे सर्वाधिक वनक्षेत्र असणारा जिल्हा अशी गडचिरोलीची ओळख सर्वांना आहे. कोकणचा प्रांत सोडला तर सर्वाधिक पाऊस पडणारा जिल्हा अशीही या जिल्ह्याची ओळख आहे. येथे प्रमुख पीक अर्थात धानाचे आणि तेदेखील एकहंगामी म्हणजे केवळ खरिपापुरते मर्यादित आहे. अशा या जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात मोठ्या प्रमाणावर विकास कामे झाली आहेत.**

# स्थैर्याकडून संपन्नतेकडे...

गडचिरोली जिल्ह्यात रब्बी गावांची संख्या १६५० पैकी केवळ १००. कारण बारमाही नद्या असून देखील सिंचनाची सोय या जिल्ह्यात नाही. सिंचनासाठी लागणारे मोठे प्रकल्प या जिल्ह्यात उभारण्यास वनक्षेत्र आणि पर्यावरण यांच्या खूप अधिक मर्यादा आहेत. त्यामुळे शेती एक हंगामी व उर्वरित आठ महिने रोजगार हमी असा पायंडा या जिल्ह्यात पडलेला होता. दुर्गम आणि आदिवासींच्या या जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या कारवाया होत राहतात. त्यामुळे विकासकामांवर मर्यादा निर्माण झाल्या आहेत. अशा स्थितीत राज्याची सत्ता मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला पहिला दौरा गडचिरोलीत करून गडचिरोलीचा प्राधान्यक्रम सर्वांना दाखवून दिला. विकासकामांना गतिमान केले.

## जलयुक्त शिवार अभियान लाभदायी

गडचिरोली जिल्ह्यात आरंभी सुरू झालेली जलयुक्त शिवार अभियानाची ही चळवळ शेतकऱ्यांना लाभदायी आहे, असे लक्षात येताच त्याचे रूपांतर लोकचळवळीत व्हायला वेळ लागला नाही. २०१५ सालच्या खरिप हंगामात पाऊस कमी पडला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या धानशेतीचे नुकसान झाले. मात्र जलयुक्त शिवार मोहिमेतून शेतात पिकांना तारणारा जलसाठा असणे याचे महत्त्व शेतकऱ्यांना माहिती होते. त्यामुळे जलयुक्त शिवार आणि त्या पाठोपाठ आलेल्या 'मागेल त्याला शेततळे' या उपक्रमांना शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला.

**“ जलयुक्त शिवार योजनेमुळे गडचिरोली जिल्हा एकहंगामी शेतीतून पुढे सरकत बहुहंगामी शेतीसोबत मत्स्यव्यवसायातही अग्रेसर ठरत आहे. सोबतच शेतकऱ्यांची वाटचाल स्थैर्याकडून संपन्नतेकडे होत आहे.**



**– राजे अम्ब्रीशराव आत्राम, पालकमंत्री, गडचिरोली ”**

कृषी विभाग, वन विभाग आणि जिल्हा परिषदेचा सिंचन विभाग या तिघांनी एकत्रितरीत्या मोठा पल्ला गाठला आहे. पहिला वर्षात जिल्ह्यातील १५२ गावांची निवड करण्यात आली होती. याअंतर्गत शेततळे, वनतळे आदी प्रकाराची ३७७१ कामे हाती घेण्यात आली. या माध्यमातून २,५६० हेक्टर क्षेत्रात संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली. याच अंतर्गत २०१६-१७ मध्ये १६९ गावात ६६६९ कामांची निवड करण्यात आली. यापैकी ३६७४ कामे पहिल्या टप्पात सुरू झाली यातून ३२८८ कामे पूर्णदेखील झाली आहेत.

## मागेल त्याला शेततळे

'मागेल त्याला शेततळे' योजनेतून शेततळ्यासाठी तब्बल ४२९० शेतकऱ्यांनी अर्ज केले. यातील १५०० कामे निवडून त्यातील ११७१ कामांना सुरुवात करण्यात आली. आजमितीस यापैकी १०९० कामे पूर्ण झाली आहेत. जिल्ह्यात सिंचनक्षमता वृद्धीसाठी उर्वरित शेतकऱ्यांना धडक सिंचन विहीर आणि मागेल त्याला विहीर मोहिमेत सामावून घेण्यात येत आहे. अशा ५००० विहिरींची कामे जिल्ह्यात सुरू आहेत. सिंचनवृद्धीच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील माजी मालगुजारी अर्थात मामा तलाव दुरुस्ती आणि गाळ काढणे या मोहिमांनाही वेग देण्यात आला.

गावागावात शेतांमध्ये निर्माण झालेल्या या पाणीसाठ्यांमुळे अनेक गावात खरिपानंतर रब्बीच्या पेरण्याही मागील हंगामात झाल्या. सोबतच मासेमारी करणारा समाज जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. या सर्वांना उत्पन्नाचे नवे साधन या तलावांनी प्राप्त करून दिले. संरक्षित सिंचन सुविधा विस्तारातून शेतकरी कर्जमुक्त होतील. शिवाय ते संपन्न आणि समृद्ध होतील. याची प्रचिती गडचिरोलीमध्ये जलयुक्त शिवारामुळे बघायला मिळत आहे.

**– प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली



रोजगार हमी योजनेंतर्गत काम करताना मजूर.




**राज्याच्या अतिपूर्वेकडे असलेला गोंदिया दुर्गम, आदिवासीबहुल आणि नक्षलदृष्ट्या संवेदनशील जिल्हा म्हणून ओळखला जातो. अशा या जिल्ह्याच्या विकासात आणि मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरली. त्यामुळे ही योजना विकास आणि रोजगारासाठी आधारवड ठरली आहे.**

# रोजगाराचा आधारवड

गोंदिया जिल्ह्याने मनरेगा योजनेत अतिशय उत्तम काम केले आहे. केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने या योजनेंतर्गत उत्कृष्ट कार्य केलेल्या देशातील ज्या १७ जिल्ह्यांची निवड केली, त्यामध्ये गोंदिया जिल्हा देशात दहाव्या तर राज्यात प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराचा मानकरी ठरला.

जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक ०.७०१ इतका असून मानव विकास निर्देशांकात गोंदिया जिल्हा राज्यात २१व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जिल्ह्यातील अनेक कुटुंबे डिसेंबर ते जून या काळात रोजगारानिमित्त स्थलांतर करतात. कामानिमित्त होणारे स्थलांतर रोखून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासोबत विकास कामे करण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले. डिसेंबर २०१५ ते जून २०१६ या कालावधीत प्रत्येक दिवशी ९० हजार मजुरांच्या हाताला रोजगार हमी योजनेतून काम मिळेल अशी व्यवस्था केली. जिल्ह्यातील मजुरांना या कालावधीत जिल्ह्यातच रोजगार उपलब्ध झाल्यामुळे कामानिमित्त होणारे स्थलांतर थांबवण्यास ही योजना यशस्वी तर ठरली आहे.



**“ गेल्या वर्षी २ लाख २५ हजार ५४१ कुटुंबातील ६ लाख ३९ हजार ७६२ व्यक्तींनी रोजगार मिळण्यासाठी नोंदणी केली. यापैकी १ लाख ७ हजार ५३३ कुटुंबातील १ लाख ९८ हजार ३९ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. जिल्ह्यातील २१ हजार ५८ कुटुंबांना शंभर दिवस रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. या मजुरांना इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या १९ विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात आला.**

**– राजकुमार बडोले, पालकमंत्री, गोंदिया ”**

## रोहयोच्या कामातून रोजगार

२०१५-१६ या वर्षात रोहयोच्या कामातून जिल्ह्यात ६९ लाख ५७ हजार मनुष्य दिवस निर्मिती झाली. यामध्ये सालेकसा, देवरी, अर्जुनी/मोरगाव आणि सडक/अर्जुनी या नक्षलदृष्ट्या संवेदनशील तालुक्यात सर्वात जास्त मनुष्य दिवस निर्माण झाले. याच काळात अनुसूचित जाती व जमातीच्या कुटुंबासोबतच महिलांनासुद्धा मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी सरपंच मेळावे, ग्रामरोजगार सेवकांचे मेळावे घेण्यात आले. याशिवाय या योजनेतून सिंचन विहिरी, शौचालय बांधकाम करण्यासाठी लाभार्थ्यांनासुद्धा मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ‘एक दिवस मजुरासोबत’ हा कार्यक्रम प्रभावीपणे राबवण्यात आला. याशिवाय या योजनेतून सिंचन विहिरी, शौचालय बांधकाम, करण्यासाठी नागरिकांनासुद्धा मार्गदर्शन करण्यात आले. इंदिरा आवास योजनेची ३९७४ घरकुले बांधण्यात आली. ७०३७ कुटुंबाकडे शौचालये बांधण्यात आली. त्यामुळे नागरिकांना हक्काचा निवारा सोबतच शौचालयाची सुविधा उपलब्ध झाली. ग्रामपंचायतीसाठी जिल्ह्यात राजीव गांधी सेवा केंद्राच्या २४ इमारती उभारण्यात आल्या. याच काळात २६९९ पांदण रस्ते तयार करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतातील उत्पादित माल घर व बाजारपेठेपर्यंत सहजपणे पोहोचवण्याची सुविधा उत्पन्न झाली. सोबतच ६००० छोट्या वस्त्या, टोले-पाडे जोडण्यात आले. हा जिल्हा ५० टक्क्यांपेक्षा जास्त वनव्याप्त असल्यामुळे या क्षेत्रात राहणाऱ्या कुटुंबांना, वन तलावाचे बांधकाम व खोल सलग समतल चरांचे खोदकामे या योजनेतून; रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. मजुरांच्या मजुरीस होणारा विलंब रोखण्यासाठी ग्राम रोजगार सेवकांना दर १५ दिवसांनी प्रशिक्षण देऊन त्यांना माहिती देण्यात आली.

**– विवेक खडसे**

जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया



नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीमध्ये वस्त्रोद्योग उद्यानाच्या उद्घाटनानंतर वस्त्रोद्योग प्रकल्पाची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

**विपुल वनसंपदा, समृद्ध वन्यजीवनासाठी सुपरिचित असलेल्या अमरावती जिल्ह्यात विकास आणि पर्यावरणाचा समतोल साधत औद्योगिक व कृषी विकासासाठी शासनाने अनेक पावले उचलली आहेत. त्यामुळे सिंचन आणि आरोग्य सुविधांबरोबरच कृषी, आदिवासी विकास, पर्यटन, उद्योग, रोजगारनिर्मिती अशा विविध क्षेत्रात चांगले परिणाम दिसू लागले आहेत.**

# परिपूर्ण आणि समतोल

जलयुक्त शिवार योजनेद्वारे अमरावती जिल्ह्यात ५०६ गावात २२४ कोटी रुपये खर्चून शेतकऱ्यांसाठी शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. यंदा २४३ हून अधिक गावात कामे सुरू आहेत. त्यामुळे ६७१२८ टीसीएम सिंचन क्षमता निर्माण होऊन, १७ हजार ७७८ कृषी पंपांना वीज जोडणी दिल्याने; रब्बी पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. २०१६-१७ मध्ये त्यापूर्वीच्या तुलनेत रब्बी क्षेत्रात सुमारे २१ हजार हेक्टरची वाढ झाली. मागेल त्याला शेततळे योजनेचा लाभ ४०२२ शेतकऱ्यांना होणार असून, त्यापैकी सुमारे १२०० कामे पूर्ण झाली आहेत. एकात्मिक पाणलोट विकास क्षेत्र योजनेत ३०४ गावांना व सव्वा लाख हेक्टरहून अधिक क्षेत्राला लाभ होत आहे.

गतवर्षी १ लाख ६५ हजार शेतकऱ्यांना १४११ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले आहे. वेळेवर कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ देण्यात येत आहे. त्याचा लाभ सुमारे ४० हजार शेतकऱ्यांना झाला आहे. कर्जमाफीचा लाभ सुमारे सव्वा लाखाहून अधिक शेतकऱ्यांना देण्याची कार्यवाही होत आहे.



**“ मेळघाटातील कुपोषणावर मात करण्यासाठी धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात अद्ययावत यंत्रणा, पाड्यापाड्यांवर प्रशिक्षित आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका व आरोग्यसेवक यांची समन्वय यंत्रणा, बाईक ॲम्ब्युलन्स आदी आरोग्य सुविधांबरोबरच रोजगारनिर्मिती, शिक्षण यावरही भर देण्यात येत आहे. टेलिमेडिसिनद्वारे रुग्णांना थेट अमरावती सुपर स्पेशालिटी रुग्णालय तसेच मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलसोबत जोडले आहे. सुमारे ४ हजार रुग्णांनी आतापर्यंत त्याचा लाभ घेतला.**

**– प्रवीण पोटे-पाटील, पालकमंत्री, अमरावती ”**

## वरुडला संत्रा प्रक्रिया उद्योग

जिल्ह्यातील संत्रा पिकाचे मोठे उत्पादन लक्षात घेऊन संत्र्यावरील बहुविध पदार्थ प्रक्रियेसाठी वरुड येथे संत्रा प्रकल्प उभारण्यात आला आहे.

## सामायिक सुविधा केंद्र

समूह विकास योजनेत अमरावती येथे रेडिमेड गार्मेंट, दर्यापूर येथे मध प्रक्रिया उद्योग, परतवाडा येथे फर्निचर निर्मिती, अचलपूर येथे लाखेच्या बांगड्या तयार करणे व अमरावती येथे सोलर चरख्यापासून सूत तयार करण्याचा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. खादी व ग्रामोद्योग कार्यालयातर्फे जिल्ह्यातील १३ गावांतील ११३ महिला बचत गटांना सोलर चरखा वाटप करण्यात आले आहे. यामुळे सुमारे ३०० सूक्ष्म व लघुउद्योगांना सामायिक सुविधा केंद्राचा थेट फायदा मिळणार आहे.




## मेळघाटात डिजिटल सुविधा

मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशनच्या सहकार्याने मेळघाटातील हरिसाल हे गाव डिजिटल व्हिलेज म्हणून घोषित करण्यात आले आहे. टेलिमेडिसिन केंद्र, डिजिटल क्लासरूम, यासह सगळे व्यवहार डिजिटल माध्यमातून करण्याची सोय या वाय-फाय गावात झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या प्रकल्पाची वाखाणणी केली आहे. देशातील नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देणाऱ्या 'न्यू बिगिनींग' पुस्तिकेतही हरिसालचा उल्लेख आहे.

## अत्याधुनिक सुविधा



हैदराबाद येथील एल.व्ही.प्रसाद नेत्रालयाने नेत्र तपासणीच्या अत्याधुनिक सुविधा येथे उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे मातामृत्यू आणि बालमृत्यूच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे. गतवर्षी रुग्णालयात भरती झालेल्या ३१३ बालकांपैकी २३६ बालकांच्या वजनात १५ टक्क्यांहून अधिक वाढ दिसून आली. कुटुंबाच्या स्थलांतरामुळे मेळघाटातील बालके देखरेखीबाहेर जातात व उपचारात खंड पडतो म्हणून कुटुंबाला गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## पर्यटन विकास व रोजगार

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेतून वनालगतच्या क्षेत्रातील ४० गावांमध्ये एलपीजी गॅसवाटप, सौर दिवे, स्वच्छतागृहे, कौशल्य विकास, निर्धार चूलवाटप यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गावकऱ्यांचे वनांवरील अवलंबित्व कमी व्हावे व वने सुरक्षित राहावीत, हा त्यामागील हेतू आहे.

पर्यटन विकासांतर्गत ३०९ स्थानिक युवकांना आदरातिथ्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. चिखलदरा व हरिसाल येथे नवे टुरिझम गेट स्थापण्यात आले आहे. मॉन्सून ट्रेकच्या आयोजनातून पर्यटन व स्थानिक रोजगारनिर्मितीचा प्रयत्न आहे.

## राज्यातील पहिले बांबू उद्यान

बांबूच्या ६३ विविध प्रजातींचा समावेश असलेले महाराष्ट्रातील पहिले बांबू उद्यान अमरावतीत वडाळी परिसरात उभारण्यात आले आहे. राज्यातील सर्वात सुंदर व देखणे असलेले हे ४९ हेक्टरमध्ये उभारलेले बांबू उद्यान अमरावतीच्या वैभवात भर टाकणारे आहे.

## करिअर समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र

राज्य शासन व टाटा ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने 'फ्युसल' या संस्थेमार्फत राज्यातील पहिले करिअर समुपदेशन व मार्गदर्शन केंद्र अमरावती येथे सुरू करण्यात आले आहे. कौशल्य विकास विभागातर्फे प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्ह्यात ३ हजार ५७० तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सध्या २ हजार ८८० तरुणांचे प्रशिक्षण सुरू आहे.

## संतांच्या शिकवणीचा प्रसार

तिवसा तालुक्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या श्रीक्षेत्र मोझरीच्या विकासासाठी १५० कोटी, विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान, श्रीक्षेत्र कौंडण्यपूरच्या विकासासाठी २० कोटी, अमरावती तालुक्यातील संत गाडगेबाबांची निर्वाणभूमी वलगावच्या विकासासाठी ३७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमधून याठिकाणी भेट देणाऱ्या नागरिकांसाठी चांगल्या दर्जाच्या सोयी-सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे.

## वस्त्रोद्योग पार्क

कापसावर प्रक्रिया करण्यासाठी नांदगाव पेठ येथे ५०० हेक्टरवर वस्त्रोद्योग पार्क उभारण्यात आला आहे. तिथे पायाभूत सुविधांसाठी १२० कोटी रुपये देण्यात आले आहेत. रेमंड्स, डेनिम यांच्यासह सियाराम सिल्क मिल्स, सूर्यलक्ष्मी कॉटन मिल्स, गोल्डन फायबर, फिनले मिल्स यासारखे नामांकित प्रकल्प अमरावतीत येत आहेत. आजमितीला चार उद्योग सुरू झाले असून, ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन १२०० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. मुंबई येथे झालेल्या 'मेक इन इंडिया वीक'मध्ये रेमंड्स, डेनिम आणि पेप्सी कोला या कंपन्यांसोबत २ हजार कोटींचे सामंजस्य करार झाले आहेत. औद्योगिक विकासामुळे अमरावती शहराची होणारी वाढ लक्षात घेता रस्ते आणि उड्डाणपूल आदी पायाभूत सुविधांसाठी सुमारे २२७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**- हर्षवर्धन पवार**
जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती

# सन्मान आणि समाधान

**यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना प्रभावीरीत्या राबवल्या जात आहेत. चेतना अभियानाच्या माध्यमातून त्यांचे मनोबलही वाढवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. यामुळे गेल्या तीन वर्षांपासून शेतकरी आत्महत्येचे प्रमाण कमी झाले आहे.**

दस्तऐवजांचे संगणकीकरण व डिजिटल प्रमाणपत्र वाटपात यवतमाळ जिल्हा राज्यात अव्वल आहे. या जिल्ह्यात ई - डिस्ट्रिक्टची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध डिजिटल प्रमाणपत्र वाटपामध्ये जिल्ह्याने राज्यात सर्वात प्रथम १० लक्षांचा आकडा गाठला. डिजिटल प्रमाणपत्र वाटपाचा हा आकडा आता १५ लक्षाच्या वर आहे.

नागरिकांचे माहितीच्या अधिकाराचे अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जात आहेत. सप्टेंबर २०१६ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ तहसील कार्यालय आणि यवतमाळ नगरपरिषद कार्यालयामध्ये प्रायोगिक तत्त्वावर ही सेवा सुरू करण्यात आली. कार्यालयात प्राप्त होणारे ऑनलाइन अर्ज / अपील अर्ज संबंधित जनमाहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या लॉग-इन आयडीवर पाठविण्यात येतात. जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत सर्व शाखा, विभागाकरीता एक समन्वय अधिकारी, १० प्रथम अपिलीय अधिकारी व २० जनमाहिती अधिकारी यांचे लॉग - इन खाते उघडण्यात आले आहे.

## ई-महाभूमी

राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम ई-महाभूमी जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. भूमी अभिलेख विभागामध्ये मोजणीसाठी येणाऱ्या संपूर्ण कामकाजाचे संगणिकीकरण ई-मोजणी या कार्यक्रमाद्वारे करण्यात येत आहे. ई-चावडी आणि ई-फेरफार हे दोन उपक्रमसुद्धा राबवण्यात येत आहे. जुन्या नकाशांचे डिजिटायजेशन करून ई-नकाशा द्वारे ते कायमस्वरूपी जतन करण्यात येते. तालुका पातळीवरील महसूल आणि भूमी अभिलेख कार्यालयातील जमिनी आणि अधिकारी अभिलेखाविषयाची जुनी कागदपत्रे स्कॅन करून डिजिटल स्वरूपामध्ये ई-अभिलेख या कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. फेरफार अंतर्गत ऑनलाइन पद्धतीने ७/१२ उताऱ्यावर नोंद घेतली जात आहे. ऑनलाइन ७/१२ मिळणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये या संदर्भात जनजागृती करण्यासाठी ९९ टक्क्यांपेक्षा जास्त गावांमध्ये चावडी वाचन झाले आहे. जिल्ह्यात ७/१२ ची संख्या ६ लक्ष २० हजार २७५ आहे. जिल्ह्यात ई-फेरफार अंतर्गत ६ हजार २५४ नोंदणीकृत फेरफार व ५७ हजार ५७० अ - नोंदणीकृत फेरफार घेण्यात आले आहे.

## बळीराजा चेतना अभियान

हे अभियान २०१५ पासून राबवण्यात येत आहे. या अंतर्गत आतापर्यंत १ हजार ८४८ ग्रामस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कीर्तनकार, प्रबोधनकार, प्रवचनकार, व्याख्याते आदींनी शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्याचे काम हाती घेतले आहे. सामूहिक विवाह सोहळे आयोजित करून प्रति विवाह आयोजनाकरिता २० हजार रुपये व शेतकरी वधुपित्याला १५ हजार रुपये देण्याची योजना जिल्हास्तरावर तयार करण्यात आली आहे. शेतकरी कुटुंबातील कॅन्सरग्रस्त रुग्णाला बळीराजा चेतना अंतर्गत १० हजार रुपये प्रमाणे आर्थिक मदत देण्यात येते. सद्य:स्थितीत जिल्ह्यातील २५० पेक्षा अधिक कॅन्सरग्रस्त रुग्णांना २५ लक्ष रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. २०१६ मध्ये एम.बी.बी.एस.च्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या शेतकरी कुटुंबातील पाल्यांना ३० हजार रुपये प्रमाणे ११ विद्यार्थ्यांना २.५० लक्ष रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. जिल्ह्यातील १४२ आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ जिल्ह्यातील ३ लक्ष १३ हजार ७६४ शेतकऱ्यांना मिळणार आहे. जिल्हा मध्यवर्ती



**“ यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी व्हाव्या म्हणून विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. गेल्या तीन वर्षात शासन आणि प्रशासनाने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे यात घट झाली आहे. २०१५ आणि २०१६ या दोन वर्षांचा तुलनात्मक अभ्यास केला तर या कालावधीत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये तब्बल ३० टक्क्यांची घट झाली आहे. आत्महत्या कमी करण्यासाठी बळीराजा चेतना अभियानाच्या माध्यमातून विविध उपक्रम जिल्ह्यात सुरू आहेत.**

**- मदन येरावार, पालकमंत्री, यवतमाळ ”**




सहकारी बँकेच्या १ कोटी ५२ हजार २६९ सभासदांना अंदाजे १०६६ कोटी रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे दीड लक्षापर्यंत संपूर्ण कर्जमाफी मिळणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १ लक्ष ३३ हजार ८८५ तर दीड लक्ष रुपयांवरील कर्ज असणाऱ्या सभासदांची संख्या १८ हजार ३८४ आहे. तर राष्ट्रीयकृत बँकेचे सभासद १.६२ लक्ष आहे.

## प्रधानमंत्री मुद्रा बँक योजना



**संजय राठोड**
महसूल राज्यमंत्री

जिल्ह्यात प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेंतर्गत शिशू, किशोर व तरुण गटात कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. राष्ट्रीयकृत बँकेच्या एकूण १६७ शाखा जिल्ह्यात आहे. १ एप्रिल २०१६ पासून जुलै २०१७ अखेरपर्यंत जिल्ह्यात शिशू गटात १० हजार ५६७ खातेदारांना ३८ कोटी ४८ लक्ष रुपये कर्ज वाटप, किशोर गटात ३ हजार ३६५ खातेदारांना ४६ कोटी ४३ लक्ष रुपये तर तरुण गटात २६९ खातेदारांना १८ कोटी १६ लक्ष रुपये वाटप करण्यात आले आहे. अशा प्रकारे या योजनेंतर्गत शिशू, किशोर आणि तरुण या तीनही गटातील एकूण १४ हजार २०१ खातेदारांना १०३ कोटी ७ लक्ष रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे.

## धडक सिंचन विहीर कार्यक्रम

धडक सिंचन विहीर उपक्रमांतर्गत डिसेंबर २०१४ अखेर पूर्ण झालेल्या विहिरींची संख्या ७ हजार १६४ होती तर अपूर्ण विहिरींची संख्या ५ हजार ८३३ होती. अपूर्ण असेल्या विहिरींपैकी मागील तीन वर्षात म्हणजे जानेवारी २०१५ पासून आजपर्यंत ३ हजार २६० विहिरी पूर्ण करण्यात आल्या. यात धडक सिंचन विहिरींची संख्या १ हजार ५०३ तर नरेगामध्ये वर्ग करण्यात आलेल्या विहिरींची संख्या १ हजार ७५७ आहे. नरेगा अंतर्गत ५ हजार १८३ सिंचन विहिरी बांधण्यात आल्या.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात २०१४-१५ मध्ये ३६१ ग्रामपंचायतीमध्ये कामे करण्यात आली. यात १ लक्ष ६ हजार ४६३ मजुरांना रोजगार देण्यात आला. पूर्ण झालेल्या कामांची संख्या ७ हजार २२० असून त्यांना ५० कोटी ८१ लक्ष रुपये मजूरी देण्यात आली. २०१५-१६ मध्ये ६५५ ग्रामपंचायतीमध्ये १ लक्ष ६९ हजार १५ मजुरांना रोजगार देण्यात आला. पूर्ण झालेल्या कामांची संख्या ५ हजार ३२६ असून मजुरांना ७० कोटी ३६ लक्ष रुपये मजुरी देण्यात आली. तर २०१६-१७ मध्ये १०९२ ग्रामपंचायतीमध्ये २ लक्ष ८ हजार ३३८ मजुरांना रोजगार मिळाला. पूर्ण झालेल्या कामांची संख्या १५ हजार ६१४ असून मजुरी म्हणून ७२ कोटी २० लाख रुपये देण्यात आले.

## सौरऊर्जा कृषी पंप योजना

२०१५-१६ मध्ये संपूर्ण जिल्ह्यात १० हजार ५३ कृषी पंप विद्युत जोडणी करण्यात आली. २०१६-१७ मध्ये जिल्ह्यात ७ हजार २३६ तर चालू वर्षात जुलै अखेरपर्यंत ५८३ कृषी पंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. गत तीन वर्षात आतापर्यंत १७ हजार ८७२ कृषी पंप विद्युत जोडणी करण्यात आली आहे. सौर कृषी पंप ३२९ लाभार्थ्यांच्या शेतात सौर कृषी पंप लावण्यात आले आहेत.

## जलयुक्त शिवार कार्यक्रम

जलयुक्त शिवार अभियानाची यवतमाळ जिल्ह्यात चांगली फलश्रुती पहावयास मिळते. या अभियानांतर्गत झालेल्या सर्व कामातून नव्याने ७८ हजार ९३८ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला आहे. या पाणीसाठ्यातून जिल्ह्यात ६७ हजार ८८९ हेक्टर अतिरिक्त क्षेत्रावर संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. या कामामुळे जिल्ह्याच्या भूभर्ग जलपातळीत सरासरी ०.२९ मीटरने वाढ झाल्याचे निदर्शनास येते. सुरुवातीला जिल्ह्यातील ४१३ गावांपैकी ५८ गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जात होता. मात्र जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीनंतर या गावांपैकी ४६ गावे टँकरमुक्त झाली आहेत. २०१५-१६ मध्ये जलयुक्त शिवार अभियानासाठी संपूर्ण जिल्ह्यात ४१३ गावांची निवड करण्यात आली. यापैकी ३९५ गावांमध्ये १०० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.



## अमृत योजना

जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यात बेंबळा नदी प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील पाणी समस्येवर मात करण्यासाठी 'अमृत' योजनचे काम सुरू आहे. शहरातील नागरिकांना २४ तास पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने संपूर्ण शहरात व शहरालगतच्या भागात १९ पाण्याच्या टाक्या बांधण्यात येत आहेत. 'अमृत' योजना ही ३०९ कोटी रुपयांची असून, कामाला सुरुवात झाली आहे.

**- राजेश येसनकर**
जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ






**अकोला जिल्हा कापसाची महत्त्वाची बाजारपेठ म्हणून ओळखला जातो. कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग क्षेत्रात जिल्ह्याचा नावलौकिक आहे. मागील तीन वर्षांत विविध क्षेत्रात जिल्ह्याने केलेली प्रगती वाखाणण्याजोगी आहे. जिल्ह्यात शासनाचे महत्त्वाचे उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत.**


# संकल्पसिद्धी

जलयुक्त शिवार अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवले जात आहे. आतापर्यंत या अभियानातंर्गत २१६ पेक्षा जास्त गावात १०० टक्के काम पूर्ण झाले आहे. 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत जिल्ह्यात ६१६ शेततळ्यांचे काम पूर्ण झाले आहेत. जिल्हा प्रशासनाने दरवर्षी १० हजार शेततळी तयार करण्याचा संकल्प केला आहे. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

'सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रम' अंतर्गत जिल्ह्यात १२ प्रकल्प मंजुर करण्यात आले होते. त्यापैकी हिवरा व सुकळी प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित प्रकल्पांचे काम प्रगतिपथावर आहे. पूर्णा नदीवरील महत्त्वाकांक्षी नेर-धामणा या व्यतिरिक्त घुंग्घशी बॅरेज व कवठा बॅरेजमध्ये जून-२०१८ मध्ये प्रत्यक्ष जलसाठा निर्माण होईल.

## कृषिपंप वीज जोडणी

कृषिपंप वीज जोडणीबाबतही जिल्ह्यात प्रभावी काम झाले आहे.



**"जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये ज्ञानरचनावादी पद्धतीने वर्गखोल्यांची रचना व साहित्यनिर्मिती करून अध्यापन करण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करून विद्यार्थ्यांचे आकलन अधिक समृद्ध होण्याकरिता, जिल्ह्यात ५०० हून अधिक वर्गखोल्या डिजिटल करण्यात आल्या आहेत."**
**- डॉ. रणजीत पाटील, पालकमंत्री, अकोला**

मागील तीन वर्षात १२,९४५ कृषिपंप ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात आला आहे. एप्रिल-२०१८ पर्यंत कृषिपंपांना वीज जोडणीची प्रलंबित सर्व कामे पूर्ण केली जाणार आहे. धडक सिंचन विहीर मोहिमेंतर्गत २३१३ लाभार्थ्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे. ३१ जुलै २०१७ पर्यंत जिल्ह्यात ४६५ लाभार्थ्यांनी सौर ऊर्जा कृषिपंपासाठी अमानत रकमेचा भरणा केला असून ३९० सौर कृषिपंप आस्थापित करण्यात आले आहेत.

## आरोग्य तपासणी शिबिर

महात्मा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत जिल्ह्यातील १५ रुग्णालयात २३ हजार ३६८ रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. आतापर्यंत रुग्णांच्या उपचारासाठी ४६ कोटी ५० लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. जिल्ह्यात २२८ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले, त्यात ११ हजार ९४६ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

## रोजगाराची उपलब्धी

जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकरी व निर्यातक्षम कंपनी यांच्यामध्ये केळी पिकाची करार शेती हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येणार आहे. यामध्ये अकोट व तेल्हारा तालुक्यातील शेतकरी, महसूल प्रशासन, कृषी विभाग व आत्मा यांचा सहभाग राहणार आहे. केळी पिकाची करार शेतीमुळे केळीचे निर्यातक्षम उत्पादन तयार होणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना तसेच बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहे.

## विविध विकास कामे

अकोला शहराच्या विकासच्या दृष्टीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांचे रुंदीकरण व मजबुतीकरण यासाठी ५० कोटींची विकास कामे सुरू आहेत. 'अमृत' योजनेंतर्गत अकोला शहर पाणीपुरवठा विभागातील कामांसाठी पहिल्या टप्प्यात ११० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी मुख्यमंत्री यांच्या हस्ते ई-भूमिपूजन झालेल्या ८७ कोटी रुपयांच्या कामामधून महापालिका क्षेत्रात आठ ठिकाणी जलकुंभ बांधण्यात येणार आहेत. पाणी वितरण व्यवस्थेमध्ये २६५ किलोमीटर लांबीची जुनी पाइपलाइन बदलून एसडीपीई (पॉलिथीलीन पाइप्स बोथ हाय डेन्सिटी) व डीआय (डक्टाइल आयर्न पाइप) पद्धतीची १६१ किलोमीटर लांबीची पाईपलाइन टाकणे आदी कामे केली जाणार आहेत. मुलभूत सोयीसुविधा निधी अंतर्गत अकोला शहरात एल.ई.डी. पथदिवे प्रकल्प राबवण्याचे काम सुरू झाले. यामुळे संपूर्ण शहर रात्रीच्या वेळी प्रकाशमय होईल.

जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत अकोला जिल्ह्यासाठी मंजुरी प्राप्त भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या जिल्हास्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेचे ई-भूमिपूजन मुख्यमंत्री यांच्या हस्ते झाले. प्रयोगशाळेच्या बांधकामासाठी शासनाकडून रुपये २७.३४ लक्ष प्राप्त झाले असून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सांस्कृतिक घडामोडींना चालना मिळण्यासाठी जिल्हा क्रीडा संकुल समितीमार्फत अकोला शहरात सांस्कृतिक भवन (बहुउद्देशीय हॉल) उभारण्याचे काम सुरू आहे. ई-फेरफार आज्ञावलीची अंमलबजावणी सुरू करणारा अकोला हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे. ऑनलाइन सात-बाराचे काम पूर्ण झाले असून १५ ऑगस्ट २०१७ पासून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना संगणीकृत सात-बारा मिळणार आहे. ऑनलाइन सातबाराच्या प्रचार-प्रसारासाठी जिल्हाधिकारी हे १ ऑगस्ट २०१७ रोजी शेतकऱ्याच्या वेषभूषेत चांदूर या गावात सायकलने गेले. त्यानंतर गावात बैलगाडीने फिरले. ऑनलाइन सातबाराचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी जाणून घेतल्या.

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचे काम अकोला जिल्ह्यात गतीने सुरू आहे. अकोला येथील शिवणी विमानतळ विस्तारीकरणाचे कामही लवकरच पूर्ण केले जाणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनाचे तसेच अकोला पंचायत समितीच्या इमारतीचे काम पूर्ण झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रशस्त इमारतीचे काम सध्या वेगाने सुरू आहे. जिल्हा न्यायालयाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

**– प्रमोद धोंगडे**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला




# सिंचन प्रकल्प पूर्णत्वाकडे...

**जलयुक्त शिवार अभियान वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरले आहे. उलट्या बशीच्या आकारासारखी भौगोलिक ठेवण असलेल्या या जिल्ह्यात अनेक नद्यांचा उगम होत असला तरी, भौगोलिक रचनेमुळे या नद्यांवर मोठे प्रकल्प उभारणे शक्य नाही. अशा परिस्थितीमध्ये जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात विकेंद्रित पाणीसाठे निर्मितीचे काम मोठ्या जोमाने सुरू आहे.**

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्याच वर्षी म्हणजेच २०१५-१६ मध्ये जिल्ह्यातील २०० गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानाची ५ हजार २३ कामे पूर्ण करण्यात आली. त्यामुळे ३४ हजार टीसीएम अतिरिक्त पाणीसाठा निर्माण झाला आहे. सुमारे ३३ हजार हेक्टर क्षेत्राला संरक्षित सिंचनाची सोय झाली आहे. २०१६-१७ मध्ये निवडलेल्या १४९ गावांमध्ये १ हजार ८६६ कामे पूर्ण झाली आहे. त्याद्वारे १३ हजार टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला आहे. तसेच २०१७-१८ मध्ये निवडलेल्या १२० गावांमध्ये या अभियानातून आतापर्यंत ६०३ कामे पूर्ण झाली आहेत.

वाशिम तालुक्यातील तामसी येथे सुमारे ५ कोटी लिटर क्षमतेचे तळे लोकसहभागातून साकारले गेले. मंगरूळपीर तालुक्यातील शेलू बाजारमधील ग्रामस्थांनीही गावाजवळील अडान नदीचे खोलीकरण, रुंदीकरण करून गाव टंचाईमुक्त करण्याचा संकल्प पूर्णत्वास नेला आहे.

## धडक सिंचन योजना

'मागेल त्याला शेततळे' योजनेतून जिल्ह्याला १९०० शेततळ्यांचे उद्दिष्ट होते. मात्र याकरिता ३६८४ अर्ज प्राप्त झाले. आतापर्यंत यापैकी छाननी व तपासणी अंती १८८९ अर्जांना मंजुरी देण्यात आली असून यापैकी ७६८ शेततळ्यांचे काम पूर्ण झाले आहे. गत दोन वर्षांमध्ये जिल्ह्यात धडक सिंचन योजनेतून १०५६ सिंचन विहिरी व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ३ हजार ६४४ सिंचन विहिरी पूर्ण झाल्या आहेत.

विविध कारणांमुळे प्रलंबित असलेले जिल्ह्यातील २४ लघू पाटबंधारे प्रकल्प गेल्या दोन वर्षांमध्ये पूर्ण झाले आहेत. या प्रकल्पांमुळे ७६.०८१



शेततळे, आमखेडा, जि. वाशिम

दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) पाणीसाठा निर्माण होऊन १३ हजार ३२० हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

आगामी एका वर्षामध्ये ७ लघू पाटबंधारे योजनांचे काम पूर्ण होणार असून त्यामुळे २१.२४ दलघमी पाणीसाठा निर्माण होऊन ३५६४ हेक्टर क्षेत्राला सिंचनाची सोय होणार आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांच्या 'वॉर रूम प्रोजेक्ट'मधील पळसखेड व मिर्झापूर प्रकल्पांचा समवेश आहे.

जिल्ह्यात गत तीन वर्षांमध्ये विक्रमी ८ हजार ९६६ कृषिपंपांना वीज जोडणी देण्यात आली आहे. प्रलंबित वीज जोडण्या तातडीने देण्यासाठी पायाभूत आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

## कर्जमाफी

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेमुळे जिल्ह्यातील ५३ हजार ८३० शेतकऱ्यांच्या डोक्यावरील ५२९ कोटी १३ लाख रुपये कर्जाचा भार हलका होण्यास मदत होणार आहे.

## महाराजस्व अभियान

महाराजस्व अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंतर्गत जून महिन्यामध्ये महसूल राज्यमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील तीनही उपविभाग स्तरावर विस्तारित समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये दाखल झालेल्या तक्रारींवर पालकमंत्र्यांच्या समक्ष सुनावणी होऊन सुमारे ९०० तक्रारींचे निवारण करण्यात आले.

**"'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' अभियान जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरत आहे. या अभियानाच्या राज्यातील पहिल्या कामाची सुरुवात वाशिम जिल्ह्यातून झाली. जिल्ह्यात आतापर्यंत ११० तलावांमधील ५ लाख १२ हजार २९८ क्युबिक मीटर गाळ या अभियानांतर्गत उपसण्यात आला आहे. त्यामुळे साठवण क्षमतेत ५१२ टीसीएमने वाढ झाली असून, सुमारे ७०० हेक्टर शेतजमिनीमध्ये हा गाळ पसरला गेल्याने या जमिनीची सुपीकता वाढली आहे.**

**– संजय राठोड, पालकमंत्री, वाशिम"**



## शौचालयांची उभारणी

स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागात २०१५ पासून तब्बल ८३ हजार ६२६ वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम झाले आहे. नागरी भागात गेल्या दीड वर्षांमध्ये १० हजार ७२६ वैयक्तिक शौचालयांची उभारणी झाली आहे. नागरी भागात राबवण्यात आलेल्या विविध उपयायोजनांमुळे जिल्ह्यातील वाशीम, कारंजा व रिसोड नगरपालिका हागणदारीमुक्त झाल्या आहेत. केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया संस्थेच्या अवलानुसार या नगरपरिषदा हागणदारीमुक्त घोषित झाल्या आहेत. मंगरूळपीर नगरपरिषदविषयीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. ग्रामीण क्षेत्रात कारंजा तालुका हागणदारीमुक्त झाला असून तो अमरावती विभागातील पहिला तालुका ठरला आहे.

### प्रगतिपथावरील कामे

- ॲडव्हेंचर्स पार्क व प्लॅनेटोरियम निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात.
- टेम्पल गार्डनचा विकास
- मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत ११ रस्त्यांची कामे
- जल्हा क्रीडा संकुल येथे जलतरण तलावाची निर्मिती

## ग्रामविकास मॉडेल

मुख्यमंत्री विशेष साहाय्य निधीतून जिल्ह्याला मिळालेल्या २ कोटी रुपयांमधून कारंजा तालुक्यातील भामदेवी गावाचा सर्वांगीण विकास करून, या गावाला ग्रामविकासाचे मॉडेल बनवण्याचा प्रयत्न जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुरू आहे. गावातील व परिसरातील दुधाचे संकलन करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी या गावामध्ये दुग्धविकास सहकारी संस्थेच्या माध्यमातून १००० लीटर क्षमतेचे मिल्क प्रोसेसिंग युनिट उभारण्यात आले आहे. या माध्यमातून 'वऱ्हाड दूध' ब्रँड तयार करून विविध दुग्ध पदार्थांची निर्मिती करण्यात येत आहे.

नागपूर ते मुंबई दरम्यान प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र कृषी समृद्धी महामार्गाचा जवळपास १०० किलोमीटरचा टप्पा वाशिम जिल्ह्यातून जाणार असून दळणवळण सोय उपलब्ध झाल्याने जिल्ह्याच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जात असलेल्या पोहरादेवी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी रुपयांच्या आराखड्याला मान्यता दिली आहे.

**– तानाजी घोलप**
माहिती सहायक, वाशिम



अटल सौर कृषी पंप योजनेंतर्गत बसवण्यात आलेला सौर कृषी पंप.

**राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे माहेर आणि छत्रपती शिवरायांचे आजोळ असल्याने हा जिल्हा महाराष्ट्राचे मातृकूळ म्हणून सुपरिचित आहे. आंतरराष्ट्रीय भूगर्भ शास्त्रज्ञांचे आकर्षण ठरलेले आणि जगातील एकमेव खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर याच जिल्ह्यात आहे. विविध विकास कामांमुळे या जिल्ह्याने प्रगतीच्या दिशेने उंच झेप घेतली आहे.**




# उत्कर्ष आणि उन्नती

बुलडाणा जिल्ह्याची अर्थव्यवस्था संपूर्णपणे कृषीवर अवलंबून आहे. त्यातही मर्यादीत सिंचनाच्या सुविधा असल्यामुळे कोरडवाहू शेतीवरच शेतकऱ्यांची भिस्त. जिल्ह्यात शेतकरी समाधानी असेल, तर सर्व समाज घटक समाधानी असतात. हवामान बदलामुळे कृषी क्षेत्र विंवचनेत सापडले आहे. पावसाच्या अनियमिततेच्या चक्रामध्ये अडकलेल्या कृषी क्षेत्राला सिंचनाची शाश्वत सोय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यानुसार जलसंधारणाची कामे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गत तीन वर्षात झाली आहेत.

## जलयुक्त शिवार अभियान

भूजल पातळी वाढवून मोठ्या प्रमाणावर संरक्षित सिंचन उपलब्ध करून देण्याचे शासनाचे ध्येय आहे. त्यासाठी शासनाने महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियान सुरू केले आहे. जलयुक्त शिवार या अभियानांतर्गत जिल्ह्यात चांगली जलसंधारणाची कामे झाली आहेत. जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात ७७० गावांची निवड करण्यात आली आहे. २०१५-१६ मध्ये ३३० गावांमध्ये ८ हजार ९७४ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या योजनेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या विविध उपचारांमुळे २०१५-१६ वर्षामध्ये ४५ हजार २७० टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला. २० हजार पेक्षा जास्त हेक्टर क्षेत्रावर पिकांकरीता दोन वेळच्या संरक्षित सिंचनाची सोय उपलब्ध झाली आहे. ३८ हजार १२१ हेक्टर क्षेत्रावर एकवेळ संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. २०१६-१७ साठी दुसऱ्या टप्प्यात २४५ गावांची निवड करण्यात आली असून या गावांचा ३३७.२० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार २४५ गावांमध्ये जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. यामध्ये ४ हजार ९०८ कामे पूर्ण करण्यात आली असून १७२ कामे प्रगतिपथावर आहेत. २०१६-१७ मध्ये सलग समतल चर ३६, मातीनाला बांध ४४, माती-नाला बांध दुरूस्ती १२, ढाळीचे बांध ५०२, शेततळे २५०, सिमेंट बंधारे ३४३, तसेच ४ नवीन पाझर तलावांची निर्मिती या अभियानांतर्गत जिल्ह्यात करण्यात आली आहे. या कामांमुळे १ लक्ष ७१ हजार ७२ टीसीएम पाणीसाठा जिल्ह्यात निर्माण झाला आहे. तसेच ७ हजार २४१ हेक्टर क्षेत्रावर दोन वेळच्या संरक्षीत सिंचनाची व १२ हजार ६२५ हेक्टर क्षेत्रावर एक वेळच्या संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे.



**“ लोणार, छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ असलेले सिंदखेड राजा शहर व परिसर आणि श्री संत गजानन महाराज समाधिस्थळ असलेल्या शेगावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वंकष आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील विविध कामांना गती मिळेल.**

**– पांडुरंग फुंडकर, पालकमंत्री, बुलडाणा ”**

## कृषी पंप योजना

सौर ऊर्जेवर आधारित अटल सौर कृषी पंप योजनेला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. सौर ऊर्जेवर आधारीत ४६३ कृषि पंप जिल्ह्यात कार्यान्वित झाले आहेत. या पंपांचा उपयोग करून शेतकरी सिंचन करीत आहेत. त्याचप्रमाणे कृषी पंपासाठी २०१६-१७ मध्ये ९ हजार ३०३ कृषी वीज जोडण्यांचे उद्दिष्ट होते. त्यापैकी मार्च १७ पर्यंत जिल्ह्यात ७ हजार ४१ शेतकऱ्यांना जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्ह्यात आता मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे वाहिनीवर संपूर्ण रोहित्रच सौर ऊर्जेवर येणार आहे. जिल्ह्यात उद्योग वाढीसाठी मुंबईत आयोजित मेक इन इंडिया सप्ताहात राज्य शासनाने विविध उद्योग समूहांसमवेत सामंजस्य करार केलेले आहेत. त्यानुसार जिल्ह्यासाठी ४२ सामंजस्य करार

करण्यात आले. त्यापैकी ४ करारांनुसार उत्पादन सुरू झाले आहे. तर ३ करारांनुसार प्रकल्पाचे काम सुरू आहे.

## मागेल त्याला शेततळे

शेतकऱ्यांना शेतातच सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये शेततळे महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी 'मागेल त्याला शेततळे' योजना अमलात आणली आहे. या योजनेला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. योजनेनुसार शेततळ्यासाठी जिल्ह्यात ८ हजार ३३० ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. शासन निर्णयानुसार ६८३६ अर्ज पात्र ठरले आहे. तांत्रिकदृष्ट्या ५ हजार ६४४ शेततळ्यांची जागा योग्य असून ३९८२ शेततळ्यांना कार्यारंभ आदेश दिले आहे. कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांपैकी २०९८ शेततळी पूर्ण झाली आहेत. शेततळ्याचे ८००.१५ लाख रूपये अनुदानापोटी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. शासनाने मनरेगा अंतर्गत समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेमध्ये जिल्ह्यास ३३०० अहिल्यादेवी सिंचन विहिरींचे उद्दिष्ट दिले आहे. जिल्ह्यात दोन वर्षांमध्ये ९६० अहिल्यादेवी सिंचन विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत. नवीन १४०४ विहिरींना मंजुरी देण्यात आली आहे.

## समृद्धी महामार्ग



महामार्गाची ८७ किलोमीटरची लांबी जिल्ह्यात आहे. जिल्ह्यातील ४ तालुक्यांच्या ४९ गावांजवळून हा महामार्ग जात आहे. महामार्गाच्या संयुक्त मोजणीचे काम पूर्ण झाले आहे. या महामार्गावर जिल्ह्यात दोन ठिकाणी स्मार्ट शहरांची निर्मिती केली जाणार आहे. सिंदखेडराजा तालुक्यात सावरगांव माळ येथे जमिनीच्या हस्तांतरणाला शेतकऱ्यांनी मान्यता दिली आहे. या महामार्गामुळे जिल्ह्यातील मेहकर, सिंदखेडराजा, लोणार व देऊळगाव राजा तालुक्यांचा विकास होणार आहे.

## कृषी पीक विमा योजना

पिकांचा सर्वंकष विमा उतरवण्यासाठी प्रधानमंत्री कृषी पीक विमा योजना आणली आहे. या योजनेत ९ पिकांचा समावेश करण्यात आला आहे. २०१५-१६ मध्ये जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामासाठी ४.२३ लक्ष शेतकऱ्यांनी ३.२५ लक्ष हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा विमा उतरवला आहे. खरीप हंगामात बाधीत २.७६ लक्ष शेतकऱ्यांना १८४.३२ कोटी रुपयांच्या विम्याची रक्कम अदा करण्यात आली आहे. तसेच रब्बी हंगामात २७ हजार ६६० शेतकऱ्यांना १३.६२ कोटी रुपयांची रक्कम त्यांच्या बँक खात्यात अदा केली आहे. योजनेला शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. तसेच २०१६-१७ मध्ये खरीप हंगामात ३.८७ लक्ष शेतकऱ्यांनी ३.२६ लक्ष हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा विमा उतरवला आहे. शेतकऱ्यांप्रमाणे शेतकऱ्यांचे पशुधनही तेवढेच महत्त्वाचे आहे.

शासनाने यापुढे मानवाप्रमाणे जनावरांचाही विमा काढण्याचा निर्णय घेतला आहे. योजनेत सहभाग घेत जिल्ह्यात ११ हजार ९९७ जनावरांचा विमा उतरवला आहे. जिल्ह्यात ७ सर्व पशुचिकित्सालये कार्यान्वित आहेत. जिल्हा परिषदेंतर्गत १२२ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. पशुवैद्यकीय दवाखाने आयएसओ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ७ पशुवैद्यकीय दवाखाने आयएसओ मानांकित झाले आहे.

## आरोग्य सुविधा

दुर्धर आजारांमध्ये गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना महात्मा फुले जनआरोग्य अभियानाचा लाभ देण्यात येतो. जिल्ह्यात गतवर्षी या योजनेचा २४ हजार ५१९ रुग्णांना १० रुग्णालयांच्या माध्यमातून लाभ देण्यात आला आहे. त्यासाठी ९३.१९ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार योजनेचा शेतकऱ्यांना लाभ देण्यामध्ये बुलडाणा जिल्हा या १४ जिल्ह्यांमध्ये अव्वल ठरला आहे. जिल्ह्यात १० हजार २५४ शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान

राज्यामध्ये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' राबवण्यात येत आहे. त्यानुसार पंचायत समिती मलकापूर व शेगाव हागणदारीमुक्त झाली असून २८५ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त ठरल्या आहेत. जिल्ह्यात ३.६२ लक्ष कुटुंबांपैकी २.३६ लक्ष कुटुंबाकडे शौचालय आहेत. जिल्ह्याने यामध्ये ६५.१९ टक्के काम केले आहे. उर्वरित १.२६ लक्ष कुटुंबांना शौचालय बांधण्यास उद्युक्त करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे.

**- निलेश तायडे**
माहिती सहायक, बुलडाणा



जलयुक्त शिवारचे यश




# उज्ज्वल 'उडान'

**नांदेड जिल्हा हा मराठवाडा विभागातील ऐतिहासिक जिल्हा म्हणून ओळखला जातो. गोदावरी नदीवरील हा जिल्हा मध्यवर्ती क्षेत्र असल्याने त्यास गोदावरीचे नाभिस्थान मानले जाते. श्री गुरु गोविंद सिंघजी यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या या भूमीस शिख धर्माच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने गेल्या तीन वर्षात अनेक योजना राबवून प्रकल्पांना गती दिली आहे.**

आदिवासी समाजापर्यंत विकासाच्या विविध योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी किनवट व माहूर तालुक्यातील काही गावांमध्ये पेसांतर्गत ग्रामसभांचे अधिकार बळकट करण्यात आले आहेत. याद्वारे आदिवासी नागरिकांच्या निरंतर विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत.

पेसाअंतर्गत विविध विकास योजनांसह गावात कुपोषण मुक्तीसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. राज्यपाल चे. विद्यासागर राव यांनी दत्तक घेतलेल्या किनवट तालुक्यातील जवरला या गावात विविध योजनातील लाभार्थ्यांना योजनेशी निगडित लाभ प्रदान केले आहेत. या कायद्यामुळे आदिवासींना अधिसूचित क्षेत्रातील विविध बाबींचे हक्क प्राप्त झाले आहेत.



**"मानवी अवयवांच्या वाहतुकीसाठी ग्रीन कॉरिडॉर म्हणजे जलदगती सुविधा उपलब्ध करून देण्यात नांदेड यशस्वी झाले आहे. प्रशासनाच्या तत्परतेने श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळावरून मुंबईकडे हृदय तर पुण्याकडे यकृत रवाना करण्यात आले. येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने अवयवदानासाठीच्या सुविधा उपलब्ध करून; अवयव प्रत्यारोपणासाठी पाठवण्याची प्रक्रिया महानगरानंतर पहिल्यांदाच यशस्वी करून दाखवली आहे.**

**– अर्जुन खोतकर, पालकमंत्री, नांदेड"**

## जैवविविधता उद्यान

नांदेड शहरापासून ८ किमी अंतरावर असलेले बोंडार येथील स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान हे पर्यटन स्थळ बनत आहे. सामाजिक वनीकरण विभागाच्या १० हेक्टर क्षेत्रावर हे उद्यान उभारले आहे. नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, निसर्गप्रेमी या उद्यानास आवर्जून भेट देवून जैवविधितेचा अनुभव व आनंद घेऊ शकतात. एकूण २७ प्रजातीचे २७९ वृक्ष, करंज वन, निम वन, ऑक्सीजन वन, डिंक वन, आम्रवन, जांभूळ वन, जांब वन, आवळा वन, बांबू वन, नक्षत्र वन, औषधी वन, बाल उद्यान या बरोबरच दहा प्रकारच्या प्रजातीच्या वृक्षाची लागवड केलेले तुळशी वृंदावन यासारख्या विविधतेने हे उद्यान नटलेले आहे.

## नागरी स्वच्छतेत आघाडी

स्वच्छ भारत अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यात ग्रामीण भागात शौचालय नसलेल्या कुटुंबांसाठी २०१५-१६ मध्ये ३६ हजार ८३१, २०१६-१७ मध्ये ५६ हजार १०७, चालू वर्षात ८ हजार ४८ असे एकूण १ लाख ९८६ शौचालयांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. ग्रामीण तसेच नागरी भागात स्वयंत्स्फुर्त महास्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. जिल्हाभरात स्वयंसेवी संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संघटनांचाही या अभियानात सहभाग घेण्यात आला आहे. त्यामुळे हे अभियान यशस्वी ठरले आहे.

## वृक्षलागवड

शासनाने १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी किमान दोन कोटी

वृक्षलागवड करण्याचे नियोजन केले होते. जिल्ह्याला ६ लाख ३५ हजार रोपे लागवड करण्याचे उद्दिष्ट दिले होते. हे उद्दिष्ट पूर्ण करून ६ लाख ६२ हजार रोपांची लागवड करण्यात आली आहे. तसेच १ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत १२ लाख ४५६ रोपे लागवड करण्याचे उद्दिष्ट होते. त्यापेक्षा जास्त १७ लाख ७८६ लाख रोपे लागवड करण्यात आली आहे. सरदार सरोवर प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर वनजमीन गेली आहे. त्यात लाखो विविध प्रकारची झाडे नष्ट झाली होती. त्याची भरपाई म्हणून गायरान जमिनीवर वन विभागाने पर्यायी वनीकरण सुरू केले आहे. यात हदगाव तालुक्यातील कोहळी येथे ५४० हेक्टर खडकाळ जमिनीवर नंदनवन फुलले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेती उत्पादनात मोठा फायदा होत आहे.

## डिजीधन मेळावा




राज्यात डिजीधन मेळावे आयोजन करण्यासाठी ८ जिल्ह्यांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये विभागस्तरावर नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली होती. नागरिकांमध्ये कॅशलेस व ऑनलाइन व्यवहार करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरामध्ये डिजीधन मेळाव्यात विविध प्रकारचे ६३ स्टॉल उभारण्यात आले होती. या मेळाव्यासाठी ६ हजार ८०० नागरिकांनी सहभाग नोंदवला. यावेळी कॅशलेस संदर्भात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होती.

## जलयुक्त शिवार अभियान

नांदेड जिल्ह्यात २०१५-१६ मध्ये जिल्ह्यात २६१ गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियान राबवण्यात आले. २०१६-१७ मध्ये २२६ तर या चालू वर्षात १८३ गावात अशा प्रकारे एकूण ६७० गावांची निवड करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार अभियानातील कामांमुळे पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. उगम ते संगम नाला-नदी पुनरूज्जीवनात जिल्ह्यातील ४१ नाल्यांची निवड करण्यात आली. या नाल्यावरील दीडशे गावांना या पुनरुज्जीवनाचा लाभ झाला. लोकसहभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्या पुढाकारामुळे ही कामे पूर्णत्वाकडे जाऊ लागली आहेत. अशा रीतीने सुमारे १०२.१६ किमीचे काम पूर्णत्वाकडे गेले आहे. जलपुनर्भरण स्तंभ (रिचार्ज शॉफ्ट) हा नवीन पॅटर्नच नांदेड जिल्ह्याने राज्याला दिला आहे. यामुळे विविध स्रोतांचे पुनर्भरण शास्त्रीय पद्धतीने करणे शक्य झाले. जिल्ह्यात टंचाईच्या काळात सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे याद्वारे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात आला. यामध्ये साधारणपणे १०० कामे पूर्ण झाली आहेत.

## ग्रामीण रोजगार हमी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून मोठ्या प्रमाणात कामे सुरू करण्यात आली आहेत. यात प्राधान्याने अहिल्यादेवी सिंचन विहीर, अमृतकुंड शेततळे, भुसंजीवनी नाडेप कंम्पोस्टींग, वर्मी कंम्पोटींग, फळबाग लागवड आदी कामांचा समावेश आहे. जिल्ह्यात साधारणत: ७ हजार ७८५ सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्यात आली असून ३ हजार ९७२ कामे प्रगतिपथावर आहेत. शेततळ्यांची ९०० कामे पूर्ण करण्यात आली असून ४१५ कामे प्रगतिपथावर आहेत.

## उज्ज्वल नांदेड

स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रातही प्रगती करण्यासाठी नांदेड जिल्ह्याने जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'उज्ज्वल नांदेड' अंतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या उपयुक्त पद्धतीने करण्यात येत आहे. जिल्हा नियोजन समितीकडून नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, सेतू समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राबवण्यात येते. नांदेड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेत सहभाग वाढवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## 'उडान'मुळे विमानसेवा

उडान या केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या महत्त्वाकांक्षी क्षेत्रीय संपर्क योजनेतील नांदेड-हैद्राबाद विमानसेवेचा प्रारंभ, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओलिंकिंगद्वारे शिमला येथून २७ एप्रिल २०१७ रोजी करण्यात आला. या योजनेद्वारे देशाचे अनेक भाग हवाई मार्गाने जोडून देशाची एकात्मता आणखी दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भारताकडे हवाई क्षेत्राच्या विकासाबरोबरच पर्यटन, औद्योगिक, व्यापार, शिक्षण अशा क्षेत्रातील अमर्याद संधी खुल्या होत आहेत.

## श्रीक्षेत्र माहूरगड पर्यटन विकास

श्रीक्षेत्र माहूरगड विकासाच्या ७९ कोटी रुपयांच्या आराखड्यास पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने मंजुरी दिली आहे. मंजूर विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी २४ लाख ७१ हजार कोटी निधी शासनाकडून प्राप्त झाला असून त्यातून श्रीक्षेत्र माहूरगड विकास प्राधिकरणाने २३ लाख ५८ कोटीची विकास कामे पूर्ण केली आहेत. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने ३१ मार्च २०१७ रोजी निर्णय घेऊन २१६.१३ कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता दिली आहे.

**– अनिल आलुरकर**
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड




जलयुक्त शिवार अभियानाची फलश्रुती




# समृद्ध आघाडी

**मागील तीन वर्षात जलसंधारण, आरोग्य, कृषी आणि विविध पायाभूत सुविधा यामध्ये लातूर जिल्ह्याने उत्कृष्ट काम केले आहे.**

सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र-२०१९ अंतर्गत जलयुक्त शिवार अभियानाची लातूर जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे. २०१३ ते जून २०१६ पर्यंत जिल्ह्यात टंचाईची भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. २०१४-१५ पासून शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार अभियान ह्या महत्त्वाकांक्षी उपक्रमात लातूर जिल्हा प्रशासन व नागरिकांचा सक्रिय सहभाग घेऊन जिल्ह्यात जलसंधारणाची विविध कामे मोठ्या प्रमाणावर घेण्यात आली.

## मांजरेचे खोलीकरण

मांजरा नदीच्या पाच कि.मी. पर्यंतच्या खोलीकरण आणि रुंदीकरणाच्या कामास मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून पाच कोटी ९५ लाखापैकी तीन कोटी रुपये उपलब्ध झाले होते. या नदीच्या पुनर्जीवीकरण कामाच्या माध्यमातून मांजरा नदी पात्रातील (साई ते नागझरी व नागझरी वरच्या टोकापासून कारसा पोहरेगावकडून टाकळी च्या दिशेने) असे एकूण २,०४,७६६ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. हा गाळ परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतासाठी देण्यात आला ज्यामुळे शेजारच्या एकूण २० गावातील शेतकऱ्यांची जमीन सुपीक



**“जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात २०२ गावांची निवड करून त्यामध्ये जलसंधारणाची पाच हजार ८१९ कामे पूर्ण केली आहेत. लोकसहभागातून ६७ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. शासकीय यंत्रणा व लोकसहभागातून २१४ किलोमीटरपर्यंतचे नालाखोलीकरण व रुंदीकरणाचे कामे झाल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण क्षमतेत वाढ झाली आहे. अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात १७६ गावांची निवड होऊन विविध यंत्रणांनी दोन हजार १३५ कामे पूर्ण केली आहेत.**

**- संभाजी पाटील-निलंगेकर, पालकमंत्री, लातूर”**

झाली. या कामामुळे शिवारातील एकूण ५०० हेक्टर जमीन क्षेत्र हे सिंचनाखाली आले. ज्याचा फायदा २० गावातील शेतकऱ्यांना झाला असून त्यामुळे नदी पात्रात सुमारे २०४ टि.सी.एम. एवढा जास्तीचा पाणीसाठा झाला आहे. ज्यामुळे लातूर शहरास पाणीपुरवठा योजनेच्या पूरक स्रोतामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

## विकास कामात आघाडी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात विविध कामावर २०१६-१७ मध्ये ७९ कोटी ८६ लाखांचा निधी खर्च झाला आहे. या वर्षाकरिता ३३ हजार ३९६ कामांचा शेल्फ उपलब्ध आहे. त्याप्रमाणेच या अंतर्गत जिल्ह्यात वैयक्तीक सिंचन विहीरींची एक हजार २७४ कामे पूर्ण झाली आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत दोन कोटी २१ लाख रुपये खर्च करून नेत्र विभागासाठी स्वतंत्र अद्ययावत इमारत रुग्णांच्या सेवेसाठी कार्यान्वित झाली आहे. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सुरक्षा योजनेंतर्गत अतिविशेषोपचार रुग्णालय मंजूर झाले आहे. या रुग्णालयाचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. त्याप्रमाणेच या वर्षीपासून महाविद्यालयातील विविध विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत २२ ने वाढ होऊन प्रवेशक्षमता ६३ झालेली आहे. त्यामुळे पुढील काळात याचा रुग्णसेवेस मोठा लाभ मिळणार आहे.

अमृत अभियानांतर्गत लातूर शहर पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. याकरिता ४६ कोटी २० लाखांची तरतूद आहे. या प्रकल्पाचे काम सुरू झाल्यापासून १८ महिन्यात पूर्ण होणार आहे.

लातूर जिल्ह्यात कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण संस्थेचे विस्तृत जाळे उभारले असून, शिक्षित व अशिक्षित लाभार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ देऊन रोजगार कुशल बनविले जात आहे.

लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी उभारलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इमारतीचे लोकार्पण झाल्याने नागरिकांना सामाजिक न्यायाच्या योजनांची माहिती एकाच छताखाली मिळण्यास मदत होत आहे.

### टंचाई कृषी आराखडा

जिल्ह्यात २०१६-१७ च्या हंगामात चांगला पाऊस झाल्याने जिल्ह्यातील सर्व पाणी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले होते. तसेच जळकोट व अहमदपूर तालुके वगळता इतर सर्व तालुक्यातील भू-जल पातळीत चांगली वाढ झाली आहे. संभाव्य टंचाई कृती आराखड्याद्वारे प्रशासन टंचाईचा परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे.

### उत्कृष्ट काम

लातूर जिल्ह्याने स्वच्छ महाराष्ट्र अभियानात चांगले काम केले असून जिल्ह्यातील एकूण २ लाख ९८ हजार २२७ कुटुंबापैकी दोन लाख २१ हजार ४६३ कुटुंबांनी शौचालये बांधली आहेत. उर्वरित ७६ हजार ७६४ कुटुंबे मार्च २०१८ अखेरपर्यंत शौचालये बांधण्यात येणार आहेत. मार्च २०१८ पर्यंत लातूर जिल्हा संपूर्णत: हागणदारीमुक्त होणार आहे. आजपावेतो जिल्ह्यातील ७८३ ग्रामपंचायतीपैकी ४०९ ग्रामपंचायती या पूर्णपणे हागणदारीमुक्त झाल्या असून ३७४ ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणावर शौचालये बांधण्याची मोहीम सुरू आहे. लातूर जिल्ह्याने शिक्षण, जलयुक्त शिवार अभियान यामध्ये वेगळा पॅटर्न निर्माण केला आहे. त्याप्रमाणेच स्वच्छ भारत अभियानाची जिल्ह्यात प्रभावी व नावीन्यपूर्ण उपक्रमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून लोकांचे प्रबोधन करण्यात येत आहे. लातूर तालुक्याने एकाच दिवसात (१२ तासात) ८ हजार २३० शौचालयासाठी खड्डे खोदण्याचा विक्रम केला आहे. जिल्ह्यातील देवणी, जळकोट व शिरुर अनंतपाळ हे तीन तालुके हागणदारीमुक्त झाले आहेत.

स्वच्छता अभियानातील लातूर जिल्ह्याचे काम राज्यात हे अभियान गतिमान करण्यात नक्कीच प्रेरणादायी ठरणार आहे. याप्रमाणे लातूर जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून जलयुक्त शिवार अभियान, स्वच्छता अभियान, कृषी योजना, विविध विकासात्मक कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे.

**- सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी, लातूर



# उमेद आणि चेतना

**बळीराजा चेतना अभियानातून मिळालेला मदतीचा हात, मागेल त्याला शेततळे अशा अनेक योजनांच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीचा जिल्हा असलेल्या उस्मानाबादची ओळख आता बदलत आहे.**

सातत्याने ठरावीक अंतराने पडत जाणाऱ्या दुष्काळामुळे उस्मानाबाद जिल्हा कायमस्वरूपी दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात कळंब, भूम व परांडा हे तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतात. इतर ५ तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडत नसले तरी ह्या तालुक्यात अनियमित, अवेळी व कमी पाऊस पडतो. गेल्या चार वर्षात दुष्काळाची दाहकता मोठ्या प्रमाणात जाणवली होती. परंतु, गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमुळे याची तीव्रता कमी झाली आहे. दुष्काळावर उपाययोजना करण्याबरोबरच शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना कायम दिलासा मिळण्यासाठी सर्वांचा प्रयत्न राहिला आहे.

### जल संजीवनी

जलयुक्त शिवार अभियानासारखी महत्त्वाकांक्षी योजना उस्मानाबाद जिल्ह्यात यशस्वीपणे राबवण्यात आली. या अभियानाची राजस्थान सरकारनेही दखल घेतली. आतापर्यंत या अभियानासाठी ४७६ गावांची निवड करण्यात आली आहे. गेल्या वर्षी पाऊस पडल्यावर १४,४०९.६५ टीसीएम पाण्याचा साठा या कामांमध्ये झाला होता. यावर्षी केवळ पहिल्या १५ दिवसांमध्ये ६४५५.७६ टीसीएम पाण्याचा साठा झाला आहे. यामध्ये कंपार्टमेंट बंडिंग, नाला खोलीकरण, सिमेंट नाला बांध, केटीवेअर दुरुस्ती, विहीर व कूपनलिकांचे पुनर्भरण, रिचार्ज शॉफ्ट याचा समावेश आहे. यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी जलसंजीवनी ठरली आहे.

### मागेल त्याला शेततळे

'मागेल त्याला शेततळे' योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. जलसंचय करण्यासाठी कोणतीही सोय नसलेल्या शेतकऱ्यांकडून याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ३७०० शेततळे बांधण्याचे उद्दिष्ट ठरवले होते. यापैकी ११३३ तळी पूर्ण झाली आहेत. १२६८ तळ्यांचे काम सध्या सुरू आहे. ४६३ तळ्यांसाठी अनुदान वाटप करण्यात आले आहे. यासाठी एक कोटी ८८ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

### कृषी पंपांना वीजजोडणी

मराठवाडा कृषी विकास विशेष पॅकेजनुसार ८९८६ शेतकऱ्यांच्या




कृषी पंपांना एप्रिल २०१७ अखेर वीज जोडणी देण्यात आल्यामुळे त्यांना पिकांना पाणी देणे सोईस्कर झाले आहे.

## पीककर्ज वाटप



जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीककर्जाचा मोठा फायदा झाला आहे. आतापर्यंत शेतकऱ्यांना खरिप २०१६ मध्ये ७९ हजार ९३२ शेतकऱ्यांना ७५१ कोटी ४६ लाख रुपये पीककर्जाचे वाटप झाले आहे. रब्बी हंगाम २०१६ मध्ये ३१ मार्च २०१७ पर्यंत ५० हजार २१७ लाभार्थी शेतकऱ्यांना ४१६ कोटी ५१ लाख रुपये रकमेचे रब्बी पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे. खरीप २०१५ - २०१६ मध्ये ४६५ कोटी ८० लाख पीकविमा रक्कम प्राप्त झाली होती. रब्बीसाठी २०१५ - १६ मध्ये १५८ कोटी ९७ लाख रुपये प्राप्त झाले होते. खरीप हंगाम २०१६ - १७ मध्ये ३८० कोटी ८३ लाख रुपये प्राप्त झाले आहेत. पीक कर्जामुळे सावकारी पाशातून शेतकऱ्यांची सुटका झाली.



**“ गेल्या तीन वर्षात बळीराजा चेतना अभियानातून शेतकऱ्यांना ऊर्जा देण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना वैयक्तिक मदत करण्यात आली आहे. यामुळे त्यांच्या संसाराला हातभार लागून त्यांची मानसिकता सकारात्मक बनली आहे. शेतकऱ्यांना सातत्याने आधुनिक शेतीचे मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या योजना पथनाट्य व वैयक्तिक समुपदेशन यांच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या आहेत. कृषी निविष्ठांचा पुरवठा, औजारांचे वाटप, औषधोपचारांसाठी घेतलेली शिबिरे, वैद्यकीय शस्त्रक्रिया, सामूहिक विवाह ही या अभियानाची वैशिष्ट्ये ठरली आहेत. या अभियानांमार्फत शेतकऱ्यांच्या जीवनात नवी उमेद निर्माण करण्याचा हेतू साध्य झाला आहे.**

**– दिवाकर रावते, पालकमंत्री, उस्मानाबाद ”**

जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेतून १०७७ जणांना घरकुलासाठी मंजुरी देण्यात आली आहे. आता काही ठिकाणी कामे सुरू झाली आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना हक्काचा निवारा मिळण्याची सोय झाली आहे.

## विशेष प्रकल्प



शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळामार्फत विदर्भ व मराठवाडा विभागात दूध उत्पादन वाढीसाठी विशेष प्रकल्प राबवण्यात येत आहेत. यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील ४९४ गावांची प्रकल्प राबवण्यासाठी निवड करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यात पुन्हा धवलक्रांती निर्माण होण्यास मदत होणे अपेक्षित आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात कृत्रिम रेतनाची सेवा शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचवणे, संतुलित पशुखाद्य सल्ला, मार्गदर्शन व सेवा पुरवणे, वैरण विकास कार्यक्रम राबवणे, पशुंच्या वांझपणाचे निदान व उपचार, सर्व स्तरावरील पशुवैद्यकीय सेवा यासंदर्भात नियोजन करण्यात आले आहे. संघटन, प्रशिक्षण, दुग्ध संकलन हा या योजनेचा पाया आहे. यातून शेतकरी समृद्धीच्या वाटेवर वाटचाल करीत आहेत.

## मत्स्यव्यवसाय

भूजलाशयीन मत्स्योत्पादनात वाढ करणे व या व्यवसायातील मच्छीमारांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारणे हे प्रमुख उदिष्ट समोर ठेवून मत्स्यव्यवसाय विभागाच्या विविध विकास योजना जिल्ह्यात राबवण्यात येत आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यात पाटबंधारे तलाव, जिल्हा परिषद तलाव, नगर परिषद तसेच ग्रामपंचायत मालकीचे तलाव इत्यादी स्वरूपात सुमारे १८ हजार ८३२ हेक्टर जलक्षेत्र उपलब्ध असून यामध्ये मत्स्यव्यवसाय केला जातो. जिल्ह्यात १५० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आहेत.त्यांची सभासद संख्या ३ हजार ८३७ इतकी आहे.

जिल्ह्यात परंडा तालुक्यातील चांदणी येथे शासकीय मत्स्यव्यवसाय उत्पादन केंद्र असून त्याचे क्षेत्र ३ हेक्टर २७ आर एवढे आहे तर तलावांची संख्या ३ आहे. त्याची मत्स्यबीज क्षमता ३५ लाख आहे. त्यामध्ये २०१६-१७ मध्ये ४ लाख ७९ हजार इतके मत्स्यबीज उत्पादन घेण्यात आले.

**– मनोज सानप**
जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद






**हिंगोली जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून नियोजनबद्ध पद्धतीने कामे होत आहेत. मागील तीन वर्षात विविध विकास कामांमध्ये जिल्ह्याने आघाडी घेतली आहे. सामान्य नागरिकास केंद्रबिंदू मानून नियोजन करण्यात आले असून, जिल्ह्याची शाश्वत व नियोजनबद्ध विकासाकडे वाटचाल सुरू आहे.**

# टँकरमुक्ती

हिंगोली जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील १२४ तर दुसऱ्या टप्प्यात १०० गावांची निवड करून जलसंधारणाची कामे झाली आहेत. तिसऱ्या टप्प्यात ८० गावांची निवड झाली आहे.

जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून झालेल्या जल व मृद संधारणाच्या उपचारामुळे भूजल पातळीत दोन ते तीन मीटर इतकी लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे रब्बी व उन्हाळी लागवड क्षेत्रात वाढ झाली आहे. सुमारे ३५ लक्ष घनमीटर गाळ लोकसहभागातून शेतजमिनीवर टाकल्याने सुमारे दोन हजार हेक्टर शेतजमीन सुपीक होण्यास मदत झाली आहे. या मोहिमेमुळे सिंचन तलावांच्या साठवण क्षमतेत वाढ होऊन विहिरींची पाणी पातळी वाढण्यास मदत झाली आहे. या अभियानाच्या यशस्वितेमुळे १० हजार ५९५ टि.सी.एम. इतका पाणीसाठा जिल्ह्यात निर्माण होण्यास मदत झाली आहे. या पाण्यामुळे २१ हजार १९० हेक्टर जमिनीला एक संरक्षित पाणी देणे शक्य झाले आहे. मागील वर्षी जिल्ह्यात ५५ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. परंतु जलयुक्त अभियानात झालेल्या कामामुळे यावर्षी केवळ पाच गावांनाच टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. जलयुक्तमुळे जिल्ह्याची टँकरमुक्तीच्या दिशेने यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे.



**“ जिल्ह्यात २०१७-१८ खरीप हंगामात ३ लाख ५९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. शेतकऱ्यांना पेरणीकरिता पुरेशा प्रमाणात बियाणे आणि खतांची उपलब्धता व्हावी यासाठी योग्य नियोजन करण्यात आले. शेतकऱ्यांना दर्जेदार खते मिळावी आणि खत वितरणात पारदर्शकता यावी यासाठी कृषी सेवा केंद्रावर ई-पॉस मशिनद्वारे ऑनलाइन खतांची विक्री सुरू करण्यात आली.**

**- दिलीप कांबळे, पालकमंत्री, हिंगोली ”**

मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत एक हजार ६८४ शेततळ्यांना कार्यारंभ आदेश दिले आहेत. एक हजार १३४ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत, ६५ शेततळ्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. आतापर्यंत या कामांवर चार कोटी चार लाख ५८ हजार रुपये निधी खर्च झाला आहे.

## अहिल्यादेवी सिंचन विहिरी योजना

'समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण' योजनेमध्ये जिल्ह्यास दोन वर्षांकरिता दहा हजार अहिल्यादेवी सिंचन विहिरी मंजूर केल्या आहेत. याकरिता ग्रामसभा घेऊन आठ हजार ८५३ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यापैकी एक हजार ११० विहिरींना कार्यारंभ आदेश दिले आहेत. ७०७ विहिरींचे कामे प्रत्यक्षात सुरू आहेत. राज्यपाल महोदयांनी हिंगोली जिल्ह्याचा १५ हजार १६० हेक्टर सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मंजुरी दिली आहे. याकरिता जलसंपदा विभागाने १२०० कोटी तर जलसंधारण विभागाने ८०० कोटी असा एकूण दोन हजार कोटी रुपयांचा भौतिक आणि आर्थिक नियोजनाचा प्रारूप आरखडा तयार केला आहे.

## हमी भावाने तूर खरेदी

भाव स्थिरता योजना आणि बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत जुलै अखेर जिल्ह्यातील एकूण सात हजार ४१३ शेतकऱ्यांची एकूण एक लाख ७ हजार ५०२ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे. डॉ. पंजाबराव

देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात मुदतीत पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना पाच कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात आले आहे.

या वर्षी ४ कोटी वृक्षलागवड मोहिमेंतर्गत जिल्ह्यात ७ लाखाहून अधिक वृक्षाची लागवड करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत जिल्ह्यातील वीजवहन यंत्रणा सक्षम करण्यासाठी विविध उपयोजनेसाठी हिंगोली जिल्ह्याला १९८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच महापारेषणांतर्गत बाराशिव, आखाडा बाळापूर आणि कुरुंदा येथे १७५ कोटी निधी खर्च करून जिल्ह्यात १३२ के.व्ही. चे मोठे वीज केंद्र सुरू करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात अकरा ठिकाणी कृषी वाहिनीवरील सौर उर्जेचा प्रकल्प सुरू करण्याचे नियोजन आहे.

### यशस्वी अंमलबजावणी

जिल्ह्यात ७९५ रास्तभाव दुकानांपैकी ७९५ दुकाने ई-पॉस अंतर्गत ऑनलाइन करण्यात आली आहेत. मुद्रा बँक योजनेंतर्गत माहे सप्टेंबर-२०१५ पासून आतापर्यंत शिशू, किशोर आणि तरुण गटामधील जिल्ह्यातील आठ हजार ४०० हून अधिक लाभार्थ्यांना सुमारे ६० कोटी रुपयांचे कर्जाचे वितरण करण्यात आले आहे. 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' अंतर्गत जिल्ह्यातील ५६३ ग्रामपंचायतींपैकी २९७ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. हिंगोली शहरातील ८७ हजार लोकांकरिता नगर परिषदेमार्फत राज्यशासनाने ७३ कोटींची भुयारी गटार योजना मंजूर केली आहे. सेनगाव शहरातील १० हजार लोकसंख्येकरिता सेनगाव नगर पंचायतीला राज्य शासनाने बारा कोटी ८५ लाख कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर केली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यास तीन हजार ७१५ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. दोन हजार ९९५ घरकुलांची प्रत्यक्षात कामे सुरू झाली आहेत.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत २०१५-१६ मध्ये आठ गावांकरीता ५८.९३ किमीचे रस्ते मंजूर झाले आहेत. याकरीता आतापर्यंत १५ कोटी ३९ लक्ष खर्च झालेला आहे. २०१६-१७ करीता ४१ कामे मंजूर केली आहेत. १५४.७ किलोमीटर रस्त्यांची कामे करण्यात येणार आहे. गुरुत्वाकर्षण लहरींचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेतील हान्सफोर्ड आणि लिव्हिंग्स्टन येथे दोन प्रयोगशाळा उभारल्या आहेत. तिसरी प्रयोगशाळा भारतात होत आहे. या दोन प्रयोगशाळांनंतर जगातील तिसरी प्रयोगशाळा ही हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यात होणार आहे.

**- अरुण सूर्यवंशी**
जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली




# सुविधा आणि सुव्यवस्था

**जगात औरंगाबादचे नाव अजिंठा, वेरूळ लेण्यांमुळे प्रसिद्ध आहे. पूर्वीपासूनच जिल्ह्याला वेगळी ओळख निर्माण झाली आहे. गेल्या तीन वर्षात जिल्ह्याची सर्वच क्षेत्रात प्रगतीकडे झपाट्याने वाटचाल सुरू आहे.**



एमआयडीसी रस्ते, शेंद्रा

जागतिक नकाशावर औरंगाबाद जिल्हा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. ५२ दरवाजांचे शहर म्हणून औरंगाबादला ओळखले जाते. या शहराच्या विकासासाठी शासन भरीव निधीची तरतूद करते आहे. जिल्ह्यात पर्यटनाबरोबरच कृषी, औद्योगिक क्षेत्राची भरभराट होते आहे. त्यामुळे येथील रोजगार निर्मितीत भर पडणार आहे. पालकमंत्री रामदास कदम यांनी जिल्ह्यात विविध विकासकामांचा धडाका सुरू ठेवला आहे.

औरंगाबाद शहरातील सिडको परिसरात असलेल्या बाळासाहेब ठाकरे स्मृती उद्यान विकसित करण्यात येणार आहे. आंबेडकर नगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर इस्पितळ बांधण्यात येणार आहे. चिकलठाणा विमानतळाच्या गेटसमोर सुशोभीकरण करण्यात येणार आहे. अजिंठा लेणी, कैलास स्तंभाची प्रतिकृती या ठिकाणी उभारण्यात येणार आहे. पडेगाव परिसरात शंभर एकर जागेत सफारी पार्कची निर्मिती होणार आहे. त्याच्या बाजूलाच शिल्लक असलेल्या ८६ हेक्टर जमीन पर्यटनासाठी संपादित केली जाणार आहे. त्यामुळे या परिसराकडे पर्यटक आकर्षिले जातील. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीही होईल.

### पर्यटन विकासातून रोजगार निर्मिती

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत ४३८.४४ कोटींचा म्हैसमाळ, वेरुळ, खुलताबाद - सुलिभंजन पर्यटन विकास आराखडा

मंजूर करण्यात आला आहे. या माध्यमातून विविध विकास कामे होऊन पर्यटनामध्ये वाढ होणार आहे.

शहराचे सुशोभीकरण औरंगाबाद महापालिकेतर्फे करण्यात येत आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात अधिकच भर पडत आहे. खुलताबादच्या नगारखाना द्वाराचे सुशोभीकरण झाल्याने खुलताबाद शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. देश-विदेशातून पर्यटक औरंगाबादेत दाखल होतात. त्यांची गैरसोय होऊ नये. त्यांना योग्य माहिती मिळावी याकरिता जिल्ह्यातील प्रमुख पर्यटनस्थळांच्या ठिकाणी औरंगाबाद-वेरुळ व औरंगाबाद अजिंठा रस्त्यांवर माहिती फलक लावले आहेत. त्यामुळे या ठिकाणाकडे जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सोय झाली आहे. पर्यटकांची सुविधा व्हावी यासाठी औरंगाबाद - अजिंठा रस्त्यावर सिल्लोड येथील महामंडळाच्या मार्गस्थ सेवा केंद्राचे नूतनीकरण करण्यात आले आहे. वेरुळ -अजिंठा लेणीजवळ पर्यटन विभागाकडून सुसज्ज हेलिपॅड बांधले आहे. या परिसरात हेलीजॉयराईड सेवा पर्यटकांसाठी सुखावणारी आहे. पर्यटकांची गैरसोय होऊ नये म्हणून महामंडळाच्या वतीने त्यांच्या प्रादेशिक कार्यालयाच्या संकेतस्थळावर पर्यटकांसाठी असलेल्या सुविधा आणि सवलतींची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## गुणवत्तापूर्ण कामे

जलयुक्त शिवारातंर्गत मागेल त्याला शेततळे, नालाबांध, नाला खोलीकरण, नाला सरळीकरण आदी कामे गुणवत्तापूर्ण करण्यात आली. यामध्ये लोकांनीही हिरीरीने सहभाग नोंदवला. त्यामुळे पूर्वी टंचाईसदृश असलेल्या ठिकाणी आता मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आहे. शेतीला शाश्वत पाण्याचा पुरवठा उपलब्ध झाला असल्याने शेतकरी बारमाही पिके घेऊ लागली आहेत.

सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत देखील जलयुक्त शिवार अभियानाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. त्यामुळे शेतीला सक्षम असा आधार जलयुक्त शिवार अभियान ठरले आहे.

औरंगाबाद शहरातील जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) येथे मृद व जलसंधारण आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली आहे. या संस्थेत येणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी पाणलोट क्षेत्राची आधुनिक पद्धतीने नकाशा तयार करून, उत्कृष्ट मॉडेल्स तयार करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत; जेणेकरून ती शेतकऱ्यांसाठी उपयोगी व फलदायी ठरतील.

**"उद्योग आणि रोजगाराच्या दिशेने औरंगाबाद जिल्ह्याने उंच झेप घेतली आहे. औद्योगिक क्षेत्राची वाढ झाल्याने देशी- विदेशी कंपन्या औरंगाबादला अधिक पसंती दर्शवत आहेत. या माध्यामातून बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊन विविध क्षेत्रे त्यांच्यासाठी खुली होत आहेत."**



**- रामदास कदम, पालकमंत्री, औरंगाबाद**

## महामार्ग प्रकल्प

कृषी आणि पर्यटनाबरोबरच जिल्ह्यातील दळणवळणाची गती वाढवण्यासाठी नागपूर-मुंबई समृद्धी जलदगती महामार्गाच्या प्रकल्पास जिल्ह्यात जानेवारी-२०१७ पासून सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांच्या समाधानानंतरच त्यांची जमीन हस्तांतरण प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे. समृद्धी महामार्गामुळे औरंगाबाद ते मुंबई आणि औरंगाबाद ते नागपूर अंतर केवळ तीन तासात कापता येणार आहे. या समृद्धी महामार्गामुळे जिल्ह्यातील विकासाला द्रुतगती प्राप्त होणार आहे.

## औद्योगिक विकास

औरंगाबाद-जालना रस्त्यावर उद्योगनगरी उभारली जात आहे. या रस्त्यावर सुनियोजितपणे शेंद्रा औद्योगिक क्षेत्र, अतिरिक्त शेंद्रा, लाडगाव- करमाड, औद्योगिक क्षेत्र डीएमआयसी टप्पा-१, बिडकीन औद्योगिक क्षेत्र डीएमआयसी टप्पा-२ जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

## धान्य दुकानात पॉस मशिन

औरंगाबाद जिल्ह्यात आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून सामान्य माणूसही बायोमेट्रिक पद्धतीने स्वस्त धान्य प्राप्त करू लागला आहे. जिल्ह्यातील १८०१ स्वस्त धान्य दुकानात पॉस मशिन बसवण्यात आल्या आहेत. औरंगाबाद तालुक्यात गोलवाडी, शहरात उस्मानपूरा भागात स्वस्त धान्य दुकानावर बायोमेट्रिक पद्धतीने धान्य वितरण सुरू आहे. या पद्धतीमुळे सार्वजनिक अन्नधान्य वितरणात पारदर्शकता आल्याने थेट लाभार्थ्यांना लाभ मिळतो आहे. ते यातून समाधानही व्यक्त करत आहेत. जिल्ह्यात ग्रामीण भागात 'उन्नत शेती-समृद्ध शेतकरी अभियान,' पशुसंर्वधन विभागामार्फत दुधाळ गायी-म्हशींचे, शेळी-गटवाटप करण्यात येते आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान विमा योजनेमार्फत २४९६८ जनावरांचा विमा उतरवण्यात आला आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मोठ्या प्रमाणात शौचालयाची कामे पूर्ण झाली आहेत. अशाच प्रकारे विविध विकासकामे जिल्ह्यात पार पडत आहेत.

शेती आर्थिक कणा असल्याने शाश्वत शेती विकासासाठी सिंचनापासून बाजारपेठेपर्यंत सर्व सोयी, शेतीपूरक उद्योग निर्मितीसाठी मत्स्यव्यवसायास प्रोत्साहन देण्यात येत आहे. कायमस्वरूपी वनक्षेत्रात केवळ साडेचार टक्क्यांच्या आसपास असलेल्या मराठवाड्याला हिरवागार करण्यासाठी इको बटालियन स्थापन करण्यात आले आहे.

**- मुकुंद चिलवंत**
जिल्हा माहिती अधिकारी, औरंगाबाद





जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेली कामे.




# संधी आणि साहाय्य

**राज्य शासनाने गेल्या तीन वर्षात परभणी जिल्ह्याचे अनेक प्रश्न वेळोवेळी मार्गी लावले आहेत. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. नव्या योजनांचाही लाभ जनतेला होत आहे. या पार्श्वभूमीवर घेतलेला हा आढावा...**

शाश्वत पाणीसाठे निर्माण करून संपूर्ण परभणी जिल्हा टंचाईमुक्त करण्याच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या जलयुक्त शिवार अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. २०१५-१६ मध्ये १७० व २०१६-१७ मध्ये १६० असे एकूण ३३० गावांची निवड करण्यात आली होती त्यापैकी १४३ गावांमध्ये आराखडयानुसार १०० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित गावात कामे चालू आहेत. निवडलेल्या गावात १०३९० कामापैकी ६८०४ कामे पूर्ण करण्यात आली. ९३ कामे प्रगतीपथावर आहेत. पूर्ण झालेल्या कामामध्ये सिमेंट नाला बांध २३२, ढाळीची बांध बंदिस्ती २३ हजार ५२२ हक्टर सलग समतलचर ३५८१ हेक्टर इत्यादी महत्त्वाची कामे पूर्ण झाली. अभियानात शासकीय व लोकसहभागातून मिळून एकूण ४४ लाख ३१ हजार घनमीटर गाळ काढण्यात आला. या अभियानांतर्गत कामासाठी जिल्हा नियोजन मंडळ सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी), एकात्मिक व्यवस्थापन कार्यक्रम, केंद्र शासनाच्या योजना व लोकसहभाग इत्यादीच्या माध्यमातून १८९ कोटी ९३ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला. त्यापैकी १०५ कोटी ३६ लाख रुपये निधी खर्च झाला.

पूर्ण झालेल्या कामांमुळे ३४,२२३.९३ टीसीएम इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण झाली. यामुळे ६८,४४७.८६ हेक्टर क्षेत्रास संरक्षित क्षेत्र निर्माण झाले. भूगर्भातील पाणी पातळीत २ ते अडीच मीटरने वाढ झाली आहे. २०१६ च्या रब्बी हंगामात गहू, ज्वारी व हरभरा इत्यादी पिकांना पाण्याची सोय निर्माण झाल्यामुळे दीडपट उत्पादनात वाढ झाली. पाणीसाठ्यामुळे जवळपास ११५० कोरड्या विहिरी जलमय झाल्या.

## मागेल त्याला शेततळे

मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत २०१६-१७ या वर्षासाठी जिल्ह्याला ३००० शेततळ्यांचे लक्षांक देण्यात आले असून २५४९ शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत. जवळपास ११७१ शेततळे पूर्ण झाले असून यासाठी ४ कोटी ८० लाख रुपयांचा निधी प्राप्त आहे. शेततळ्यासाठी शेतकऱ्यांना निधी देण्यात येत असून शेततळी पूर्ण झाल्यामुळे संरक्षित सिंचनाची सोय होत आहे.

## कृषी पंप ऊर्जीकरण

कृषी पंप ऊर्जीकरण विशेष अनुशेष योजनेंतर्गत जिल्ह्याला पहिल्या टप्प्यात ७४ कोटी आणि दुसऱ्या टप्प्यात



**“ बेरोजगार सुशिक्षित तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबवण्यात येत आहे. १०३ प्रशिक्षण संस्थेमार्फत रोजगारविषयक ९१ प्रशिक्षण सत्रांमधून २६८३ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. सध्या १६० वे सत्र सुरू असून जवळपास ४७४७ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षणानंतर या उमेदवारांना रोजगार स्वयंरोजगारासाठी संपूर्ण साहाय्य करण्यात येईल.**

**– गुलाबराव पाटील, पालकमंत्री, परभणी ”**

१६ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे.

जिल्ह्यामधील ५१९४ कृषी पंप ग्राहकांच्या कृषी पंप ऊर्जीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे कृषी पंप ग्राहकांना रब्बी हंगामामध्ये पिकांना योग्य वेळेत कृषी पंपाद्वारे पाणी देणे शक्य झाले असून यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) योजनेंतर्गत जिल्ह्यातील १ महानगरपालिका, ७ नगरपरिषद आणि १ नगरपंचायत अशा एकूण नऊ शहरांमध्ये स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे. पाथरी, सोनपेठ, सेलू व मानवत या चार नगर परिषदेच्या शहरांना राज्यस्तरीय समितीने व पाथरी केंद्राच्या समितीने संपूर्ण हागणदारीमुक्त शहर म्हणून घोषित केले आहे.

## ग्रामीण जीवनोन्नती



ग्रामीण भागातील महिला स्वयंसाहाय्यता समूहांना सबळ करून रोजगार प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत बचतगटांना प्रशिक्षण, नवीन गटांची स्थापना व पुनर्जीवीकरण, गटांना खेळते भांडवल, बॅंक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. गटांच्या उत्पादित वस्तूचे पॅकिंग, सिलिंग व ब्रॅंडिंग जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत केले जाते. यासाठी 'जनाई' हे ब्रॅंड नाव निश्चित करण्यात आले आहे. या वर्षी जिल्ह्यातील २७ गटांनी विभाग स्तरावर व ३ गटांनी राज्यस्तरावर महालक्ष्मी सरस प्रदर्शनात सहभाग नोंदवला. गटांचे प्रशिक्षण व क्षमता बांधणीवर विशेष लक्ष देण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

ग्रामीण भागातील रस्ते सुधारण्याच्या या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसाठी जिल्ह्यात कोअर नेटवर्क तयार करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १८९.७९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची १८ कामे मंजूर असून कामे प्रगतिपथावर आहेत. यासाठी ६ कोटी ३५ लाख रुपयांची तरतूद प्राप्त आहे.

## लाभार्थ्यांना घरकूल

इंदिरा आवास योजनेंतर्गत ५१०६ घरकूल मंजुरीच्या उद्दिष्टांपैकी ४८०७ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित बांधकाम सुरू आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ३३५३ घरकुलांचे उद्दिष्ट असून आतापर्यंत २६५८ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. उर्वरित कामे मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत.

रमाई आवास योजनेंतर्गत सामाजिक आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण २०११ मधील प्राधान्यक्रमानुसार निकषाबाहेरील लाभार्थींची निवड करून पात्र लाभार्थ्यांना घरकुले देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

शबरी आवास योजनेंतर्गत चालू वर्षी अनुसूचित जमातीच्या २० लाभार्थींना घरकूल देण्याचे नियोजित असून एक घरकुल पूर्ण झाले असून उर्वरित १९ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

## सूक्ष्म सिंचन

सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत २०१४-१५ मध्ये शेतावरील पाणी व्यवस्थापनासाठी ११ कोटी ३३ लाख रुपये निधी प्राप्त होता. त्यामधून ३८०४ शेतकऱ्यांच्या शेतावर सूक्ष्म सिंचनाचा वापर करण्यात आला. यामुळे ३९७३.१६ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले.

२०१५-१६ मध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत १३६० शेतकऱ्यांच्या शेतामध्ये सूक्ष्म सिंचनाचा वापर करण्यात आला. यामुळे १३११.४५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले. २०१६-१७ मध्ये ५०७५ शेतकऱ्यांच्या शेतावर सूक्ष्म सिंचनाचा वापर करण्यात आला. यामुळे ४६९७.७० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. याशिवाय प्रलंबित प्रकरणासाठी २०१६-१७ मध्ये २३०७ शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. यामुळे मोठ्या प्रमाणात शेती सिंचनाखाली आणण्यात आली.

## वृक्षलागवड

राज्य शासनाच्या चार कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात २०१७ च्या पावसाळ्यात विभागांकडून ७ लाख २३ रोपांची लागवड करण्यात आली. याशिवाय स्वयंसेवी संस्था व नागरिकांनी मिळून १५२२८ रोपांची लागवड केली आहे. याप्रमाणे परभणी जिल्ह्याने १०२ टक्के वृक्षारोपणाचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे.

**- अनिल आलुरकर**
जिल्हा माहिती अधिकारी, परभणी







**मागील तीन वर्षात पारदर्शक व गतिमान प्रशासन करण्यावर भर देत जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. यामध्ये जलयुक्त शिवार, मेक इन महाराष्ट्र, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, लोकसेवा हक्क विधेयक, आपले सरकार अशा अनेक योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी जालना जिल्ह्यात करण्यात येत आहे.**

# चौफेर गतिमानता

राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री बबनराव लोणीकर तसेच पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या पुढाकाराने सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या विकासात भर टाकणारी अनेक विकास कामे सुरू आहेत.

## रस्ते विकास

जालना जिल्ह्यातील ग्रामीण दळणवळणाचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य शासन सतत प्रयत्नशील आहे. जालना जिल्ह्यात रस्ते विकासासाठी जवळपास ५ हजार ६७१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत दिंडी मार्ग म्हणून खामगाव-लोणार-मंठा-परतूर-माजलगाव-कळंब-बार्शी-पंढरपूर-सांगोला या ४३० किलोमीटर अंतराच्या रस्त्यास केंद्र शासनाने मान्यता देऊन वार्षिक नियोजनात ८६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.



**“ मराठवाड्यातील ४० हजार लोकांना रोजगार मिळवून देण्याबरोबर शेतकऱ्यांच्या विकासात भर घालणारा सीडपार्क जालना येथे उभारण्यात येणार आहे. या सीडपार्कच्या माध्यमातून वर्षाला ६०० कोटी रुपयांची उलाढाल होणार आहे. याचा फायदा बी-बियाणे कंपन्यांसह मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील बियाणे उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होईल.**

**- बबनराव लोणीकर, पालकमंत्री, जालना ”**

## पीकविम्यात देशात प्रथम

२०१६-१७ या वर्षात प्रधानमंत्री पीकविमा योजनेमध्ये उत्कृष्ट काम करून जालना जिल्ह्याने संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. जिल्ह्यात २०१५-१६ या वर्षी खरिपात एकूण रु. २५ कोटी विमा हप्ता भरून पीक विमा घेतलेल्या जिल्ह्यातील जवळपास ९५ टक्के शेतकऱ्यांना रु. ४३१ कोटी ६४ लाख रुपये आणि रब्बीमध्ये एकूण २ कोटी विमा हप्ता भरून पीक विमा घेतलेल्या शेतकऱ्यांना ४४ कोटी २९ लाख रुपये कोटी इतकी नुकसान भरपाई मिळाली. २०१६-१७ मध्ये जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नातून खरिपात ४ लाख ६९ हजार आणि रब्बीमध्ये १ लाख २७ हजार शेतकऱ्यांनी ३९ कोटी रुपयांचा विमाहप्ता भरून पीकविमा योजनेत भाग घेतला होता.

## रसायन तंत्रज्ञान संस्था

जालना शहरापासून जवळच सिरसवाडी शिवारात २०० एकर परिसरात इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलाजी (आयसीटी) ही राष्ट्रीय पातळीवरची संस्था उभारली जात आहे. २०१८-१९ शैक्षणिक वर्षापासून येथे चार अभ्यासक्रम सुरू होणार आहेत.

## पहिला ड्रायपोर्ट प्रकल्प

जालना शहरापासून जवळच दरेगांव शिवारात १८५ हेक्टर जागेवर ड्रायपोर्ट उभारला जात आहे. त्यामुळे हा देशातील पहिला ड्रायपोर्ट असणार आहे. या प्रकल्पासाठी सध्या संपूर्ण जागेला संरक्षण भिंत उभारणी व जागेचे सपाटीकरण करण्याचे काम सुरू आहे. पावसाळा संपताच येथे पहिल्या टप्प्यात ६५ एकरवर कंटेनर यार्डअंतर्गत रस्ते, गोदामे ही विकास कामे केली जाणार आहेत. या प्रकल्पामुळे शेतकरी

व उद्योजकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होऊन बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार आहे.

### लोअर दुधना प्रकल्प

प्रधानमंत्री सिंचन योजनेमध्ये लोअर दुधना प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ६०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी ४५२ कोटी रुपये प्रशासनाला प्राप्त झाले आहेत. या निधीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा देण्याबरोबरच अनेकविध विकास कामे करण्यात येणार आहेत.



### रेशीम कोष खरेदी केंद्रास मान्यता

शेतकऱ्यांच्या शेतीला जोडधंदा म्हणून रेशीम उद्योग हा एक अत्यंत किफायतशीर असा जोडधंदा असून यासाठी शासनामार्फत २ लाख ५५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. रेशीम कोषाच्या विक्रीसाठी शेतकऱ्यांना बेंगलोर येथे जावे लागत होते. परंतु रेशीम कोषाचे खरेदी केंद्र जालना येथे करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली असून यासाठी ५ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे. रेशीम कोष खरेदी केंद्र कार्यान्वित झाल्यास जालना जिल्हा, मराठवाड्यासह विदर्भातील शेतकऱ्यांनाही याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

### १६ गावांचा विकास

केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय रुरबन मिशन'अंतर्गत परतूर तालुक्यातील आष्टीसह या कामासाठी १८५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच अकोली, आनंदगाव, ब्राम्हणवाडी, सुरूमगाव, ढोकमाळ तांडा, फुलेवाडी, पळसी, हास्तुरतांडा, लिखित पिंप्री, लोणी खुर्द, कनकवाडी, परतवाडी रायगव्हाण, सातारा वाहेगाव व वाहेगाव सातारा या गावांचा समावेश यात करण्यात आला आहे.

### दुधाळ जनावरांच्या वाटपाचा पथदर्शी प्रकल्प

मराठवाडा पॅकेजअंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटपाचा पथदर्शी प्रकल्प राबवण्यासाठी जालना जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील जवळपास २ हजार लाभार्थींची निवड करण्यात येणार आहे. या लाभार्थ्यांना उच्च प्रतीच्या जनावरांचे वाटप करून त्यांच्या उत्पन्नात भर पडून; जिल्ह्यातील दूध संकलन वाढीवर भर देण्यात येणार आहे.

**जिल्ह्यात २०१५-१६ मध्ये २१२ तर २०१६-१७ या वर्षात १८६ गावांमध्ये जलसंधारणाची मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे साधारणत: ५० हजार १७ टी.सी.एम. पाणीसाठा निर्माण झाला आहे.**

### १७६ गावांना वॉटरग्रीडद्वारे पाणी

जालना जिल्ह्यातील परतूर, मंठा व जालना तालुक्यातील १७६ गावांना वॉटरग्रीड पद्धतीने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील पहिल्या वॉटरग्रीड योजनेचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले. २३४ कोटी रुपयांची योजना असलेल्या वॉटरग्रीडचे काम पूर्ण झाल्यानंतर तीनही तालुक्यातील गावांना शुद्ध व स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे.

### प्रधानमंत्री आवास योजना

जालना शहरात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ३६४ सदनिकांची म्हाडामार्फत उभारणी करण्यात येत आहे. या घरासाठी केंद्र शासन १ लाख ५० हजार, राज्य शासन एक लाख अशी एकूण २ लाख ५० हजारांची सबसिडी देण्यात येणार आहे. तसेच उर्वरित रक्कम बँकेमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



**अर्जुन खोतकर**
वस्त्रोद्योग, पदुम राज्यमंत्री

### परतूर येथे सिडकोची उभारणी

परतूर तालुक्यातील आंबा येथे ५०० एकर जमिनीवर सिडकोचा प्रकल्प साकारला जाणार आहे. नागरिकांना परवडतील अशा दरात घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. परिसरात रस्ते, पाणी व ड्रेनेज सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी सिडकोमार्फत नुकतीच जमीन संपादनाची प्रकिया पूर्ण करण्यात आली आहे.

**– एस.के. बावस्कर**
जिल्हा माहिती अधिकारी, जालना


मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून तयार केलेला रस्ता.




**विविध लोककल्याणकारी योजना तळागाळांतील लोकांपर्यंत पोहोचून त्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा प्रशासन प्रयत्न करत असते. जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, वृक्षलागवड कार्यक्रम आदी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.**

# अग्रेसर

राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणून जलयुक्त शिवार अभियानाची बीड जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. जिल्ह्यात २०१५-१६ मध्ये २७१ गावांमध्ये जलसंधारणाची ७ हजार १५० कामे हाती घेण्यात आली. त्यातील ६ हजार ९१७ कामे पूर्ण करण्यात आली. शासकीय यंत्रणा व लोकसहभाग यातून नदी, नाले, धरण यातून ६ लाख २ हजार १७६ घनमीटर गाळ काढण्यात येऊन पाणी साठवण क्षमतेत वाढ झाली आहे. तर या अभियानांच्या दुसऱ्या टप्याने २५६ गावांचा समावेश करून त्या गावांमध्ये जलसंधारणाची ५ हजार ७३ कामे हाती घेऊन २ हजार ४३८ कामे पूर्ण करण्यात आली.

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत जिल्ह्यातील गावे रस्त्यांनी जोडणे व पूर्वीच्या रस्त्यांची दुरुस्ती करणे यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर करण्यात आला असून २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत एकूण ७१४ कि.मी. लांबीचे ग्रामीण रस्ते बीड जिल्ह्यात निर्माण होणार आहेत.



**“ स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्ह्यातील ७५ हजार कुटुंबांसाठी शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनामार्फत त्या अनुषंगाने नियोजनबद्ध कार्यक्रम सुरू आहे. या अंतर्गत ‘मिशन पोस्ट कार्ड’च्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमार्फत त्यांच्या दीड लाख नातेवाइकांना शौचालय बांधकामाबाबत पत्र पाठवून आवाहन करण्यात आले आहे.**

**- पंकजा मुंडे, पालकमंत्री, बीड ”**

## बेटी बचाओ, बेटी पढाओ

‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ या अभियानामुळे जिल्ह्यात लिंग गुणोत्तराचे प्रमाणही वाढत आहे. २०१५-१६ मध्ये एक हजार मुलामागे ८९८ मुली इतके प्रमाण होते. २०१६-१७ मध्ये मुलींचे प्रमाण ९२७ पर्यंत वाढलेले आहे. मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी बीड जिल्ह्यातील गरोदर मातांची गावनिहाय यादी करून त्यांचे समुपदेशन केले जाते. प्रत्येक गावात मुला-मुलींचे लिंगगुणोत्तर दर्शवणारे गुडा-गुड्डी हे फलक लावण्यात आले आहेत. मुलींचा जन्मदर वाढण्यासाठी गावांमध्ये कलापथकामार्फत प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात येत आहेत. गरोदर माता तपासणीसाठी खासगी वैद्यकीय व्यावसायिकांना गावांचा रिप्रोडक्टिव्ह ॲण्ड चाईल्ड हेल्थ क्रमांक बंधनकारक करण्यात आलेला असून, या पोर्टलमध्ये गरोदर माता नोंदणीमध्ये बीड जिल्ह्याचा राज्यात प्रथम क्रमांक आहे.

## वृक्षलागवड

वृक्षलागवड मोहिमेत १७ लाख ६६ हजार ६५० रोपांची लागवड केली. दिलेल्या उद्दिष्टापेक्षा ४ लाख ८४ हजार ६५० अधिक रोपे लावण्यात आली. २ लाख ९२ हजार सदस्य असलेला ‘बीड जिल्हा ग्रीन आर्मी’च्या सदस्यांवर वृक्षसंवर्धन करण्याची जबाबदारी आहे. शेतकरी कुटुंबामध्ये आत्महत्येसारख्या घटना घडत असल्याने अशा कुटुंबाना मिशन दिलासाच्या माध्यमातून शासकीय योजनेचा लाभ देण्यात येतो.

**- सुनील सोनटक्के**
प्र.जिल्हा माहिती अधिकारी, बीड



सुरक्षित, आरोग्यदायी, दुर्घटनाविरहित, पर्यावरणपूरक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनाचे जगभरात कौतुक झाले. या महासोहळ्याच्या निमित्ताने नाशिक-त्र्यंबकेश्वरमधील पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. गोदाकाठचे सुंदर घाट आणि विस्तारलेले रस्ते या सोहळ्याची आणि विकासाची साक्ष देतात. मांगी-तुंगी येथील भगवान ऋषभदेव १०८ फूट मूर्तीच्या महामस्तकाभिषेक सोहळ्यानिमित्त देखील मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली.

# विस्तारलेले रस्ते...

नाशिक जिल्ह्याने 'स्वच्छ भारत' अभियान प्रभावीपणे राबवले. त्याचे चांगले परिणाम दिसून आले असून, मुंबई येथील झालेल्या 'दरवाजा बंद माध्यम अभियाना'च्या शुभारंभ प्रसंगी वर्षभरात एक लाखापेक्षा अधिक शौचालय बांधल्याबद्दल नाशिक जिल्हा परिषदेचा गौरव करण्यात आला.

### वृक्षलागवडीमध्ये अग्रेसर

राज्य शासनाच्या वृक्षलागवड उपक्रमातही नाशिक जिल्हा राज्यात अग्रेसर आहे. गतवर्षी दोन कोटी वृक्षलागवड उपक्रमांतर्गत जिल्ह्यात एकूण २९ लाख २९ हजार रोपांची लागवड करण्यात आली. तर या वर्षी चार कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत ४५ लाख रोपांची लागवड करण्यात आली.

### टंचाईमुक्त

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात झाल्याने अनेक गावे टंचाईमुक्त झाली आहेत. गेल्या दोन वर्षात चौदा हजार कामांवर ३१३ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याने एकूण ६१ हजार टीसीएम अतिरिक्त पाणीसाठा निर्माण झाला आहे. ४४७ गावांची पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होण्याबरोबरच, एक लाख २२ हजार हेक्टर संरक्षित सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. योजनेंतर्गत आठ लाख ९५ हजार क्युबिक मीटर गाळ लोकसहभागातून काढण्यात आला आहे. या कामाची किंमत ३ कोटी १९ लाख एवढी आहे. ५५७ हेक्टर जमिनीवर गाळ टाकण्यात आला असून, अठराशे शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे.

राज्य शासनाच्या 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत चार हजार ६६३ शेततळी पूर्ण करण्यात आली आहेत. त्यासाठी आतापर्यंत सुमारे १२ कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. शेततळ्यांच्या माध्यमातून शाश्वत सिंचन सुविधा निर्माण झाल्याने २० हजार हेक्टर शेतीला त्याचा लाभ होणार आहे.

### घरकूल

गरिबांना घरकूल मिळावे यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. इंदिरा आवास योजनेंतर्गत २०१५-१६ या वर्षात ९ हजार ८७५ कुटुंबांना हक्काचे घर मिळाले. प्रधानमंत्री आवास



**"'उन्नत शेती-समृद्ध शेती' मोहिमेंतर्गत १९६० गावात १८०० पेक्षा जास्त कार्यक्रम घेऊन पीक विमा योजना, बांधावर तूर लागवड, चारसूत्री भात लागवड, जलसंधारण, बीजप्रक्रिया, आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. ५६७० हेक्टर क्षेत्रावर पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. कृषी क्षेत्राच्या प्रगतीबरोबरच उद्योगक्षेत्राच्या विकासाला गती देऊन, रोजगार निर्मितीवर भर देण्यात येत आहे. त्यासाठी जिल्ह्यातील उद्योजक आणि उद्योग क्षेत्रातील संघटनांच्या पुढाकाराने नुकतेच मुंबई येथे 'मेक इन नाशिक' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले.**

**- गिरीश महाजन, पालकमंत्री, नाशिक"**




योजनेतून १४ हजार ७५१, शबरी आवास योजना ३ हजार १६५ आणि रमाई आवास योजनेतून दीड हजार लाभार्थ्यांना हक्काचे घरकूल मिळाले.

## रोजगाराची संधी

युवकांना प्रशिक्षित करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत ४८४२ नागरिकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून, अडीच हजार नागरिकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. गेल्या दोन वर्षात १२ रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले त्याद्वारे तीन हजार ६०० उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.



**दादाजी भुसे**
ग्रामविकास
राज्यमंत्री

## शिधापत्रिका धारकांना धान्य वाटप

ईपीडीएस, एससीएमएस आणि पॉईंट ऑफ सेल मशीन्सच्या माध्यमातून, वापराच्या पहिल्याच महिन्यात एकूण वितरणाच्या ५० टक्क्यापेक्षा जास्त वितरण; हे आधारद्वारे ओळख पटवणाऱ्या पीओएस मशीनद्वारे करण्यात जिल्ह्यास यश मिळाले आहे. यामुळे चार लाख ३१ हजार शिधापत्रिका धारकांना धान्य वाटप करून, राज्यात नाशिक जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे.

## ऑनलाइन दाखले

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची अंमलबजावणी राज्यात सुरू झालेली आहे. त्यानुसार विविध प्रकारचे दाखले ऑनलाइन पद्धतीने देण्यात येत आहेत. जून २०१७ या महिन्यात राज्यात वितरित एकूण १२ लाख २९ हजार ४०८ ऑनलाइन प्रमाणपत्रांपैकी १ लाख ३० हजार प्रमाणपत्रे नाशिक जिल्ह्याने निर्गमित केली आहेत. हे प्रमाण राज्याच्या एकूण आकडेवारीच्या जवळपास ११ टक्के इतके आहे.

जिल्ह्यात ९७ टक्क्यांपेक्षा जास्त सातबारा तपासून त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. संगणकीकृत स्वाक्षरी (डिजिटल सिग्नेचर) असलेल्या ७/१२ चे वितरण राज्यात सर्वप्रथम नाशिक व वर्धा या दोन जिल्ह्यात सुरू झाले आहे.

नाशिक शहराची निवड केंद्र सरकारच्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांतर्गत झाली आहे. त्यानुसार स्मार्ट सिटी कंपनीची स्थापना करण्यात आली आहे.

नाशिक महानगर प्रदेश क्षेत्रातील कोणत्याही भागाचा योग्य, शिस्तबद्ध आणि जलद विकास करण्याच्या अनुषंगाने नाशिक प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना १ मार्च २०१७ रोजी करण्यात आली. विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून विकासकामांसाठी निधीची उपलब्धता, पायाभूत सुविधांचा विकास, विकासाचे योग्य नियोजन आणि गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

## हागणदारीमुक्त

'स्वच्छ भारत' अभियानात जिल्ह्याने भरीव कामगिरी केली आहे. ग्रामीण भागात एकूण ३ लाख ३६ हजार ९९८ शौचालय बांधण्याचे उद्दिष्ट असून, आतापर्यंत दोन लाख ३६ हजार ९३७ शौचालय बांधण्यात आली आहेत. एकूण १३६८ पैकी ८०८ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. यापैकी ५०८ ग्रामपंचायती एका वर्षात हागणदारीमुक्त झाल्या आहेत.केवळ २०१६-१७ या एका वर्षात जिल्ह्यात एक लाख ४ हजार ३१९ शौचालये बांधण्यात आलीत. २०१६-१७ या वर्षात सर्वाधिक शौचालये बांधण्यात पुण्यानंतर नाशिक जिल्ह्याचा दुसरा क्रमांक आहे. जिल्ह्यातील देवळा, कळवण आणि नाशिक हे तीन तालुकेदेखील हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहेत.

**गरीब आणि गरजू रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यात एक लाख ६० हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली. पंडित दीनदयाल उपाध्याय स्वस्थ महाराष्ट्र अभियानांतर्गत एकूण एक लाख ५६ हजार रुग्णांची प्राथमिक तपासणी करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार गरजू रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. स्वच्छ भारत अभियानांतर्गत २०१६-१७ च्या 'कायाकल्प' योजनेंतर्गत जिल्हा रुग्णालयाला राज्यात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.**



**- डॉ. किरण मोघे**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक



जलयुक्त सिमेंट नालाबांध कुमशेत, ता. अकोले

**जलयुक्त शिवार अभियानाला अहमदनगर जिल्ह्यात लोकचळवळीचे स्वरूप आले आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या कामातून टंचाईग्रस्त गावांची जलस्वयंपूर्ण गावाकडे वाटचाल सुरू आहे. गावातील पीकपद्धती बदलली असून १ लाख ९२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. गावशिवारात झालेल्या कामांमुळे ९६ हजार टीसीएम एवढा पाणीसाठा निर्माण झाला आहे.**

# शिवार भरले, शेतकरी आनंदला...



अहमदनगर जिल्ह्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार योजना राबवण्यासाठी कृषी, जलसंधारण व जलसंपदा, वन, सामाजिक वनीकरण, भूजल सर्वेक्षण यंत्रणा, जिल्हा परिषदेचा लघु पाटबंधारे विभाग आदी विभागासह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. जानेवारी २०१५ मध्ये कामाला सुरवात झाली. जलयुक्त शिवार अंतर्गत मिळालेल्या निधीतून टंचाईस्थितीत केलेल्या कामांमुळे जलयुक्त शिवार अभियानातील गावे जलसमृद्धीच्या वाटेवर आहेत. २०१५-१६ मध्ये २७९ तर २०१६-१७ मध्ये २६८ गावात जलयुक्त शिवार अभियानातील कामे पूर्ण झाली आहेत. एकूण ५४७ गावांत जलयुक्त शिवार अभियानातून झालेल्या कामामुळे गावांची जलस्वंयपूर्णतेकडे वाटचाल सुरू आहे.

२०१७-१८ मध्ये २४१ गावांची निवड करण्यात आली आहे. गावांमध्ये नाल्यांचे रुंदीकरण, खोलीकरण व गरज असलेल्या गावात नव्याने बंधारा खोलीकरणाची कामे केली आहेत. ज्या गावात नाल्यात गाळ साचला होता. त्या गावात गाळ काढून नाला खोलीकरण करण्यात आले.

## लोकसहभागाने मिळाली गती

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्ह्यात २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षात १ लाख ८१ हजार १२५ हेक्टर क्षेत्रावरील २३ हजार ८१० कामांचे नियोजन करण्यात आले. त्यापैकी १ लाख ६७ हजार ९० हेक्टर क्षेत्रावर २१ हजार ४७१ कामे पूर्ण झाली. उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. कर्जत, अकोले तालुक्यातील कुमशेत, श्रीगोंदा तालुक्यातील चिखली, नगर तालुक्यातील गुंडेगाव व पारनेर तालुक्यातील पळवे गावात जलयुक्तच्या माध्यमातून उल्लेखनीय कामे झाली आहेत. विशेष म्हणजे जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान राबवताना गावपातळीवर लोकसहभाग महत्त्वाचा ठरला. २०१५ पासून सुरू झालेल्या जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १ लाख ६७ हजार हेक्टर क्षेत्रावर २१ हजार ४७१ कामे पूर्ण झाल्यामुळे सुमारे १ लाख ९२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल, असा अंदाज कृषी विभागाकडून बांधण्यात आला आहे. पाणीसाठ्यात वाढ झाली असली तरी शेतकरी पाण्याचा वापर अत्यंत



**“ पाणीटंचाई असलेली तसेच गेल्या तीन वर्षात टँकर सुरू असलेल्या व ५० टक्के पाणलोटाची कामे न झालेल्या गावात, जलयुक्त शिवार अभियान राबवण्याचा आराखडा समोर ठेवून; कृषी विभागाने गावात कामांना सुरुवात केली. टंचाईची परिस्थिती अनुभवलेल्या गावशिवारातील विहिरींच्या पाणीपातळीत त्यामुळे वाढ झाली आहे.**

**– प्रा. राम शिंदे, पालकमंत्री, अहमदनगर ”**




काटकसरीने करू लागले आहेत.

### कृषी योजनांचा लाभ

शेतीच्या विकासासोबतच शेतीतील यांत्रिकीकरण वाढीसाठी व शेतमालाच्या संरक्षणासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या माध्यमातून कांदाचाळ, शेततळे अस्तरीकरण, सामूहिक शेततळे, महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवड, गांडूळ प्रकल्प व उन्नत शेती, समृद्ध शेतकरी योजने अंतर्गत कृषी यांत्रिकीकरण, पाण्याच्या सुयोग्य वापरासाठी ठिबक व तुषार वापर वाढवण्यासोबतच प्रधानमंत्री पीक विमा योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत. शेतीच्या सर्वांगीण विकासासोबतच शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी राष्ट्रीय कृषी तंत्रज्ञान प्रकल्प (आत्मा) अंतर्गत शेतकऱ्यांना विक्री कौशल्याचे धडे देण्यात येत आहेत.

### श्री साई समाधी शताब्दी महोत्सवासाठी विकास आराखडा

शिर्डी येथील श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवासाठी राज्य शासन व संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या विविध कामांसाठी सुमारे ३ हजार २३ कोटी १७ लाख रुपयांच्या कृती आराखड्याला मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या निधीतून करण्यात येणाऱ्या कामांनाही मान्यता देण्यात आली. हा महोत्सव जागतिक दर्जाचा व्हावा, यासाठी नियोजन सुरू आहे.

### प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुशिक्षित बेरोजगाराकरिता केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात करण्यात आली. २०१४-१५ मध्ये १०९ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. २०१६-१७ या वर्षामध्ये ९४ लाभार्थीचे उद्दिष्ट असून त्यापैकी ८५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. नवीन सूक्ष्म उद्योग सुरू झाले असून ग्रामीण व शहरी भागात यामुळे रोजगार निर्मिती झाली आहे.

### पर्यटनाला चालना

जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत २०१६-१७ मध्ये जिल्ह्यात नावीन्यपूर्ण योजना राबवण्यात आल्या, यामध्ये अहमदनगर येथील पोलीस दलाकरिता ध्वनिप्रदूषण मापक यंत्र, अंगणवाडी स्तरावर ग्राम बालविकास केंद्र, तारांगण शैक्षणिक प्रकल्पाची उभारणी, पारनेर, शेवगाव, कर्जत, अकोले, संगमनेर व कोपरगाव येथे टॉन्सफॉर्मर भवनाची उभारणी करण्यासोबतच कर्जत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाची उभारणी अशा नावीन्यपूर्ण योजना राबवण्यात आल्या आहेत. श्रीक्षेत्र देवगड देवस्थान, निघोज कुंड, भंडारदरा परिसर, हजरत मिरावली पहाड यासह जिल्ह्यातील १६ तीर्थक्षेत्र व पर्यटनासाठी प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत २५ कोटी ९१ लाख रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे. एकूणच मोठ्या पर्यटनस्थळासोबतच छोट्या पर्यटनस्थळांच्या विकासाला गती देण्यात आली आहे.

### ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना बळकटी

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नेवासा तालुक्यातील १६ गावे, शेवगाव तालुक्यातील २८ गावे, राहाता व श्रीगोंदा तालुक्यातील प्रत्येकी एक गाव या गावात पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर आहे. यामुळे ५५ गावांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मिटणार आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत कर्जत तालुक्यातील निमगाव गागंर्डा व इतर १७ गावांसोबतच मिरजगाव पाणीपुरवठा योजना व पारनेर तालुक्यातील सुपा पाणीपुरवठा योजनेसोबतच तीन पाणीपुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आल्याने, २० गावांचा पाणी प्रश्न सुटणार आहे. यासोबतच जलस्वराज्य, सांडपाणी प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. केंद्रपुरस्कृत अमृत अभियानांतर्गत अहमदनगर शहर पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे.

### २ हजार १४२ अंगणवाड्या डिजिटल



**डिजिटल शाळा, मजले चिंचोली, जि. अहमदनगर**

जिल्ह्यात डिजिटल अंगणवाणी केंद्रामध्ये टी.व्ही. सिडी प्लेअर, मॅट, बोलक्या भिंतींची सजावट करण्यात आली असून त्यासाठी लोकसहभागातून ८८ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. या माध्यमातून २ हजार १४२ अंगणवाड्या डिजिटल करण्यात आल्या आहेत. यासोबत वजन सनियंत्रण, बेटी बचाव बेटी पढाओ उपक्रम, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, कराटे प्रशिक्षण, जलशुद्धीकरण यंत्रांचा पुरवठा अशा विविध योजना महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून राबवण्यात आल्या आहेत. ग्रामबालविकास केंद्राच्या माध्यमातूनही कामे सुरू आहेत.

**- गणेश फुंदे**
प्रभारी माहिती अधिकारी, अहमदनगर



अजंदे बुद्रूक, ता. शिरपूर, जि. धुळे येथे बांधण्यात आलेली घरकुले

# घरकुलात आघाडी

**धुळे जिल्ह्यात गेल्या ३ वर्षांत डिजिटल शाळा, जलयुक्त शिवार अभियान, मागेल त्याला शेततळे, प्रधानमंत्री आवास योजना, पर्यटन विकास, रस्ते, कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना आदी योजनांमधून विकासकामे सुरू आहेत.**

ग्रामीण भागासाठी असलेल्या प्रधानमंत्री आवास योजना, राज्य शासन पुरस्कृत शबरी व पारधी आवास योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धुळे अंतर्गत राबवण्यात येत आहे. यात धुळे जिल्हा राज्यात अव्वल आहे. या सर्व योजनांसाठी २०१६- २०१७ या आर्थिक वर्षांत धुळे जिल्ह्यासाठी ९०१४ घरकुलांचे उद्दिष्ट केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झाले होते. विहित निकषानुसार व ग्रामसभेने मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणास्तरावरुन ९ हजार १२० पात्र लाभार्थ्यांना ऑनलाइन मान्यता देण्याची कार्यवाही ३१ मार्च २०१७ अखेर करण्यात आली. विविध आवास योजनांच्या लाभार्थ्यांना मान्यता देण्याचे उद्दिष्ट १०१ टक्के पूर्ण करून धुळे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे.

### पर्यटन विकासासाठी निधी

राज्य शासनाने धुळे जिल्ह्यास पर्यटन विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. विविध पर्यटन व तीर्थक्षेत्रांचा विकास करून पर्यटकांना आकर्षित करण्यात येत आहे. लळिंग, सोनगीर, थाळनेर येथील किल्ल्यांच्या विकासासाठी ९० लक्ष रुपयांचा निधी दिला आहे. पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी दीड कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.

### मनमाड- इंदूर रेल्वे मार्ग

मनमाड- मालेगाव- धुळे- इंदूर रेल्वे मार्गास मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पाचा अहवाल तयार झाला असून तो रेल्वे मंडळाला सादर करण्यात आला आहे. या रेल्वे मार्गामुळे मनमाड-इंदूर ही महत्त्वाची शहरे रेल्वे मार्गाने जोडली जाणार आहेत. या रेल्वे मार्गासाठी केंद्रीय जहाज बांधणी विभाग ५० टक्के निधी देणार आहे.

### वनहक्क, पेसाचा लाभ

धुळे जिल्ह्यातील शिरपूर व साक्री हे दोन तालुके आदिवासीबहुल



**"लोकसहभाग मिळाला, तर काय होऊ शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा होय. लोकसहभागातून जिल्ह्यातील सर्व १ हजार १०३ शाळा डिजिटल झाल्या आहेत. या चळवळीतून ७ कोटी २८ लाख ६९ हजार रुपये एवढा निधी जमा झाला. डिजिटल शाळेसंदर्भात हा जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. या चळवळीची नोंद राज्यपाल महोदयांनीही घेतली आहे. ही चळवळ डिजिटल क्लासरूमपर्यंतच मर्यादित राहिली नाही, तर २१७ शाळांमध्ये हॅण्डवॉश स्टेशन तयार झाले आहे.**

**– दादाजी भुसे, पालकमंत्री, धुळे"**




आहेत. या दोन्ही तालुक्यात आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाच्या ५ टक्के निधी थेट पेसा कायद्यांतर्गत ग्रामपंचायतींना उपलब्ध होणार आहे. धुळे जिल्ह्यातील एकूण १८७ गावांचा समावेश पेसा कायद्यांतर्गत येतो. साक्री तालुक्यातील ११६ गावांचा, तर शिरपूर तालुक्यातील ७१ गावांचा समावेश आहे. धुळे जिल्ह्यास गेल्या आर्थिक वर्षात एकूण ३० कोटी रुपयांचा निधी थेट ग्रामपंचायतीच्या खात्यात जमा करण्यात आला आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी अधिनियमानुसार धुळे जिल्ह्यात तब्बल १४ हजार ३०५ दावे मान्य झाले आहेत. आदिवासी बांधवांना ६१ हजार १७४ एकर क्षेत्राचे वितरण झाले असून जिल्ह्यात सामूहिक वनहक्काचे १८८ दावे मान्य झाले आहेत. कर्ज, शासन योजनांच्या लाभासाठी वनहक्कधारक पात्र ठरले आहेत. टायटल्सच्या आधारावर कर्ज सुविधेचा लाभ मिळणार आहे. धुळे शहर, पिंपळनेर, (ता. साक्री) आणि दोंडाईचे, (ता. शिंदखेडा) येथे अपर तहसील कार्यालये १ मे २०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

नागपूर- सुरत दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ चे विस्तारीकरण करण्यात येत आहे. याअंतर्गत फागणे ते गुजरात सीमेपर्यंत चौपदरीकरण सुरू आहे. त्याचा एकूण १८८५ कोटी रुपयांचा होणार खर्च आहे. धुळे ते औरंगाबाद महामार्गाचेही चौपदरीकरण करण्यात येणार आहे. तेलवाडी ते धुळे पर्यंत ११७६ कोटींचा खर्च येणार आहे. केंद्रीय रस्ते विकास निधीतून ३ रस्त्यांचा विकास करण्यात येणार आहे.



**जयकुमार रावल**
पर्यटन, रोहयो
मंत्री

**शेतकऱ्यांना सिंचनासाठी सातत्याने पाणी उपलब्ध व्हावे, त्यांना बागायती पिके घेता यावीत म्हणून जलयुक्त शिवार अभियान हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या अभियानात पहिल्या वर्षी १२९ गावांची निवड करण्यात आली. दुसऱ्या वर्षी १२३ गावांची निवड करण्यात आली होती. आता २०१७- २०१८ यावर्षासाठी ९५ गावांची निवड करण्यात आली आहे. या अभियानामुळे निर्माण झालेल्या पाणी साठ्याची क्षमता ४३ हजार ७० टीसीएम एवढी आहे. प्रत्यक्षात निर्माण झालेला पाणीसाठा २३ हजार ६८६ टीसीएम एवढा आहे. विहिरींच्या भूजल पातळीतही १ ते दीड मीटरने वाढ झाली आहे. या अभियानाचे आणखी चांगले परिणाम आगामी काळात दिसून येतील.**



## प्रधानमंत्री कृषी सिंचन

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत जिल्ह्यात गेल्या आर्थिक वर्षात ३ हजार २२१ शेतकऱ्यांच्या ४ हजार ४७४ हेक्टर क्षेत्राला लाभ देण्यात आला. त्यांच्या चालू वित्तीय वर्षासाठी जिल्ह्यात १० हजार १२७ शेतकऱ्यांच्या ८ हजार ५७८ हेक्टर क्षेत्रासाठी सिंचन प्रकल्प प्रस्तावित आहे. जिल्ह्यात मागेल त्याला शेततळे योजनेत आतापर्यंत ६२ शेततळ्यांचे काम पूर्ण झाले आहे. त्यावर २८ लाख ९७ हजारांचा निधी खर्च झाला आहे.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत खरीप हंगाम हंगामातील प्रतिकूल नुकसान भरपाईपोटी जिल्ह्यास रुपये २० कोटी ५९ लाख रुपये मंजूर झाले आहेत. हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत डाळिंब पिकाच्या मृग बहारासाठी, सहभागी शेतकऱ्यांपैकी १ हजार १३८ शेतकऱ्यांना रुपये ५ कोटी ८९ लाखांचा फळपीक विमा मंजूर झाला आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत खरीपमागील तीन वर्षात २२६३.८८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

## सात हजार विहिरींचे उद्दिष्ट

अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेसाठी धुळे जिल्ह्यास सात हजार विहिरींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत ७०९ कामे पूर्ण झाली असून तीन हजार ३७६ कामे प्रगतिपथावर आहेत. या वर्षी धुळे जिल्ह्यात तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले. २२ एप्रिल २०१७ पर्यंत २९ हजार ७९४ क्विंटल तुरीची खरेदी करण्यात आली. मुद्रा योजनेंतर्गत धुळे जिल्ह्यातील ६६ हजार २५४ लाभार्थ्यांना २०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

## रुग्णालयातील विविध पदांना मंजुरी

जिल्हा रुग्णालय, धुळे येथे १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयासाठी व तेथील १० विशेषोपचार कक्षासाठी विविध पदांना मंजुरी यापूर्वीच दिली आहे. १०० खाटांच्या स्त्री रुग्णालयासाठी आवश्यक पदांना मंजुरी दिली गेली आहे.

**- रणजीत सिंह राजपूत**
जिल्हा माहिती अधिकारी, धुळे






# सिंचन क्षमतेत वाढ

**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जळगाव जिल्ह्यातील विविध कामांमुळे ५२ हजार ४४२ टीसीएम एवढी पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे ७४ हजार ९९१ हेक्टर क्षेत्राला एक वेळ संरक्षित सिंचनाची क्षमता निर्माण झाली आहे.**

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत जिल्ह्यात २०१५-१६ मध्ये २३२ गावांची निवड करण्यात आली होती. यापैकी आठ गावे १०० टक्के ठिबकखाली आणण्यात यंत्रणेला यश आले. नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत ९ नद्यांवर ८४ साखळी सिमेंट बंधारे बांधण्यात आले. २०१६-१७ मध्ये या अभियानांतर्गत जिल्ह्यातील २२२ गावांची निवड करण्यात आली. त्यातून ४ हजार २६० कामे करण्यात आली आहेत. पूर्ण झालेल्या कामांमुळे १६ हजार ३२४ टीसीएम साठवण क्षमता निर्माण झाली असून या साठवण क्षमतेमुळे ३२ हजार ६४८ हेक्टर क्षेत्राला दोन वेळेस पाणी देता येणार आहे. तिसऱ्या टप्प्यात २०६ गावांची निवड करण्यात आली आहे. 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत १६२६ शेततळी पूर्ण झाली आहेत.

## दळणवळणाच्या सुविधांना चालना

जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्ह्यात दळणवळणाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी २०१६-१७ मध्ये सर्वसाधारण योजनेतून ३०५ कोटी ९९ लाख रुपये, आदिवासी उपयोजनेतून (टीएसपी) २४ कोटी ५३ लाख, आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र (ओटीएसपी) ४६ कोटी २४ लाख रुपये तर अनुसूचित जाती उपयोजनेमधून ७९ कोटी १८ लाख रुपयांची कामे जिल्ह्यात करण्यात आली आहेत.



**विविध घटकांतील नागरिकांना त्यांचे घरकूल असावे यासाठी आर्थिक सर्वेक्षणानंतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक आणि इतर प्रवर्गातील एकूण ८३ हजार ४९४ पात्र लाभार्थी निश्चित करण्यात आले आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १२ हजार २९१, रमाई आवास योजनेंतर्गत एक हजार ७२६, शबरी योजनेंतर्गत एक हजार १५३ तर पारधी योजनेंतर्गत १६० लाभार्थ्यांना घरांचा पहिला हप्ता देण्यात आला आहे. अपूर्ण घरांचे काम पूर्ण करण्याच्या विशेष मोहिमेत जिल्ह्यात ५ हजार ४२३ घरांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून या कामात जिल्हा राज्यात पहिल्या क्रमाकांवर आहे.**

**– चंद्रकांत पाटील, पालकमंत्री, जळगाव**

## ऊर्जा

जिल्ह्यात मागील तीन वर्षाच्या कालावधीत एक लाख ४५ हजार ८९६ वीज ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात आली आहे. ३७ नवीन उपकेंद्रे, २१९८ नवीन वितरण रोहित्रे, १७०० कि.मी. नवीन वीज वाहिनीची कामे पूर्ण झाली आहेत. दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत १९ नवीन उपकेंद्रे, ७२२ नवीन वितरण रोहित्रे, ५३४ कि.मी. नवीन वीज वाहिनी व २२ हजार ३६५ ग्रामीण कुटुंबांना वीजजोडणीची कामे सुरू करण्यात आली आहे. एकात्मिक ऊर्जा विकास योजनेंतर्गत १६ नवीन उपकेंद्रे, ८६२ नवीन वितरण रोहित्रे, २२९ कि.मी. नवीन वीज वाहिनीच्या कामांना सुरुवात झाली आहे.

## कृषी

जिल्ह्यातील केळी वाहतुकीसाठी व्हीपीयू प्रकारची रेल्वे वाहतूक कार्यान्वित करण्यात येत आहे. बुरशीजन्य रोगाचा प्रतिबंध करण्यासाठी कीड व रोग नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे माहिती दिली जाते. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून जळगाव येथे टिश्यू कल्चर संशोधन केंद्र, कृषी महाविद्यालय, चाळीसगाव येथे लिंबुवर्गीय फळ संशोधन केंद्र आदी प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे. उत्पादक शेतकऱ्यांमध्ये जागृती करून त्यांचा माल थेट बाजारात आणून विकता यावा यासाठी शेतकरी गटांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. 'आत्मा' (ॲग्रीकल्चरल टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट एजन्सी) मार्फत शेतमाल विक्रीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. मुक्ताईनगर येथे कृषी महाविद्यालय, रावेरला हॉर्टिकल्चर महाविद्यालय, पाचोरा भागासाठी



**गिरीश महाजन**
जलसंपदा मंत्री

पशू वैद्यकीय महाविद्यालय, चाळीसगाव येथे डेअरी डेव्हलमेंट महाविद्यालय कार्यान्वित होणार आहे.

जिल्ह्यातील १८४६ शाळांपैकी आतापर्यंत ८०५ शाळा डिजिटल झाल्या असून १८०९ मोबाइल डिजिटल शाळा आहेत. ६२ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना आयएसओ प्रमाणपत्र मिळाले आहे. जिल्ह्यात इंग्रजी माध्यमाच्या ८०५ विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतला आहे.

### स्वच्छ भारत अभियान

स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्ह्यातील १६ पैकी १२ नगरपालिका हागणदारीमुक्त झाल्या आहेत. नगरपालिका क्षेत्रात बांधावयाच्या २० हजार १७० शौचालयांपैकी १६हजार १६९ शौचालयांची कामे पूर्ण झाली आहे. ग्रामीण भागात ६० टक्के कुटुंबांची शौचालयाची कामे पूर्ण झाली आहेत. जिल्ह्यातील प्रमुख राज्यमार्ग क्र. ५ ची संपूर्ण लांबी (१०५ किलोमीटर) राष्ट्रीय महामार्ग म्हणून दर्जोन्नत झाली आहे. जिल्ह्यात इतर माध्यमातून ४०५ किलोमीटरची विविध रस्त्यांची कामे सुरू होत आहेत.



**गुलाबराव पाटील**
सहकार राज्यमंत्री

जिल्ह्यातील ११ लाख ६५ हजार ८७८ सर्व्हे नंबरपैकी ११ लाख ३९ हजार ३३२ सर्व्हे नंबरचा ७/१२ ऑनलाइन करण्याचे काम जिल्ह्यात पूर्ण झाले आहे. यामुळे खातेदारांना आपल्या मालमत्तेचा ७/१२ ऑनलाइन मिळण्यास मदत होणार आहे.

### योजनांची अंमलबजावणी

जिल्ह्यात 'मेडिकल हब'ला शासनाने मान्यता दिली आहे. या ठिकाणी वैद्यकीय, आयुर्वेदिक, ॲलोपॅथीबाबतचे शिक्षण देण्यात येणार आहे. अपंगांचे पुनर्वसन करण्यासाठी २३०१ लाभार्थ्यांना १९ प्रकारांतील ४०८२ उपकरणांचे वाटप करण्यात आले आहे. वृक्षलागवड मोहिमेंतर्गत जिल्ह्यात २२ लाख ५१ हजार इतकी वृक्षलागवड करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा जिल्ह्यातील २.५ ते ३ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. जिल्ह्यात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' उपक्रमाची व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात आल्याने २०११ च्या जनगणनेनुसार मुलींचा जन्मदर ८४२ होता तो आता ९०३ पर्यंत वाढला आहे.

**- विलास बोडके**
जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव




# पर्यटनातून परिपूर्णतेकडे...

**नंदुरबार जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात विविध विकास कामे झाली आहेत. या जिल्ह्याने पर्यटनाच्या माध्यमातून विकासाकडे झेप घेतली आहे. पुढील काळात थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ, घोडेबाजारासाठी देशभरात प्रसिद्ध असलेल्या सारंगखेडा, प्रतिकाशी प्रकाशे, स्वातंत्र्य वीरांचे स्मरण असलेले रावलापाणी यासह विविध पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास केला जात आहे.**

जिल्ह्याने गेल्या तीन वर्षांत विविध विकास कामात प्रगती साधली आहे. तापी पाटबंधारे विकास महामंडळ कार्यक्षेतील धुळे जिल्ह्यातील ८, जिल्ह्यातील १४ उपसा सिंचन योजनांच्या ४१.७८ कोटींच्या विशेष दुरुस्तीच्या कामांना मंजुरी दिली आहे. या उपसा सिंचन योजना पुनर्कार्यान्वित केल्यास ९०.५० दलघमी पाणी सिंचनासाठी वापरात येणार आहे. १४४१३ हेक्टर क्षेत्र पुनर्स्थापित होऊन ५९ गावांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तापी नदीवरील प्रकाशा बॅरेजमध्ये ६२.११ दलघमी, तर सारंगखेडा बॅरेजमध्ये ९१.८१ दलघमी पाणीसाठा निर्माण झाला आहे. त्यातून साधारणपणे १७.२८ दलघमी पाण्याचा वापर सुरू झाला आहे.

### वन गावांच्या भूमापनासाठी निधी

जिल्ह्यातील अक्राणी तालुक्यातील ८८ वन गावांचे भूमापन न झाल्यामुळे या गावांना अद्याप महसुली गावांचा दर्जा प्राप्त झालेला नाही. या गावांची मोजणी करण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. नंदुरबार हा जिल्हा आदिवासी व डोंगराळ म्हणून ओळखला जातो. या भागातील आदिवासी बांधवांना वैद्यकीय सोयी-सुविधा तत्काळ मिळाव्यात, त्यांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मध्ये २९ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

### वार्षिक योजनेत भरीव निधी

जिल्हा वार्षिक योजनेत २०१७-१८ करिता ६७.३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. आदिवासी उपयोजना (टीएसपी) करिता प्राप्त तरतूद ४५०२४.५८ लक्ष रुपये आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील

(ओटीएसपी) करीता प्राप्त तरतूद ६२५.७० लक्ष रुपये आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षातील नियोजित नियतव्ययाच्या खर्चासाठी कालबद्ध नियोजनाची प्रक्रिया पार पाडण्यात येत आहे.

## पर्यटनातून होणार समृद्धी



अक्कलकुवा तालुक्यातील काठी येथील रजवाडी होलिकोत्सव

नंदुरबार जिल्ह्यात सारंगखेडा विस्तीर्ण अशा सातपुड्याच्या रांगा आहेत. या रांगांमध्ये महाबळेश्वरनंतर राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण तोरणमाळ आहे. सारंगखेडा व अस्तंबा यात्रा भरते. जिल्ह्यातून तापी आणि नर्मदा नदी वाहते. तापीवरील प्रकाशे व सारंगखेडा बॅरेजमध्ये बारमाही पाणी उपलब्ध आहे. तेथे बोटिंग सुरू करता येईल का याची चाचपणी केली जात आहे. याशिवाय उनपदेव गरम पाण्याचे झरे येथे आहेत. प्रकाशासारखे तीर्थक्षेत्र या जिल्ह्यात आहे. या पर्यटन व तीर्थस्थळांच्या विकासासाठी गेल्या वर्षी १ कोटी ५५ लाखांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. सारंगखेडा येथे आंतरराष्ट्रीयस्तरावरील अश्व संग्रहालयास चालना देण्यात आली आहे. सारंगखेडा यात्रेचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध माध्यमातून ब्रॅंडिंग करण्यात येत आहे. काळमदेव, प्रकाशा, मोड-चैतन्यश्वेर, रावलापाणी, हजरत इमाम बादशाह दर्गा या पर्यटन व तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी सव्वा तीन कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे.



**"नंदुरबार येथे सुमारे ६०० कोटी रुपये खर्चाच्या वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरी मिळाली असून त्यासाठी २५ एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेवर ५०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणार आहे. नंदुरबार येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून दीड लाख रुग्णांवर औषधोपचार करण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून या जिल्ह्यातील कुपोषण आणि सिकलसेल सारख्या आजारांचे निर्मूलन करण्यास मोठी मदत होत आहे.**

**- जयकुमार रावल, पालकमंत्री, नंदुरबार"**

आदिवासी बांधवांचा होळी हा महत्त्वाचा सण आहे. होलिकोत्सवाचेही ब्रॅण्डिंग करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अक्कलकुवा तालुक्यातील काठी येथील रजवाडी होलिकोत्सवासाठी जिल्हा परिषदेने ११ लक्ष रुपये उपलब्ध करून दिले.तसेच यात्रास्थळ विकासासाठी ५ लाख रुपयांचा निधी दिला. गेल्या आर्थिक वर्षात पेसा ग्रामपंचायतींसाठी ४९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यातून २,७०० कामे पूर्ण झाली आहेत.

## कृषी विकास

'मागेल त्याला शेततळे' योजनेत जिल्ह्यासाठी १ हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मार्च अखेर तब्बल ४३६ शेततळ्यांचे काम पूर्ण झाले आहे. त्यावर २१४ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमासाठी दोन हजार हेक्टरचे उद्दिष्ट होते. आतापर्यंत ५५० हेक्टर क्षेत्रात फळबाग लागवड करण्यात आली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा जिल्ह्यातील २ हजार ८८० शेतकऱ्यांना १ कोटी ४८ लाख रुपयांचा लाभ होणार आहे.

जलयुक्त शिवार अभियानात गेल्या तीन वर्षात २३६ गावांची निवड करण्यात आली आहे. लोकसहभागातून १४१ गावांतल्या तलावातील सुमारे १ लाख २२ हजार घनमीटर गाळ काढण्यात आला आहे.

## सायबर लॅब

सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हास्तरावर सायबर लॅब, महाराष्ट्र 'सीईआरटी', सेक्युरीटी ऑपरेशन सेंटर व ट्रेनिंग सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

## मच्छीमार व्यवसायासाठी पूरक साहित्य

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील प्रकल्पग्रस्त आदिवासी बांधवांच्या मच्छिमार सहकारी संस्थांना शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागातर्फे साहित्य वाटप व शीत वाहन वितरण करण्यात आले. या साहित्यामुळे व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळेल ते स्वावलंबी होतील. संस्था स्वयंपूर्ण होतील. सरदार सरोवर प्रकल्पामुळे तयार झालेल्या जलाशयामुळे मत्स्यव्यवसायाची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे विस्थापित कुटुंबांच्या उत्पन्नात भर पडेल. यांत्रिक नौका, साहित्यामुळे मत्स्य उत्पादन वाढेल. मच्छीमार संस्थांना तांत्रिक प्रशिक्षण शासनामार्फत देण्यात येणार आहे.

**- दिनेश चौरे**
नंदुरबार






# आदर्श पुनर्वसन

**सातारा जिल्ह्यात धरणांची संख्या लक्षणीय असली तरी काही भाग अवर्षणग्रस्त म्हणून ओळखला जातो. त्यामध्ये जिल्ह्यातील खटाव, माण आणि फलटण या तालुक्यांचा समावेश होतो. कोणताही प्रकल्प कार्यान्वित करत असताना स्थानिकांचे पुनर्वसनही तेवढेच महत्त्वाचे असते. सातारा जिल्ह्यात प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसन चांगल्या प्रकारे झाले आहे. एकूण ८२ पैकी ५७ गावठाणात नागरी सुविधांची कामे पूर्ण झाली आहेत. अन्य गावांचे काम गतीने होण्यासाठी प्रशासन कामाला लागले आहे. जिल्ह्यातील उरमोडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले असून, त्याकडे आदर्श पुनर्वसन म्हणून पाहिले जाते.**

लोकांचा सहभाग असलेली जलयुक्त शिवार अभियान या योजनेचे दृष्य परिणाम जिल्ह्यात पाहायला मिळत असून २०१५-१६ मध्ये २१५ गावांची निवड जलयुक्त शिवार अभियानासाठी करण्यात आली होती. ही सर्व गावे जलयुक्त झाली आहेत. ३१,९११ टीसीएम एवढा पाण्याचा साठा तयार झाला असून या माध्यमातून मोठे संरक्षित सिंचन क्षेत्र निर्माण झाले. त्यातून संबंधित गावातील जलस्तर ०.५० ते ३ मीटरने वाढला. एवढेच नव्हे तर माण, खटाव, कोरेगाव आणि फ़लटण या तालुक्यातील अनेक गावातील उन्हाळ्यात टँकरनी पाणी पुरवठा करावा लागयचा तो लक्षणीय प्रमाणात कमी झाला.

## जलयुक्त शिवार अभियानाचे यश

२०१५- १६ सालातील जलयुक्त शिवार अभियानाचा द्वितीय राज्यस्तरीय पुरस्कार कोरेगाव तालुक्यातील वेळू गावास मिळाला आहे. 'सत्यमेव जयते वॉटर कप' राज्यस्तरीय स्पर्धेत क्रमांक एकचा पुरस्कार याच वेळू गावास मिळाला. कोरेगाव तालुक्यास द्वितीय राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे.

२०१६- १७ ला २१० गावाची जलयुक्त शिवार अभियानासाठी निवड करण्यात आली. ६,७९७ कामे करावयाची होती. यापैकी ३,७८४ कामे पूर्ण झाली असून ७२७ कामे प्रगतिपथावर आहेत. उर्वरित कामे जानेवारी २०१८ पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. २०१६- १७ मध्ये ४४ गावे जलयुक्त झाली. वॉटर कप स्पर्धेत जिल्ह्यातील ९६ गावे सहभागी झाली होती त्यातील ५ गावे अंतिम फेरीत गेली आहेत. २०१५-१६ मध्ये जिल्ह्यातील कराड तालुक्यातील किवळ येथील ओढा जोड प्रकल्प आणि चांदक-गुळूंब ओढा जोड प्रकल्प हे वैशिष्ट्यपूर्ण काम करण्यात आले आहे. २०१७-१८ साठी २१० गावांची जलयुक्त शिवार अभियानासाठी निवड झाली आहे.

## स्वच्छतेत प्रथम

स्वच्छता मोहिमेत जिल्ह्यातील ११ तालुके आणि संपूर्ण १४९० ग्रामपंचायती हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या. २५ मार्च २०१७ अखेर राज्यस्तरीय त्रयस्थ संस्थेकडून हागणदारीमुक्त ग्रामपंचायती तपासणी करण्यात आली होती, त्यात सर्व ग्रामपंचायती पात्र ठरल्या. सातारा जिल्हा स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) संकेतस्थळावर छायाचित्र अपलोड करण्यामध्ये राज्यात प्रथम क्रमांकावर होता. देशभरात क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियातर्फे स्वच्छतेचे सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यात सातारा जिल्हा संपूर्ण देशातून तिसरा आला आहे. वृक्षलागवड या मोहिमेत लक्षणीय वृक्षलागवड



**"समाधान शिबिरातून २६७ शिबिरे घेऊन ३ लाख ४२ हजार २०५ लाभार्थींना विविध योजनांचा लाभ देण्यात आला आहे. सातबारा, गाव नकाशे आणि उतारे यांचे संगणकीकरण करून ते ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. या संगणकीकृत माहितीचे चावडी वाचन करून पुन्हा संपादित करण्याच्या कामात जिल्हा राज्यात पहिला आहे. जिल्ह्यात झिरो पेंडन्सीचे काम जिल्हा प्रशासनामार्फत प्रत्येक तालुका आणि मंडल स्तरापर्यंत होत आहेत."**

**– विजय शिवतारे, पालकमंत्री, सातारा**



**महादेव जानकर**
पदुम मंत्री

करण्यात आली. यंदा ७ लाख ६३ हजार एवढे उद्दिष्ट असताना ८ लाखांच्या वर वृक्षलागवड करण्यात आली.

### घरकुलासाठी योजना

सातारा जिल्ह्यात सात हजार एकशे पंचेचाळीस घरकुले बांधून द्यावयाची असून, त्यापैकी दोन हजार पाचशे पंधरा एवढी पूर्ण झाली. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास, शबरी आणि पारधी घरकूल योजना यांचा समावेश आहे. राजस्व अभियानाच्या माध्यमातून ५८९ शिबिरे घेऊन तीन लाख ८५ हजार २२४ दाखले देण्यात आले आहेत.

### शेतकरी सन्मान

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत सातारा जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती बँक आणि इतर राष्ट्रीयकृत बँका यांची शेतकरी लाभार्थी अंदाजित संख्या ३ लाख ३५ हजार ५३० एवढी आहे. त्यांची थकबाकी अंदाजे २,३५,१२५.०० लाख एवढी आहे. तसेच ऑनलाइन माहिती भरली जात आहे.


### पुस्तकांचे गाव भिलार




सह्याद्रीच्या डोंगररांगात, जगप्रसिद्ध पाचगणी-महाबळेश्वर या गिरिस्थानाच्या जवळ वसलेले भिलार हे गाव गेल्या अनेक वर्षांपासून स्ट्रॉबेरीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. या गावात मराठी भाषा विभागाच्या वतीने ब्रिटनच्या 'हेऑनवे' पुस्तकाच्या गावाच्या धर्तीवरच पुस्तकाचे गाव साकारण्यात आले आहे. या पुस्तकाच्या गावात २५ घरात १५ हजार पुस्तके ठेवण्यात आली आहेत. पर्यटकांच्या आवडीनुसार या ठिकाणी वाचनासाठी साहित्य उपलब्ध आहे. घरांवर साकारण्यात आलेल्या विविध चित्रांच्या संगतीनुसार या ठिकाणी पुस्तकांची मांडणी करण्यात आली आहे.

**- युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

# सुबक आणि सुंदर



**पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी म्हणून वेगळी ओळख आहे. गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत ही ओळख आणखी दृढ झाली आहे. माहिती तंत्रज्ञान आणि ऑटोमोबाइलचे स्टार्टअप हब म्हणूनही जिल्ह्याला नवी ओळख मिळाली आहे. सरकारने राबवलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून पुणे हे विकासाचे नवे स्मार्ट मॉडेल म्हणून विकसित होत आहे.**

नगरविकास मंत्रालयाच्या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटीज मिशनच्या अंतर्गत देशातून पुणे शहराची निवड करण्यात आली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्मार्ट सिटी प्रकल्पांचे उद्घाटन करण्याचा मान पुण्याला मिळाला. या योजनेंतर्गत शहराचा विकास करण्यासाठी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (पीएससीडीसीएल) या स्वतंत्र कंपनीची स्थापना करण्यात आली. या योजनेंतर्गत सोलर सिटी, घनकचरा व्यवस्थापन, समान पाणीपुरवठा आणि स्मार्ट मिटरींग, झोपडपट्टी पुनर्विकास, स्मार्ट रस्ते, फूटपाथ, लाईट हाऊस, सेंट्रल कमांड कंट्रोल सेंटर, कॉमन मोबिलिटी कार्ड, सार्वजनिक वाहतुकीसाठी मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची निर्मिती होणार आहे. या सर्व कामांना सुरुवात झाली असून या योजनेमुळे पुणे शहर स्मार्ट होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

### विकास आराखड्याला मंजुरी

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या पुणे शहर विकास आराखड्याला शासनाने मंजुरी दिली आहे. यामुळे पुणे शहर आणि उपनगरांमध्ये पुनर्विकासाला चालना मिळणार आहे. या विकास




आराखड्यामुळे शहराची उभी वाढ (व्हर्टिकल ग्रोथ) होण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. या नव्या आराखड्यानुसार शहराच्या मध्यवस्तीत साडेतीन ते चार एफएसआय मिळणार असून जुन्या



गावठाणात भूखंडाच्या चौपट बांधकाम करणे शक्य होणार आहे. शहरातील मुळा आणि मुठा या दोन्ही नद्यांच्या ब्लू फ्लड लाइनचा व पूर नियंत्रक रेषेचा विकास आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे हा विकास आराखडा संतुलित आणि सर्वसमावेशक झाला आहे.

## तीर्थक्षेत्र विकास आराखडा

जिल्ह्यातील देहू-आळंदी, भंडारा डोंगर, सदुंबरे या तीर्थक्षेत्रांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. देहू तीर्थक्षेत्र विकास आराखड्यानुसार आतापर्यंत ४२५.४३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्यातील ३२ कोटी रुपये खर्चाची विविध विकास कामेही अंतिम टप्प्यात आली आहेत. या विकास आराखड्यांतर्गत देहूमध्ये मलनि:सारणांतर्गत भुयारी गटार योजना व मलशुद्धीकरण केंद्र साकारण्यात येत आहे. देहू येथील वैकुंठगमन स्थान परिसर, विकासांतर्गत महाद्वार २० खोल्यांचे भक्त निवास, २६ दुकान गाळे, अन्नछत्र, तुकाराम महाराज जीवन संग्रहालय, सभा मंडप अशा कामांना सुरुवात झाली असून ती अंतिम टप्प्यात आहेत.



**“संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज या दोन्ही संतांच्या पालख्या पुणे जिल्ह्यातून निघतात. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदी ते पंढरपूर पालखी मार्गाचा विकास सुरू करण्यात आला आहे. संत तुकाराम महाराजांच्या देहू ते पंढरपूर मार्गाचा विकासही सुरू करण्यात आला आहे. या दोन्ही मार्गांवरील तळांच्या विकासासाठी ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या तळांच्या भूसंपादनासाठी ११ कोटी ८० लाख रुपये मंजूर झाले आहेत. यापैकी बहुतांशी कामे मार्गी लागली असून उर्वरीत कामे अंतिम टप्प्यात आहेत.**

**– गिरीश बापट, पालकमंत्री, पुणे”**

## पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास (पीएमआरडीए)



**विजय शिवतारे**
मृद व जलसंधारण राज्यमंत्री

पुणे शहर आणि आजूबाजूच्या परिसराच्या नियोजनबद्ध विकासासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहर आणि परिसरातील वाहतूक, नियोजनबद्ध गृहबांधणी, औद्योगिक गुंतवणूक, कौशल्य विकास, नगरनियोजनाचे काम करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पीएमआरडीएच्या २०१७-१८ च्या वार्षिक अर्थसंकल्पाच्या बैठकीत ७९९ कोटी ६५ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. याच माध्यमातून पुणे ते लोणावळा दरम्यानच्या उपनगरीय रेल्वेसाठीचे आणखी दोन मार्ग विकसित करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर पीएमआरडीएच्या माध्यमातून परकीय गुंतवणूक विभाग स्थापन करण्यात येणार आहेत.

## विकासासाठी 'जायका'

पुणे शहराच्या पुढच्या ५० वर्षांचा सर्वंकष विकास आराखडा तयार करण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीशी (जायका) करार करण्यात आला आहे. या माध्यमातून पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी जपानच्या या कंपनीकडून आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य मिळणार आहे. हा प्रकल्प तब्बल १ हजार कोटी रुपयांचा आहे. या माध्यमातून मुळा आणि मुठा नद्यांचे शुद्धीकरण करण्यात येणार आहे. यासाठी या कंपनीने आर्थिक आणि तांत्रिक सहकार्य दिले आहे. याच माध्यमातून जिल्ह्यातील पवना आणि इंद्रायणी नद्यांसह उजनी धरणापर्यंत जाणारे पाणी शुद्ध करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

## प्रभावी जलयुक्त शिवार अभियान

जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेली २०० गावे टँकरमुक्त झाली आहेत. २०१५-१६ या वर्षात जिल्ह्यातील २०० गावांमध्ये ६ हजार ६६० कामे

### दृष्टिक्षेपात पुणे

■ लोहगाव विमानतळ विस्तारीकरण ■ भीमाशंकर तीर्थक्षेत्र विकासासाठी १२२ कोटी ■ तीर्थक्षेत्र नीरा नरसिंहपूर देवस्थानच्या विकासासाठी २६० कोटी ८६ लाख रुपयांचा विकास आराखडा मंजूर ■ पुणे मेट्रोचे भूमिपूजन ■ प्रभावी दळण-वळण व्यवस्था ■ अष्टविनायकातील मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री या पाच गणपती देवस्थानाच्या विकासासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून ११०.४८ कोटी रुपयांचा निधी ■ जलसंपदा विभाग आणि यशदाच्या माध्यमातून पुण्यात राज्यस्तरीय जलजागृती केंद्राची निर्मिती ■ पुण्यात आयटीच्या नवउद्योजकांसाठी इनक्युबेशन सेंटरची स्थापना

करण्यात आली. या कामाच्या माध्यमातून तब्बल २८ हजार ४३२ टीसीएम पाणी उपलब्ध झाले असून ५६ हजार ८६६ हेक्टर क्षेत्राला संरक्षित सिंचनाची व्यवस्था झाली आहे. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात २०१६-१७ मध्ये जिल्ह्यातील १९० गावांमध्ये ७ हजार ४९६ कामे प्रस्तावित करण्यात आली होती, त्यापैकी ५ हजार ९७० कामे पूर्ण झाली आहेत. या गावात सध्या ८ हजार ८३० टीसीएम पाणीसाठा उपलब्ध झाला असून १७ हजार ६०० हेक्टर क्षेत्राला संरक्षित सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

### छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ

जिल्ह्याच्या विकासाची उड्डाणे वाढविण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात नव्याने छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाला मंजुरी दिली आहे. जमीन संपादनानंतर अवघ्या तीन वर्षात विमानतळाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. विमानतळासाठी २४०० हेक्टर क्षेत्राची आवश्यकता आहे. चार किलोमीटरपर्यंतच्या दोन मोठ्या धावपट्ट्या या ठिकाणी विकसित करण्यात येणार आहेत. या विमानतळात स्थानिक शेतकरीच भागीदार असणार आहेत. तसेच प्रकल्पबाधितांना चांगला परतावा मिळणार आहे. पश्चिम महाराष्ट्रासह लगतच्या मराठवाड्यातील काही जिल्ह्यांनाही या विमानतळाचा उपयोग होणार आहे.

**सौरभ राव,** (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी, पुणे

**शब्दांकन: संग्राम इंगळे**
विभागीय माहिती कार्यालय, पुणे

# पाऊल पडते पुढे...



**दिलीप कांबळे**
सामाजिक न्याय राज्यमंत्री




**कोरडवाहू जिल्हा अशी ओळख असलेल्या सोलापूर जिल्ह्यात गेल्या १०-१५ वर्षामध्ये पावसाच्या अनियमिततेने शेतीचे आर्थिक गणित कोलमडले होते. पावसाचा प्रत्येक थेंब अडवण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली. लोकसहभागासह विविध यंत्रणामार्फत झालेल्या सांघिक प्रयत्नांमुळे जलयुक्त शिवार अभियानाचे सर्वात उत्कृष्ट काम जिल्ह्यात झाले. महात्मा जोतिबा फुले जलमित्र पुरस्कार सोलापूर जिल्ह्याला व मळेगावला मिळाल्याने जलयुक्तचा सोलापूर पॅटर्न राज्यभरात चर्चेत आला आहे.**

जलयुक्त शिवार अभियानासाठी जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती, पावसाचे प्रमाण, पीक पद्धती विचारात घेतली. माथा ते पायथा तत्त्वाप्रमाणे अभियानाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित करण्यात येऊन सर्वसमावेशक आराखडे तयार झाले. सर्व कामांच्या माध्यमातून १,९१,६७२ टी.सी.एम. पाणी साठवण क्षमता निर्माण झाली. प्रत्यक्षात ७१,५९५ हे. क्षेत्रावर सिंचन सुविधा उपलब्ध झाली आहे. भूजल पातळीत १.३२ मीटरने वाढ झाली. मागील वर्षांच्या तुलनेत टॅकरची आवश्यकता भासली नाही.

## रस्ते विकासातून समृद्धी

सोलापूर हे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याला जोडणारे शहर तसेच दक्षिण भारतात जाण्यासाठी प्रवेशद्वार आहे. मुंबई, दिल्लीहून दक्षिण भारतात जाणाऱ्या सर्व रेल्वे सोलापूरातूनच जातात. या गाड्यांची गती वाढावी यासाठी पुणे ते सोलापूर दरम्यान दुहेरी ट्रॅकचे काम सुरू आहे. याचबरोबर सोलापूर-हैदराबाद, सोलापूर-पुणे, सोलापूर-




विजापूर, सोलापूर-धुळे, सोलापूर-सांगली या राष्ट्रीय महामार्गाचा विकास अंतिम टप्प्यात आला आहे.

श्रीविठ्ठलाचे स्थान असलेल्या पंढरपुरात प्रमुख रस्त्यांचा विकास केला जाणार आहे. यामुळे पंढरपुरातील यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयी मिळण्यात मदत होईल. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीमार्ग असणाऱ्या पुणे-फलटण-पंढरपूर राष्ट्रीय मार्गाच्या चौपदरीकरणास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे.



**“ देशभरातील पहिल्या टप्प्यात स्मार्ट सिटी योजनेत सोलापूरचा समावेश करण्यात आला आहे. स्मार्ट सिटीतील विकास कामांच्या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सोलापूर सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनी स्थापन करण्यात आली आहे. प्रकल्पाच्या नियोजनासाठी सल्लागार कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. प्रकल्पाचे आराखडे तयार करण्यात आले असून, प्रत्यक्ष कामांना सुरुवात अपेक्षित आहे.**

**– विजयकुमार देशमुख, पालकमंत्री, सोलापूर ”**

रस्ते विकासाच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास गतिमान होत आहे.




## दळणवळण सेवांचे बळकटीकरण

सोलापूरच्या उद्योगधंद्यांना चालना मिळायची असेल तर दळणवळणाच्या सुविधांचे बळकटीकरण होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सोलापूर विमानतळाचा विकास कालबद्ध पद्धतीने करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विमानतळाच्या विकासासाठी अतिरिक्त जमीन संपादित करून देण्यात येत आहे. पुना नाका येथे नव्याने बस पोर्ट स्थापन केले जाणार आहे. यासाठीच्या विविध प्रशासकीय बाबी अंतिम टप्प्यात आहेत. सध्याच्या एसटी बसस्थानकाच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील लोकांना जिल्ह्याच्या ठिकाणी येण्यास सोयीस्कर व्हावे यासाठी सोलापूर ते तालुका ठिकाणी एसटीची शटलसेवा सुरू करण्यात येत आहे.

## सर्वांसाठी आरोग्य

ग्रामीण आणि गरीब जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यासाठी महिलांसाठी स्वतंत्र अशा १०० खाटांच्या रुग्णालयास परवानगी देण्यात आली आहे. वैद्यकीय सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी सिव्हील इस्पितळाचे मजबुतीकरण केले जात असून पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयासाठी आधुनिक यंत्रसामग्री मंजूर करण्यात आली आहे.

## उच्च शिक्षणाचा विस्तार

सोलापुरातील अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे पदवी महाविद्यालयात रूपांतर करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे सोलापूरच्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

बार्शी येथे नवीन आयुर्वेदिक महाविद्यालयास मंजुरी मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील युवकांना वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळणार आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ केटरिंग ॲण्ड टुरिझमचे उद्घाटन झाल्यामुळे सोलापूरच्या तरुणांना करिअरच्या वेगळ्या वाटा खुल्या झाल्या आहेत. सोलापूर विद्यापीठास राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत भरघोस निधी मंजूर झाल्यामुळे उच्च शिक्षणाच्या विकासाला भरीव मदत मिळणार आहे.

## स्वच्छता अभियानाचे नेत्रदीपक यश

सोलापूर जिल्ह्याला स्वच्छ भारत अभियानात नेत्रदीपक यश मिळाले आहे. जिल्ह्यातील सात नगरपालिका हागणदारीमुक्त झाल्या असून, नागरी क्षेत्रात अभियान राबवण्यात सोलापूर जिल्हा राज्यात अग्रस्थानी आहे. जिल्ह्यातील तीनशेहून आधिक ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या असून जिल्ह्यातील प्रत्येक गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी जिल्हा परिषद प्रयत्नशील आहे.

## तीर्थक्षेत्र विकास आराखडा



साऱ्या देशभरातील वारकरी आणि भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या पंढरपूर येथील विठ्ठल - रूक्मिणी मंदिराचा विकास होण्यासाठी मंदिर समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून वारकरी आणि भाविकांना जास्तीत जास्त सोयी-सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाईल. पंढरपूर येथील यात्रा निर्मल व्हाव्यात यासाठी राज्य शासनाकडून भरघोस निधी मंजूर करण्यात आला आहे. याचबरोबर अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदीर, सोलापूर येथील सिद्धेश्वर मंदिरांचा विकास करण्याचा प्रयत्न आहे. पालखी तळांचा आणि पालखी मार्गाचा विकास केला जात आहे. चंद्रभागा शुद्धीकरणासाठी ४२५ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

## उद्योग विकास

सोलापूर आणि यंत्रमाग उद्योग यांचे नाते अतूट आहे. यंत्रमाग विकासाला चालना देण्यासाठी सोलापूर शहर मेगाक्लस्टर म्हणून विकसित केले जाणार आहे. त्यापैकी पाच क्लस्टरना मंजुरी देण्यात आली आहे. नरसिंग गिरजी गिरणीच्या जमिनीवर गारमेंट पार्क विकसित केला जाणार आहे. मौजे कुंभारी येथे नवीन औद्योगिक वसाहत विकसित केली जाणार आहे. सोलापुरात आता लघु सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. सोलापुरातील या कार्यालयामुळे पुणे विभागातील पाच जिल्ह्यांबरोबरच नगर जिल्ह्यातील नागरिकांना पासपोर्ट काढणे सोयीचे झाले आहे. यामुळे सोलापुरातील तरुणांना विदेशातील करिअरचे आकाश खुले झाले आहे.



**सुभाष देशमुख**
सहकार मंत्री

## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

शासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्याचा जिल्ह्यातील विविध विभागांनी प्रयत्न केला आहे. यामध्ये प्रामुख्याने महसूल प्रशासनाचा आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा समावेश आहे. महसूल प्रशासनाकडून संगणकाद्वारे सातबारा उतारे देण्यात येणार आहेत. सोलापुरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयात दहा मिनिटांत वाहन परवाना मिळेल अशी यंत्रणा विकसित करण्यात आली आहे.

- **डॉ. राजेंद्र भोसले** (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, सोलापूर

# पर्व प्रगतीचे...

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम लवकरच सुरू होत आहे. याचबरोबर रेल्वेच्या सावंतवाडी टर्मिनसच्या दुसऱ्या टप्प्याचे कामही प्रगतिपथावर आहे. जिल्ह्यात हवाई वाहतुकीचे नवे पर्व सुरू होणार आहे. सिंधुदुर्ग विमानतळाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील वर्षापर्यंत या विमानतळावरून विमान आकाशात झेपावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.**

जलयुक्त शिवार योजनेखाली सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गेल्या तीन वर्षात ५२ गावे पाण्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण झाली आहेत. २०१५-१६ मध्ये जिल्ह्यात ३५ गावांची निवड करण्यात आली होती. या अंतर्गत ४९४ कामे करण्यात आली. यंदाच्या वर्षी २३९ कामे होती घेण्यात आली होती. यापैकी १९४ कामे पूर्ण झाली असून ४५ कामे प्रगतिपथावर आहे. या जलयुक्त शिवारच्या कामामुळे ८३.८७३ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत होणार आहे. जलयुक्त शिवार अंतर्गत गेल्या तीन वर्षात ६१ शेततळी, १२० मातीनाला बांध, १०४ साखळी सिमेंट बंधारे, ४० लुज बोल्डर स्ट्रक्चर कामामधून ५०.६४ हेक्टर जमिनीवर २४ सलग संतरचर, नऊ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती, दोन कोल्हापूर बंधाऱ्याची बांधणी आदी कामे करण्यात आली आहे.

## बंदर विकास

मत्स्य व्यवसायांसाठी तसेच पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणाच्या दृष्टीने छोट्या बंदराचा विकास, धूप प्रतिबंधकात्मक बंधारे, बंदरालगतच्या सुखसोयी आदी कामे पतन विभागामार्फत सिंधुदुर्ग जिल्ह्यात करण्यात येत आहे.

गेल्या तीन वर्षात या अंतर्गत बंदरालगतच्या नौकानयक मार्गातील खडक फोडणे, यांची १३ कामे पूर्ण करण्यात आली. बंदराचा विकास व प्रवासी सुखसोयी याअंतर्गत जिल्ह्यातील १७ बंदरे आणि २७ लहान मासेमारी बंदरांच्या विकासासाठी विकास करण्यात येत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील आनंदवाडी मत्स्य बंदर विकसित करण्यात येणार आहे. सागरी किनाऱ्याचे सर्वेक्षण व्हावे म्हणून धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची कामे केली जातात. याअंतर्गत सहा कामे जिल्ह्यात सुरू आहे. याअंतर्गत आणखी १३ कामे होणार असून यंदाच्या वर्षी म्हणजेच २०१७-१८ मध्ये नवीन आठ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.




## फळझाड लागवड

सिंधुदुर्ग जिल्ह्यात फळझाड लागवडीस भरपूर वाव असल्याचे ते लक्षात घेऊन जिल्ह्यात फळझाड लागवडीचा कृषी, जिल्हा परिषद या विभागाच्या सहकार्याने महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येत आहे. २०१७ -१८ मध्ये १० हजार हेक्टर क्षेत्रावर फळझाड लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. येत्या महिन्याभरात काजू, आंबा, कोकम अशा फळपिकांची जिल्ह्यातील ८५०० हेक्टर क्षेत्रावर फळझाड लागवड होणार आहेत.

## वनीकरणात आघाडी

यंदा वृक्षलागवड मोहिमेत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी १ लक्ष ६० हजार वृक्षलागवडीचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात एकूण ६ लक्ष ४ हजार रोपांची लागवड करण्यात आली. जिल्ह्यातील ३ टक्के क्षेत्र वनाच्छादित होण्यास यामुळे मदत झाली आहे.

## वनराई / कच्चे बंधारे

जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात १६ हजार ३७५ वनराई / कच्चे बंधारे बांधण्यात आले. जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये बंधारा दुरुस्ती गाळ काढणे व तलाव दुरुस्ती यांची २९ कामे पुर्ण करण्यात आली. यामुळे ११४२.१५ हेक्टर सिंचन क्षमता पुन:स्थापित होण्यास मदत झाली. यामुळे २८५.५० स.घ.मी साठवण क्षमता निर्माण होण्यास मदत झाली आहे. कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-यांची २९ कामे पूर्ण करण्यात आली. यामधून ३०८.२९ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तर ४३ पाटबंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली. यामधून ४१०.२३ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली व ४८४६.३६ स.घ.मी. साठवण क्षमता निर्माण होण्यास मदत झाली आहे.

## पर्यटन विकास

नव्याने विकसित झालेल्या अंडरवाटर टुरिझम आणि तारकर्ली सारख्या छोट्या गावाने पर्यटनातून साधलेला आर्थिक विकास हा मार्गदर्शक आहे. सिंधुदुर्गात पर्यटनातून स्वंयरोजगाराला चालना मिळावी यासाठी निवास निहारी ही योजना अत्यंत लाभदायक ठरल्याचे चित्र दिसत आहे. निवास निहारीचे २२२ प्रकल्प जिल्ह्यात कार्यान्वित आहे तर २० प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केले आहेत.



**“ पारंपरिक भातशेतीला फाटा देऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून, जिल्ह्यातील शेतीचे अधिकाधिक यांत्रिकीकरणावर भर देण्यात आला आहे. भातशेतीबरोबरच इतर शेतीही आर्थिकदृष्ट्या किफायतशीर करण्याकडे लक्ष देण्यात येत आहे. याच अनुषंगाने नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपूर वापर व्हावा व आर्थिक जीवनमान सक्षम व्हावे, यासाठी शासनाने कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन व पर्यटन या त्रिसूत्रीवर आधारित सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न जोपासले आहे.**

**- दीपक केसरकर, पालकमंत्री, सिंधुदुर्ग ”**

पर्यटन विकासासाठी स्वदेश दर्शन आणि चांदा ते बांदा या २ योजना राबवण्यात येत आहेत. चांदा ते बांदा योजनेंतर्गत कर्ली नदीमध्ये बॅक वॉटर पर्यटन विकसित करण्यासाठी हॉप ऑन हॉप ऑफ बोटींग सुविधा,



इंडोनेशिया कॉटेज हायमास्टर दिवे, स्ट्रीट लाईट, भोगवे व निवती सागर किना-यावर स्वच्छतागृहे, सावंतवाडी येथील हस्तकला ग्राम व बाजार विकसित करणे, तिलारी येथे विश्रामगृह नुतनीकरण, यशवंतगडाचे संवर्धन, आरोंदा येथे कांदळवन उद्यान, आंबोली येथे फुलपाखरू उद्यान साहसी खेळ व जंगल सफारी नवाबाग येथे मच्छीमारी गाव आदी कामे होणार आहेत.

## काथ्या प्रकल्प

महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळामार्फत कुडाळ औद्योगिक वसाहतीत महाराष्ट्र काथ्या उत्पादन प्रदर्शन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली आहे. येथे उभारण्यात आलेल्या महाकॉअर केंद्रात नारळाच्या सोडणापासून काथ्या दोरी पायपुसणी, बागेतील शोभिवंत वस्तू, शिल्लक राहिलेल्या मालापासून ब्लॉक बनविणे आदि प्रशिक्षण दिले जाते.

सिंधुदुर्गातील ३६० महिलांना काथ्या दोरी वळण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. २७ महिलांना आलेपी केरळ येथील महाकॉअर बोर्डाच्या प्रशिक्षण केंद्रात विशेष प्रशिक्षण दिले आहे. यंदाच्या वर्षात ५०० महिलांना प्रशिक्षण देण्याची योजना आहे. सिंधुदुर्गातील विकेंद्रित बारा सामूहिक सुविधा केंद्रांच्या माध्यमातून १२०० महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

## नियोजन निधी : राज्यात अव्वल

जिल्हा नियोजन समिती मार्फत जिल्ह्यात विविध विकास कामांवर तीन वर्षात शंभर टक्के निधी खर्च करून सिंधुदुर्ग जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान पटकाविला आहे.

## विमानतळ



चिपी विमानतळाची धावपट्टी

सार्वजनिक-खासगी सहभाग या अंतर्गत चिपी येथे सिंधुदुर्ग विमातळाचे काम सुरू आहे. या विमानतळ प्रकल्पासाठी २७६ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात आले. सिंधुदुर्ग विमानतळाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या विमानतळावर विमानात इंधन भरण्याची सुविधा असणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या धर्तीवर याची धावपट्टी, रात्रीचे विमान उड्डाण व उतरण्याची सुविधा, अद्यायावत पॅसेंजर टर्मिनलची बिल्डींग, तसेच भविष्यातील लागणाऱ्या सर्व सुविधांचा विचार करून या विमातळाच्या बांधकामाची विविध कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

'फोर सी' या प्रकारातील हा विमानतळ आहे. सध्या देशातंर्गत वाहतुकीसाठी याचा वापर होणार आहे. भविष्यात विमानांची ये-जा वाढल्यास या विमानतळास आंतरराष्ट्रीय दर्जा मिळू शकतो. सिंधुदुर्ग विमानतळाची सध्याची धावपट्टी ६० मीटर रूंद व २ हजार ५०० मीटर लांबीची आहे. दुसऱ्या टप्प्यात ३ हजार ५०० मीटर लांबी होणार असून या दृष्टीकोनातून तशी तजवीज करून ठेवण्यात आली आहे. सुमारे ६ ते १८० प्रवासीक्षमतेच्या विमानांची ये-जा या विमानतळावरून होऊ शकते. या विमानतळावर तीन ते पाच विमानांची पार्किंगची सुविधा आहे. भविष्यात १५ विमान या ठिकाणी पार्क होऊ शकतात. पॅसेंजर टर्मिनस बिल्डिंगचे काम वेगाने सुरू असून सुमारे दहा हजार चौरस-मीटर एवढे बांधकाम होणार आहे.

विमानतळाशी संलग्न असणाऱ्या सागरी महामार्गावरील कुंभारमाठ-परूळे-सातार्डा या रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून याचे काम लवकरच सुरू होणार आहे. यासाठी २५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यामुळे गोव्याशी गतीने दळणवळणाची सुविधा निर्माण होणार आहे. कुडाळ शहरासाठी गतीने वाहतूक व्हावी यासाठी कुडाळ-पाट रस्त्याच्या रुंदीकरण व दुरुस्तीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

**- मिलिंद बांदिवडेकर**
जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

# पुरोगामी आणि उपक्रमशील



**कोल्हापूर हा निसर्गाने नटलेला, सहकाराने विणलेला आणि पुरोगामी विचारांनी सजलेला जिल्हा आहे. उपक्रमशील आणि विकासाच्या मार्गावर अग्रेसर असणाऱ्या राज्यात आणि देशात ख्याती असणारा जिल्हा आहे. गेल्या तीन वर्षांपासून नियोजनबद्धरीतीने होत असलेल्या विकासामुळे जिल्ह्याची उद्योग, क्रीडा, कृषी या सर्वच क्षेत्रात घोडदौड सुरू आहे.**

गेल्या तीन वर्षात कोल्हापूर जिल्ह्यातील टोलमुक्ती, कृषी कर्जमाफी, रस्ते, पूल, पर्यटन विकास, तीर्थक्षेत्र विकास आराखडा, सहकार आदी प्रश्न सोडवण्यात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रभावी भूमिका बजावली आहे. जलयुक्त शिवार, महाराजस्व अभियान, ४ कोटी वृक्षलागवड, डिजिटल सातबारा आदी अभियानांना मोठ्या प्रमाणात चालना दिली. त्यामुळे संपन्न

जिल्हा आणि हरित जिल्हा म्हणून कोल्हापूर जिल्ह्याची वाटचाल गतीमानतेने होत आहे. गेल्या तीन वर्षात जिल्हा वार्षिक योजना आराखड्यांतर्गत सर्वसाधारण योजनेसाठी ६६८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी सुमारे २६८ कोटी आदिवासी उपयोजना व आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य योजनेसाठी (ओटीएसपी) ५ कोटी रुपये खर्च करून विकासाचा मार्ग बळकट करण्यात आला आहे.



### कन्यागत महापर्वकाळ

दर बारा वर्षांनी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे येणाऱ्या कन्यागत महापर्वकाळ सोहळ्यासाठी शासनाने १२१ कोटींचा निधी मंजूर केला. पहिल्या टप्प्यात सुमारे ४३ कोटी निधी प्राप्त झाला आहे. यातून भाविकांसाठी आवश्यक त्या पायाभुत सुविधा निर्माण झाल्या आहेत. यातून जिल्ह्याच्या पर्यटन विकासालाही चालना मिळणार आहे.



**तरुणांना उद्योगप्रवण करणाऱ्या मुद्रा योजनेंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत ३३,६९८ लाभार्थ्यांना ५०४ कोटी ६७ लाखांचे अर्थसाहाय्य विविध बँकांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे. या योजनेमुळे मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.**

**– चंद्रकांत पाटील, पालकमंत्री, कोल्हापूर**




### सहकाराला गती

पालकमंत्री श्री. पाटील यांच्या प्रयत्नातून सहकारी संस्थांच्या गुणात्मक वाढीसाठी संख्यात्मक वाढीचे सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये बंद, कार्यस्थगित व ठावठिकाणा नसलेल्या ३३७२ सहकारी संस्था आढळून आल्या. त्यापैकी २८५० संस्था अवसायानात निघाल्या. सहकारात शून्य प्रलंबितता आणि दैनंदिन निर्गतीकरण अभियान राबवल्याने सुमारे हजारो संदर्भ निकाली निघाले. बराच काळ प्रलंबित असणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणुका घेऊन लोकशाही प्रक्रिया गतिमान केली.

### जलयुक्त शिवार

या अभियानांतर्गत गत दोन वर्षात ५२ कोटी रुपये खर्च करून १६८८ कामे करण्यात येत आहेत. आतापर्यंत यातून सुमारे ९ हजार टीसीएम पेक्षा जास्त पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे.

### रस्ते विकास

कोल्हापूर-कोकणशी कमी अंतराने जोडणाऱ्या सोनवडे शिवडाव घाट रस्त्याचा प्रश्न श्री. पाटील यांच्या पुढाकाराने मार्गी लागला. १७९ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. यापैकी घाटमार्गासाठी ७२ कोटी तर सुधारणा व रुंदीकरणासाठी १०७ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. या मार्गामुळे भुदरगडच्या विकासात भर पडणार आहे. पंचगंगा नदीवरील शिवाजी पुलाला पर्याय ठरणाऱ्या पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी केंद्रशासनाने कायद्यात बदल केला. हा पूल पुरातत्त्व खात्याच्या नियमामुळे बराच काळ अपूर्ण राहिला होता. श्री. पाटील यांनी पोलीस मुख्यालयाच्या वसाहतींचे नूतनीकरणाचे वचन दिले होते. त्यानुसार त्यांनी ६०० घरांचे नूतनीकरण करून मे महिन्याच्या पूर्वीच वचनपूर्ती केली. यावर्षी अर्थ संकल्पात कोल्हापूर जिल्ह्यातील रस्ते विकासासाठी ३५५ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

### महाराजस्व अभियान

सुवर्ण जयंती महाराजस्व अभियानांतर्गत जनतेला लागणारे विविध प्रकारचे दाखले गावातच उपलब्ध करून देण्यासाठी विस्तारीत समाधान योजनेची मोठ्या प्रमाणात शिबिरे घेण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत ऑगस्ट २०१५ पासून जून २०१७ अखेर १६१९ शिबिरे घेतली आहेत. त्यातून ३,६९,०५२ दाखल्याचे वाटप केले आहे. जून २०१७ अखेर जिल्ह्यातील ३५६ अतिक्रमित रस्त्यांपैकी २१७ रस्ते अतिक्रमण मुक्त केले आहेत.

## कृषी विकास

माती परीक्षण हे मातीची आरोग्यपत्रिका आहे. शेतकऱ्यांनी मृद चाचणी व मृद परीक्षण करून घेऊन उत्पादनात वाढ करावी यासाठी २०१५-१६ पासून आतापर्यंत ६,३८,२८४ खातेदारांमध्ये ६,०६,३७० मृदा आरोग्य पत्रिकांचे वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यात हे काम ९६ टक्के झाले आहे. ३,३२५ हेक्टर क्षेत्रावर ठिबक सिंचन प्रणाली बसविण्यात आली. कोल्हापूर जिल्हा पीक कर्ज वाटपात राज्यात दुसरा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी सुखावला आहे.

## पर्यटन विकास



छत्रपती शाहू महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या कसबा बावडा येथील लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये ऐतिहासिक संग्रहालय उभारणीकरिता शासनाने १५ कोटी ६० लाख रुपयांच्या आराखड्यास मंजुरी दिली आहे. जिल्ह्यात तीर्थक्षेत्र विकास आणि पर्यटनाला शासनाने गती दिली असून १२५ कोटी रुपयांचा श्रीमहालक्ष्मी तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार केला आहे. त्यापैकी ७२ कोटी रुपये पहिल्या टप्प्यासाठी देण्यात येणार आहेत. जोतिबा परिसर विकास आराखड्याच्या पहिल टप्प्यासाठी २५ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ऐतिहासिक माणगाव परिषद स्मारकासाठी ५ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला असून शासनस्तरावर त्यासाठी पाठपुरावा चालू आहे. माणगाव परिसर विकास आराखड्यापैकी पहिल्या टप्यातील २ कोटी, पंचगंगा घाट विकास आराखड्यास ४ कोटी ७८ लाख, पन्हाळा लाईट व साऊंड शोसाठी ४ कोटी ५० लाख निधी शासनाने मंजूर केला आहे. पंचगंगा घाट विकासाचा २६ कोटी ८५ लाखाचा बृहत आराखडा तयार केला असून पहिल्या टप्प्यात ४ कोटी ७८ लाख रुपये शासनाने मंजूर केले आहेत. तसेच बड्याचीवाडी येथील काळभैरव मंदिर परिसराचा विकास ७ लाख, पट्टणकोडोली येथील भक्तीनिवासासाठी ८ लाख, कलानंदीगड परिसर विकासासाठी २० लाख, तळेमाऊली मंदिर विकासासाठी ४० लाख, किल्ले सामानगड विकासासाठी १० लाखाच्या आराखड्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

जिल्ह्यात सुमारे १८ लाख वृक्ष लागवड करून, जिल्हा हरित करण्याचा प्रयत्न होत आहे. जिल्ह्यात महाराष्ट्रातील पहिले पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. जिल्हा हागणदारीमुक्तीतही देशात अग्रेसर आहे. या साऱ्यांमुळे जिल्हा सर्वांगीण विकासाकडे अग्रेसर झाला आहे.

**– वर्षा पाटोळे**
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

# लोकाभिमुख आणि गतिमान

**सामान्य नागरिकांचे हित आणि समाजातील प्रत्येक घटकाचा विकास, हे ध्येय समोर ठेवून सांगली जिल्ह्याची वाटचाल सुरू आहे. गेल्या तीन वर्षांत झालेल्या विविध विकास कामांवरून याची प्रचिती येते. लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासनातून जिल्ह्याची वाटचाल चौफेर प्रगतीकडे सुरू आहे.**

सांगली जिल्ह्यातील नागरी पाणी पुरवठा योजना आणि ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांना बळ मिळाले आहे. केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मिरज शहर सुधार पाणी पुरवठा योजनेस केंद्राकडून ५२ कोटी ३३ लाख रुपये तर राज्य शासनाकडून २६ कोटी १७ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत शहरात ठिकठिकाणी ६ नवीन जलकुंभ आणि नव्याने पाणी वितरण व्यवस्था करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत दुष्काळी आटपाडी तालुक्यातील ५३ गावांना कृष्णा नदीवरून पाणीपुरवठा करण्याची योजना अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचे जवळपास ७५ टक्के काम पूर्ण झाले असून जून २०१७ अखेर ७९ कोटी ४२ लाख रुपये खर्च झाला आहे. तासगाव तालुक्यातील मणेराजुरी (स्वतंत्र) नळपाणी पुरवठा योजनेतून मणेराजुरी गाव व त्याअंतर्गत ३२ वाड्यावस्त्यांना लाभ होणार आहे. या योजनेसाठी जून २०१७ अखेर १० कोटी ७६ लाख रुपये खर्च झाला आहे. ही दोन्ही कामे डिसेंबर अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेंतर्गत कासेगाव व वाळवा तालुक्यातील इतर गावांना पाणीपुरवठ्यासाठी वाघवाडी नळपाणी पुरवठा योजनेत सुधारणा करण्यात येत आहे. या कामास नुकतीच मान्यता मिळाली आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत



**“स्वच्छ भारत अभियानामध्ये सांगली जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. नागरी भागात विटा, आष्टा, इस्लामपूर आणि तासगाव या नगरपरिषदांनी आणि कडेगाव नगरपंचायतीने हागणदारीमुक्त होत राज्यात नाव मिळवले. सांगली जिल्हा परिषद प्रशासनाच्या अविरत प्रयत्नांमधून सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागही हागणदारीमुक्त झाला आहे.”**

**– सुभाष देशमुख, पालकमंत्री, सांगली**




आरग नळपाणी पुरवठा योजनेस एप्रिल २०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या योजनांमुळे दुष्काळी भागातील जनतेला दिलासा मिळणार आहे.

### मिरज-लातूर जलदूत रेल्वे

प्रशासनाच्या अहोरात्र प्रयत्नांमुळे मिरजहून लातूरला जलदूतची पहिली ट्रेन ११ एप्रिल २०१६ रोजी रवाना झाली. २८ जुलैला जलदूत रेल्वेची शंभरावी फेरी लातूरकडे रवाना झाली. लातूरला पावसामुळे पुरेसे पाणी उपलब्ध झाल्याने ८ ऑगस्ट २०१६ रोजी जलदूतचा प्रवास थांबला. ११ एप्रिल २०१६ ते ८ ऑगस्टअखेर लातूरला जलदूत ट्रेनद्वारे २५ कोटी, ९५ लाख लिटर्स पाणी पाठवण्यात आले.



**सदाभाऊ खोत**
कृषी व फलोत्पादन राज्यमंत्री

### अग्रणीचे पुनरुज्जीवन

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यात अग्रणी नदीच्या पुनरुज्जीवनाचा उपक्रम यशस्वी करण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यातील सुमारे ५५ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले.

### विटा तहसील कार्यालयाची आघाडी



डिजिटल इंडिया अंतर्गत अभिलेख कक्ष संगणकीकरणात विटा तहसील कार्यालयाने राज्यात आघाडी घेतली. यामध्ये १५० वर्षांच्या कालावधीतील २ कोटी कागदांचे स्कॅनिंग पूर्ण करण्यात आले आहे.

### शासकीय इमारती

जिल्ह्यात सामान्य नागरिकांच्या सोयीसाठी प्रशस्त शासकीय इमारती सज्ज आहेत. यामध्ये नुकतेच उद्घाटन झालेले प्रशस्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि उद्घाटन होऊ घातलेले जिल्हा न्यायालय यांचा उल्लेख करावा लागेल. जिल्ह्यातील खेळाडूंना विविध क्रीडाविषयक सोयी सुविधा एकाच छताखाली मिळाव्यात, यासाठी अद्ययावत जिल्हा क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. कवठेमहांकाळ आणि आटपाडी येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीदेखील नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत आहेत. पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रूग्णालय, सांगली येथे बाह्यरूग्ण विभागाच्या इमारतीचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

### पोलीस दलाचा विधायक उपक्रम

सांगली जिल्हा पोलीस दलाने डॉल्बीमुक्तीतून जलयुक्तकडे हा अभिनव उपक्रम राबवला. यामध्ये १३६९ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सहभाग नोंदवला. यातून जमा झालेल्या जवळपास २८ लाख रुपये इतक्या रकमेतून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुखकर्ता (मल्लेवाडी, ता. मिरज) आणि विघ्नहर्ता (मणेराजुरी ता. तासगाव) हे दोन बंधारे बांधण्यात आले.

### खानापूर पंचायत समिती राज्यात अव्वल

यशवंत पंचायत राज अभियानात सांगली जिल्ह्यातील खानापूर पंचायत समितीने बाजी मारली. यामध्ये अग्रणी नदी पुनरूज्जीवन, सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०१५-१६ साठी पात्र, एकात्मिक बालविकास सेवा योजना (आयसीडीएस) अंतर्गत ३४ अंगणवाड्यांचे आयएसओ मानांकन, सेंट्रलाईज्ड रिपोर्टिंग टूल, अपंग मित्र अभियान, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींकडून आदर्श गाव माहिती नमुना निहाय संकलन, पंचायत समितीकडील अभिलेखांचे स्कॅनिंग असे कार्यालयीन उपक्रम यशस्वी केले.

तालुका १०० टक्के हागणदारीमुक्त करणे, पंचायत समितीला आय. एस. ओ. ९००१ : २०१५ करणे, ग्रामपंचायतीचे ई-संगणकीकरण, बायोमेट्रीक प्रणालीचा वापर, तसेच, अ वर्ग अभिलेखाचे एक लाख प्रतींचे पहिल्या टप्प्यात स्कॅनिंग यासाठी प्रशासनाने सामूहिक प्रयत्न केले. त्याची फलश्रुती म्हणजे २०१५-१६ ची राज्यातील प्रथम क्रमांकाची उत्कृष्ट पंचायत समिती म्हणून या समितीचा गौरव करण्यात आला. स्वर्गीय मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची जन्मभूमी कडेगाव तालुक्यातील देवराष्ट्रे होय. त्यांचे प्राथमिक शिक्षणही विटा येथे झाले. त्यामुळे खानापूर पंचायत समितीने या अभियानात मिळवलेले यशाचे सार्थक झाले.

### बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत सांगली जिल्ह्यातील ७३ बालकांच्या गंभीर हृदय शस्त्रक्रियांच्या गंभीर प्रश्नाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. ऑक्टोबर २०१५ मध्ये सांगली जिल्हा दौऱ्यावर असताना त्यांनी मदतीची ग्वाही दिली होती. मुख्यमंत्र्यांनी योग्य ते निर्देश दिल्यामुळे अवघ्या दोनच महिन्यात नवी मुंबई येथील डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नेरूळ येथे डिसेंबर २०१५ मध्ये ७३ बालकांच्या ओपन हार्ट सर्जरी मोफत करण्यात आल्या.

**- संप्रदा बीडकर**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, सांगली



**ठाणे जिल्ह्यात गेल्या ३ वर्षात चौफेर विकास झाला आहे. मानव विकास कार्यक्रमाच्या विशेष निधीतून जनतेचे जीवनमान उंचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्याच्या उत्पादकतेत भर पडावी यासाठी 'ठाणे कुशल' या नावाखाली अभिनव अशा 'कौशल्य विकास केंद्रा'ची स्थापना करण्यात आली आहे. देशातल्या पहिल्या १० स्वच्छ जिल्ह्यात ठाणे आठव्या क्रमांकावर असून जिल्ह्यातील ग्रामीण भागात ९० टक्के वैयक्तिक शौचालये उपलब्ध झाली आहेत. सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ग्रामविकास आणि महसूल विभागाने १०० टक्के अर्ज गेल्या वर्षभरात निकाली काढले आहेत. जलयुक्त शिवार योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य झाले आहे.**

# कुशल मुद्रा

ठाणे जिल्ह्यात यंदा प्रथमच सीएसआरमधून (सामाजिक उत्तरदायित्व) खासगी कंपन्यांची मदत घेत विविध बंधाऱ्यामधून जवळजवळ पावणे दोन लाख घनमीटर गाळ काढण्यात आला. परिणामत: आत्ताच्या पावसात हे बंधारे पाण्याने तुडुंब भरल्याचे दृश्य आहे. साधारणत: एप्रिल शेवटच्या आठवड्यापासून जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ७८ कामे या कंपन्यांनी महसूल विभाग, जिल्हा परिषद, कृषी विभाग यांच्या मदतीने पूर्ण केली. विविध गाव तलाव, नदी खोलीकरण, नाला बांध अशी कामे प्रामुख्याने पार पाडण्यात आली. मुरबाडमधील कनकवीरा नदीचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण होत आले आहे. जिल्हा जलयुक्त शिवार समितीने अवघ्या दीड महिन्यात गाळ काढण्याची कामे पूर्ण होतील, याकडे लक्ष दिल्याने पाऊस झाल्यानंतर या परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना फायदा होत आहे.

## जलसाठा उपलब्ध

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुरू असलेल्या जलसंधारणाच्या कामांमध्ये यंदा प्राचीन नाणेघाटातील नाणे तलावाचाही जीर्णोद्धार झाला आहे. खोलीकरणाच्या कामांमुळे मे महिन्यात या कोरड्या तलावास पाझर फुटला आहे. त्यामुळे स्थानिक आदिवासी ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या तळ्यातील पाण्याचा परिसरातील शेती आणि भाजीपाला लागवडीसाठी उपयोग होईलच, शिवाय कल्याण-नगर रस्त्यालगत असल्याने माळशेज घाट परिसरात येणाऱ्या पर्यटकांनाही या रम्य तळ्याकाठी काही क्षण विसावा घेता येईल.

या परिसरात मोठ्या प्रमाणात कासवे आहेत. नाणे तलावातही पूर्वी कासवे होती. आता नवसंजीवनी मिळाल्यानंतर या तलावात कासव निरीक्षण केंद्र करता येऊ शकेल.

## अवघ्या तीन महिन्यात 'कनकवीरा' प्रवाही

वर्षांनुवर्षे पात्रात साचलेला गाळ आणि कचऱ्यामुळे पावसाळी नाल्याची अवकळा प्राप्त झालेली मुरबाड तालुक्यातील कनकवीरा नदी अवघ्या तीन महिन्यातील पुनर्निर्माणाच्या कामानंतर दुथडी भरून वाहू लागली आहे. वाघाची वाडी ते तळवलीदरम्यानच्या सहा किलोमीटर नदीपात्रातील तब्बल ३५ हजार क्यूबिकमीटर गाळ एप्रिल आणि मे महिन्यात काढण्यात आला.

ठाणे जिल्ह्यातील मूरबाड व शहापूर या दोन तालुक्यांचा मानव अतिमागास १२५ तालुक्यांमध्ये समावेश होतो. ही बाब विचारात घेता, या दोन तालुक्यांमध्ये मानव विकास कार्यक्रमाच्या विशेष निधीतून जनतेचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुरबाड, शहापूर, भिवंडी भागातील शिक्षित तरुणदेखील कामगारांची अर्ध कुशल किंवा



**"जिल्ह्यात नागरी भाग मोठ्या प्रमाणावर असला तरी, मुख्यालयापासून ६० ते ७० कि.मी. अंतरावर आदिवासी भागही आहे. तुलनेने आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि आदिवासींना मुख्य प्रवाहात आणणे हा नियोजनाचा मुख्य गाभा ठेवण्यात आला आहे. बेरोजगारी आणि प्रामुख्याने याला कारणीभूत असलेला युवकांमधील तंत्र कौशल्याचा अभाव यावर जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे.**

**– एकनाथ शिंदे, पालकमंत्री, ठाणे"**




श्रमाची कामे करतांना दिसतो. विशेषत: बांधकाम कंत्राटदार, मोबाइल कंपन्यांकडील श्रमिक कामे, जलवाहिन्या किंवा रस्त्याच्या कामांसाठी खड्डे खोदणे अशा कामांवर हे युवक जातात. या भागात पावसाळ्यातील भातशेतीचा अपवाद वगळता उर्वरित हंगामात इतर कुठलीही शेतीची कामे नसतात, अशा वेळी हा मोठ्या प्रमाणावर असलेला युवक वर्ग आणि त्यांची शक्ती निरुद्देश कामासाठी व्यर्थ ठरते आणि अकार्यक्षम कामासाठी वापरली गेल्याने जिल्ह्याच्या उत्पादनात काही भर पडत नाही हे लक्षात घेऊन या ठाणे कुशल या नावाखाली अभिनव अशा कौशल्य विकास केंद्राची निर्मिती करण्याचे ठरले. जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन सुरू केलेले हे एकमेव केंद्र आहे. या केंद्रात विविध बाबतीत कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने सॉफ्ट स्किलसमध्येही त्यांना पारंगत करण्यात येत आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त, आदिवासी व बेरोजगार युवकांना रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण देणे व रोजगार/ स्वयंरोजगारक्षम बनवणे यासाठी प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.



**रविंद्र चव्हाण**
वैद्यकीय शिक्षण,
माहिती व तंत्रज्ञान
राज्यमंत्री

## रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, फादर अ‍ॅग्नेल संस्थेतर्फे अभ्यासक्रम

ठाण्यातील गावदेवी मैदान आणि कल्याण येथील केंद्रांमध्ये अनुक्रमे फादर अ‍ॅग्नेल आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे आठवी ते बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासासाठी एकूण बारा प्रकारचे विविध अभ्यासक्रम शिकवण्यात येतात. जिल्हा कौशल्य विकास केंद्रामध्ये सध्या १८१ विद्यार्थी मोफत प्रशिक्षण घेत आहेत. कौशल्य विकास केंद्रात प्रशिक्षित होणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कामाची उणीव भासू नये याकरीता फादर अ‍ॅग्नेल संस्था वाशी यांचेकडून प्लेसमेंट ऑफिसर यांचीही नेमणूक करण्यात आलेली आहे.

## पायाभूत सुविधांमध्ये वाढ

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन जमिनीच्या थेट खरेदीस सुरुवात करण्यात आली आहे.

ठाणे येथील खाडीवर नवीन तिसऱ्या पुलाचे काम, ठाणे येथील टिकुजीनीवाडी ते बोरीवली दरम्यानसुमारे ११ किमी लांबीच्या बोगद्याचे काम,भिवंडी-कल्याण शिळ रस्त्याचा उन्नत मार्ग/सहापदरी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ठाणे शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी एसआरए योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## स्वच्छतेत आघाडी

देशातल्या पहिल्या १० स्वच्छ जिल्ह्यात ठाणे आठव्या क्रमांकावर असून जिल्ह्यातील ग्रामीण भागात ९० टक्के वैयक्तिक शौचालये उपलब्ध झाली आहे. १९० ग्रामपंचायती आणि २ तालुके हागणदारीमुक्त, तर अंबरनाथ, बदलापूर ही शहरे पूर्णत: हागणदारीमुक्त झाले आहेत.

## सर्वांसाठी घरे

प्रधानमंत्री आवास योजनेत २३८२ ऑनलाइन प्रस्ताव मंजूर करण्यात आले असून रमाई आवास योजनेत ३५९ घरकुले सुरू तर ३१९ पूर्ण. शबरी घरकुल योजनेंतर्गत ८५९ घरकुलांना ग्रामसभांची मान्यता देण्यात आली.

## गतिमान प्रशासन

सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी. ग्रामविकास आणि महसूल विभागाने १०० टक्के अर्ज गेल्या वर्षभरात निकाली. आपले सरकार पोर्टलवर सर्व अर्जांवर अंतिम निर्णय. सातही तालुक्यांत ३२ वर्क स्टेशन्स कार्यरत. ग्रामीण भागातील महिलांची १ लाख १४ हजार ७६ डिजिटल लॉकर्स. ‘आपले सरकार’ पोर्टलवर २६ जानेवारी २०१५ पासूनची २३२० प्रकरणांपैकी २२१० प्रकरणे निकाली काढली आहेत.

सेवा हक्क हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात झाली असून २ लाख ५६ हजार ६१२ सेवा दिल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेत २१ हजार शेतकऱ्यांकडून अर्ज भरून घेतले.

## शेतकरी आठवडी बाजारांचे यश

ठाणे जिल्ह्यात श्री संत शिरोमणी सावता माळी शेतकरी आठवडा बाजारांमध्ये शेतकरी गटांमार्फत आत्तापर्यंत २ हजार ९६० मेट्रीक टन फळे व भाजीपाल्यांची मालाची विक्री. आत्तापर्यंत १८ आठवडी बाजार सुरू. १०० पेक्षा जास्त शेतकरी गट सहभागी.

## पेसा ग्रामपंचायती

जिल्ह्यातील ३६५ ग्रामपंचायतींपैकी २०४ या पेसा ग्रामपंचायती आहेत. त्यात ४०१ महसूल गावे आणि ६९८ पाडे, वस्त्यांचा समावेश आहे. ५८३ पाडे-वस्त्यांनी पेसा गांव होण्यासाठी ठराव पारीत केले. त्यापैकी ९४ गावांना नुकतेच शासनाने पेसा गावांचा दर्जा दिला. त्यात शहापूर तालुक्यातील ७२ गांवे असून भिवंडीची २२ गावे आहेत.

## मुद्रा योजना

प्रधानमंत्री मुद्रा योजनेत उद्दिष्टापेक्षा जास्त म्हणजे सुमारे १ हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरण करून जिल्ह्याने राज्यात एक चांगली कामगिरी केली आहे. आजमितीस सुमारे २८ हजार शेतकऱ्यांना १८६ कोटी रुपये पीक कर्ज वाटप केले आहे.

## औजारे बँक: क्रांतिकारी बदल

जिल्हा परिषदेने औजारे बँक ही नावीन्यपूर्ण योजना आणली असून यामध्ये भात लावणी ते काढणी पर्यंतची कामे विविध यंत्राद्वारे केली

जातात. ग्रामीण भागातील नोंदणीकृत महिला बचत गटांचे ग्रामसंघ निवडून त्यांना जास्तीत जास्त ७ लाख रुपयांपर्यंत अनुदान देऊन औजारे उपलब्ध करून दिली जातात.

## झेप स्मार्ट सिटीकडे...




सिडकोने विकसित केलेले नवी मुंबई हे महानगर महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाचे केंद्र ठरले आहे. नवी मुंबई परिसरातील आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटीची क्षमता दुप्पटीकरण, नैना प्रकल्प, मेट्रो, किफायतशीर गृहनिर्माण हे प्रकल्प अर्थिक विकासाचे मुख्य स्त्रोत ठरणार आहेत. आगामी चार-पाच वर्षामध्ये या भागातील पायाभूत सुविधांवर ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक होणार असून सर्व क्षेत्रात एकूण ८.७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. या पार्श्वभूमीवर व्यापारवृद्धी आणि निर्मितीच्या दृष्टीने गुंतवणूकदारांमध्ये नवी मुंबईचे जबरदस्त आकर्षण निर्माण झाले आहे.

### स्मार्ट सिटी

सिडको प्रशासनाने दक्षिण नवी मुंबई मधील ब्राऊन फिल्ड क्षेत्रातील सात शहरांमध्ये स्मार्ट सिटीची संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ७७१० हेक्टर क्षेत्रफळाच्या या प्रकल्पाला सिडको नवी मुंबई दक्षिण स्मार्ट सिटी असे नाव देण्यात आले आहे. यात किफायतशीर घरे, मेट्रो, पायाभूत सुविधा आणि पोर्ट सिटी प्रकल्पाचा समावेश आहे.

### पुष्पक नगर प्रकल्प

दक्षिण नवी मुंबईतील नियोजित विमानतळाजवळील पुष्पक नगर येथे 'ग्रीन फिल्ड स्मार्ट सिटी प्रकल्प' राबवण्यात येणार आहे. स्मार्ट सिटीमध्ये अंतर्भाव करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या सेवा-सुविधांनी पुष्पक नगर समृद्ध असणार आहे. पुष्पक नगर प्रकल्पावर ९४१ कोटी रुपये खर्च होणार असून डिसेंबर २०१८ मध्ये भारतातील पहिली स्मार्ट सिटी अस्तित्वात येईल असे नियोजन करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला लवकरच सुरुवात होईल.

**- अनिरुद्ध अष्टपुत्रे**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

# सेवा आणि सुविधा

**रायगड हा औद्योगिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा असून या जिल्ह्यात त्या दृष्टीने पायाभूत सुविधा विकासासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. केंद्र शासनाची या प्रयत्नांना भक्कम साथ मिळत आहे. यात रस्त्यांचे जाळे भक्कम करणे, जलमार्गांचे बळकटीकरण करणे, नद्यांवरील पुलांची निर्मिती करणे अशा अनेक कामांचा समावेश आहे.**

किल्ले रायगडच्या विकासासाठी ६०६ कोटी रुपयांच्या विकास आराखडा मंजूर केला आहे. या आराखड्यानुसार भारतीय पुरातत्त्व विभागाच्या पर्यवेक्षणाखाली १२४.१५ कोटी रुपयांची कामे करण्यात येणार आहेत. पाचाड येथील राजमाता जिजाऊ माँसाहेब समाधी वाडा परिसर, रायगड किल्ला परिसरातील पर्यटन विकास, रायगड किल्ला परिसरातील ७ कि.मी. परिघातील २१ गावे व त्याअंतर्गत वाड्यांमध्ये मुलभूत सुविधा विकास करण्यात येत आहे. या कामांमुळे स्थानिक रोजगाराच्या संधी विपुल प्रमाणात उपलब्ध होणार आहेत. रायगडापर्यंत पोहोचणे सुलभ व्हावे यासाठी महाड ते पाचाड हा रस्ता तीन पदरी विकसित केला जाणार आहे. त्यासाठी महाड ते रायगड किल्ला हा राज्यमार्गही केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून मान्यता दिली आहे.

### रस्ते विकास

मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गावरील वडखळ ते अलिबाग हा (२६ कि.मी) रस्ताही राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला असून त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरू करण्यात येत आहे. या रस्त्यासाठी भूसंपादनाचे काम सुरू झाले आहे. या महामार्गामुळे जिल्ह्याचे मुख्यालय असणारे अलिबाग शहराकडे होणारे दळणवळण सोपे आणि सुलभ होणार आहे. पळास्पे ते इंदापूर या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणही मे २०१८ पर्यंत पूर्ण होईल. इंदापूर ते कशेडी या भागात करावयाच्या रस्त्यासाठी २३१ हेक्टर पैकी २१८ हेक्टर क्षेत्रावर भूसंपादन पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०१८ पर्यंत हा टप्पा पूर्ण करण्याचे नियोजन आहे. वाकण ते खोपोली हा ४१ कि.मी चा मार्गही तीनपदरी करण्याचे काम सुरू करण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

बंदरांवरून होणाऱ्या अवजड वाहतुकीसाठी पनवेल ते उरण या ४४ कि.मी लांबीच्या रस्त्याचे सहा व आठपदरीकरण करण्यासाठीही भुसंपादनाची सुरुवात झाली आहे. पेण ते खोपोली या ३३ कि.मी च्या राज्यमार्गालाही केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वतः मान्यता मिळाली आहे. सागरमाला अंतर्गत रायगड जिल्ह्यातील धरमतल ते मुरुड व कुंडलिका ते रेवदंडा हे जलमार्ग प्रस्तावित आहेत.

शिवाय मांडवा ते मुंबई( भाऊचा धक्का) या जलवाहतूक मार्गासाठीही १६७ कोटी रुपयांची कामे सुरू आहेत. त्यामुळे मार्च २०१८ अखेर या मार्गावर वर्षभर जलवाहतूक सुरू राहील.

### सावित्री पुलाची विक्रमी वेळेत उभारणी



महाडपासून जवळच असलेल्या म्हणजे राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर कि.मी. १२९/४०० दरम्यान महाड-पोलादपूरला जोडणाऱ्या नांगलवाडी ते राजेवाडी दरम्यान असलेल्या सावित्री नदीच्या पात्रावर एक ब्रिटिशकालीन दगडी कमानी असलेला १९२८ साली बांधलेला साधारणत: १८० मीटर लांबीचा हा मोठा पूल होता. २ ऑगस्ट, २०१६ हा पूल वाहून मोठी दुर्घटना घडली. या ठिकाणी नवीन पूल उभारणे आवश्यक होते. जुन्या पुलाच्या जागी नवीन ३ पदरी पूल केवळ १६५ दिवसांत बांधून पूर्ण केला नव्हे तर वाहतुकीसाठी खुलाही केला.



**“ गेल्या तीन वर्षात रायगड जिल्ह्यातील दळणवळण सुविधांचे जाळे विकसित करण्यात शासनाच्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे. त्यात रस्ते, पूल बांधणी आणि ‘सागरमाला’अंतर्गत जलमार्ग विकसित करण्याला प्राधान्य दिले आहे. रस्त्यांच्या विकासासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे.**

**- प्रकाश महेता, पालकमंत्री, रायगड ”**




### सिंचन क्षमतेत वाढ

जलयुक्त शिवार योजना राज्यात सर्वत्रच उपयुक्त ठरत आहे. रायगड जिल्ह्यातही ही योजना उत्तम प्रकारे राबवली गेली. गेल्यावर्षी १४ तालुक्यातील ३८ गावांमध्ये ९१५ जलसंधारण उपचारांची कामे घेण्यात आली. या कामामुळे ३३९३ टीसीएम साठवण क्षमता निर्माण करू शकलो. त्यामुळे एकूण १२४० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. कृषी विभागाच्या मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत जून, २०१७ अखेर १५५ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. होतकरू तरुणांना, व्यावसायिकांना जिल्ह्यात मुद्रा बँक योजनेंतर्गत १७ हजार ७२२ लाभार्थ्यांना १७५ कोटी ७७ लक्ष रुपयांचे कर्ज उद्योग व्यवसायासाठी देण्यात आले आहे.

### क्रीडा सुविधांची उपलब्धता

अलिबाग येथे साडेबारा एकर जागेत बांधण्यात आलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाचे काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी संकुलातील सर्व सुविधा खेळाडू व नागरिकांसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. वृक्षलागवड अभियानात रायगड जिल्ह्यात जवळपास दीड लाख वृक्ष लागवड करून जिल्ह्याने १०५ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे.

### स्वच्छता अभियान

स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामीण भागात आज अखेर ९३ टक्के कुटुंब शौचालयाचा वापर करीत आहे. जिल्ह्यातील म्हसळा, तळा आणि उरण हे तालुके हागणदारीमुक्त झाले आहेत. जिल्ह्यातील ७९६ ग्रामपंचायतींपैकी ७३१ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. नागरी भागातही १० नगरपरिषद आणि ५ नगरपंचायती हागणदारीमुक्त घोषित झाल्या आहेत.

### सातबारा संगणकीकरण

डिजिटल इंडिया भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील ११ लाख ४० हजार १३२ सातबारा उताऱ्यांपैकी ११ लाख २० हजार ४०७ उतारे प्रमाणित करण्यात आले आहे. हे काम ९८.३० टक्के पूर्ण झाले आहे.

**- मिलिंद दुसाने**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग


केळवा बिच

पालघर सागरी, डोंगरी व नागरी भागाची पार्श्वभूमी लाभलेला हा जिल्हा असून आदिवासीबहूल आहे. पालघर, वसई व डहाणू या तालुक्यांना सागरी किनारा लाभला आहे. जव्हार, मोखाडा, तलासरी, विक्रमगड, वाडा हे तालुके डोंगरी भागात आहेत. या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे व प्रत्येक कुटुंबाने शौचालय बांधून त्याचा नियमित वापर करणे यासाठी जनजागृती करून, जिल्ह्यातील पाणी व स्वच्छता विभागाने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.

# स्वच्छतेतून समृद्धीकडे...

पालघर जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून नावारूपाला येण्यासाठी ठोस,आखीव नियोजन करण्यात येत आहे. या जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याकरिता जिल्हास्तरावर पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा व समुद्र किनाऱ्यांचा ठिकाणी पर्यटनदृष्ट्या विकास कामांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये केळवा बीच शिरगाव, चिंचाणी, पारनाका, अर्नाळा, बोर्डी, चिखले या समुद्र किनाऱ्याचा समावेश करण्यात आला आहे.

दिल्ली हाट धर्तीवर राज्यातील आदिवासी कालासंस्कृतीच्या प्रसिद्धीसाठी पालघर जिल्ह्यात मनोर येथे वारली आदिवासी हाट बांधणे, आदिवासी कारागिरांच्या वस्तुंना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी व आदिवासी संस्कृतीची ओळख सर्व घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी मनोर येथे वारली आदिवासी हाट उभारण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे आदिवासींची जिवनपद्धती, त्यांचे पारंपारिक उत्सव, हस्तकलेच्या वस्तु, चित्रे इ. चे दर्शन होणार आहे. पालघर जिल्हा निर्मिती होऊन तीन वर्ष पूर्ण झाली आहेत. या तीन वर्षाच्या कालावधीत जिल्हा विकासाच्या दृष्टीने विविध विकासकामे सुरू आहेत.



**“ पालघर जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील बालमृत्यू व कुपोषण कमी करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाद्वारे उपाययोजना करण्यात येत आहेत. कुपोषण निर्मूलनावर भर देण्यासाठी व्यापक नियोजन केले जात आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय स्वतंत्रपणे स्थापन झाले आहे. नवनिर्मित जिल्हा असला तरीसुद्धा महत्त्वाच्या निर्देशाकांबाबत; उद्दिष्टपूर्तीच्या क्रमवारीत राज्यात पहिल्या दहा जिल्ह्यांमध्ये आहे. २०१६-१७ मध्ये प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांतर्गत महत्त्वाच्या निर्देशांकात १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करण्यात यश मिळाले आहे.**

**- विष्णू सवरा, पालकमंत्री, पालघर ”**

## नवे पर्व

पालघर जिल्ह्याचे सुसज्ज व आदर्श असे प्रशासकीय मुख्यालय नजीकच्या काळात निर्माण केले जाणार आहे. जिल्हा मुख्यालयाचे काम २०१९ पर्यंत पूर्ण करणे अभिप्रेत आहे. या सर्व कामांच्या अनुषंगाने काही कोटी रुपयांची उलाढाल पालघरच्या क्षेत्रात होणार आहे. यातून विकासाच्या अनेक संधी निर्माण होणार आहेत. सिडकोच्या माध्यमातून पालघर शहराच्या नियोजनबद्ध विकासावरही भर दिला जाणार आहे.

जिल्ह्यात राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत सर्व गावांचे सातबारा संगणकीकरण झालेले असून संगणकीकृत सातबारा हस्तलिखीत सातबाराशी तंतोतंत जुळवण्याचे काम पूर्णत्वाकडे आले आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये चावडी वाचनाचा कार्यक्रम सुरू असून ८६ टक्के गावांमध्ये पूर्ण झाले आहे. त्यामुळे जनतेला नजीकच्या काळामध्ये ऑनलाइन सातबारा सुलभरीत्या मिळणे शक्य झाले आहे. जिल्ह्यात शासनाच्या विविध विभागाच्या सेवा प्रत्येक महसूल मंडळ मुख्यालयी आपले सरकार सेवा केंद्रामध्ये कियॉस्क मशिनच्या माध्यमातून उपलब्ध करून देणारा पालघर हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे.

## सर्वांना घरे

पालघर जिल्ह्यातील जवळपास १० हजार लाभार्थ्यांना विविध योजनाच्या माध्यमातून घरे बांधून देण्यात आली आहेत. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ७७५७, शबरी १४६, रमाई १३०, इतके घरांचे काम पूर्ण करण्यात आले आहे. इंदिरा आवास योजनेचे काम सुरू असून ६००० घरे, २०१५-२०१६मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.




## दर्जेदार आरोग्य केंद्रे

जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच इतर आरोग्य संस्थाना अधिक लोकाभिमुख करून गुणवत्तेत सुधारणा होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले आहे. जिल्ह्यात मार्च २०१७ अखेर १० प्राथमिक आरोग्य केंद्राना ISO ९००१:२०१५ प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. यात जव्हार तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र जामसर, साकुर, नांदगाव, मोखाडा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र खोडाळा, डहाणू तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आशागड, घोलवड, चिंचणी व तलासरी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र उधवा, वसा व आमगाव यांचा समावेश आहे. पालघर जिल्ह्यातील ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रात संगणकाचा वापर करून रुग्णाची प्रोफाईल जतन करून ट्राकिंग ( पाठपुरावा ) करणे सोईचे व्हावे याकरिता 'पेपरलेस बारकोड व टोकन सिस्टिम' कार्यान्वित करण्यात येत आहेत. पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २१९८ शाळांपैकी जवळपास १७०० शाळा डिजिटल शाळा झाल्या आहेत.

## स्वच्छता अभियानात अव्वल

पालघर जिल्ह्यात २०१२ च्या सर्वेक्षणानुसार वैयक्तिक शौचालय नसणाऱ्या कुटुंबांची संख्या १,०४,८५६ इतकी होती. सन २०१६-२०१७ मध्ये जिल्हा हागणदारीमुक्त करण्याचा निर्णय पाणी व स्वच्छता विभागाने आव्हान म्हणून स्वीकारला. यासाठी विविध उपाययोजना करण्याचे नियोजन केले. जिल्हा परिषद पालघर मधील सर्व विभागांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालय बांधकामाचा वेग वाढविण्यासाठी सामजिक संस्था, शासनाचे विविध विभाग यांचे सहकार्य घेण्यात आले. जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ठिकाणी स्वच्छतेसाठी जनजागृती करण्यात आली. त्यामुळे स्वच्छ भारत अभियानात पालघर जिल्ह्याने चांगली कामगिरी केली आहे. पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी जव्हार, मोखाडा, तलासरी व वाडा हे चार तालुके १०० टक्के हागणदारीमुक्त झाले आहेत. वसई ९९ टक्के, पालघर ९३ टक्के, डहाणू ८४ टक्के, विक्रमगड ८१ टक्के याप्रमाणे तालुके हागणदारीमुक्त झालेले आहेत. जिल्ह्यातील ४७३ पैकी ४६५ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या असून लवकरच पालघर जिल्हा निर्मल जिल्हा म्हणून घोषित करण्यात येईल.



**जलयुक्त शिवार अभियानाची पालघर जिल्ह्यात चांगली फलश्रुती पाहावयास मिळते. या अभियानांतर्गत २०१५-२०१६ साली पन्नास गावातील २१०७ कामे पूर्ण झाली आहेत. त्यात एकूण ३२०७ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला आहे. २०१६-२०१७ तीस गावातील ६३० कामे पूर्ण झाली असून त्यात एकूण १७७४ टीसीएम पाणीसाठी निर्माण झाला आहे.**

## जनजागृती

सप्टेंबर महिन्यात 'कुटुंबस्तर संवाद अभियान' या कार्यक्रमांतर्गत डहाणू तालुक्यातील आशागड येथे एक लक्ष गृहभेटी, पालघर जिल्ह्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये जिल्हाभर शौचालय नसणाऱ्या एक लक्ष कुटुंबांना भेटी देऊन शौचालयाचे महत्त्व पटवून दिले व शौचालय बांधण्यास प्रवृत्त करण्यात आले. २ ऑक्टोबर २०१६ रोजी महास्वच्छता अभियान राबवले. या वेळी लोकप्रतिनिधी, सर्व विभाग प्रमुख, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील तज्ज्ञ/सल्लागार यांनी सहभाग घेतला. पालघर जिल्ह्यात संत गाडगे बाबा स्वच्छता दिंडीचे मालजीपाडा, नागले, पोमण, कळंब येथे आयोजन केले होते. या जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जागतिक हातधुवा दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या माहिमेंतर्गत डहाणू तालूक्यातील कासा येथे गवंडी प्रशिक्षण घेण्यात आले.

जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील तज्ञ/सल्लागार यांनी व युनिसेफ यांच्या मदतीने जव्हार तालुक्यात २९ दिवस विशेष अभियान राबवून २० फेब्रुवारी २०१७ रोजी जव्हार तालुका हागणदारीमुक्त करण्यात आला. या तालुक्यातील स्वच्छतादूत सुशिला खुरकुटे यांनी शौचालयाचे महत्त्व जानून स्वत: आपल्या घराच्या बाजूला दोन शोषखड्डे खोदले व शौचालय बांधले. याची दखल घेऊन ८ मार्च २०१६ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या दिवशी गांधीनगर (गुजरात) येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते श्रीमती खुरकुटे यांना गौरवण्यात आले.

## विशेष अभियान

विक्रमगड तालुक्यात मार्च २०१७ रोजी हागणदारी मुक्तीसाठी विशेष अभियान राबवण्यात आले. जिल्ह्यातील औद्योगिक कंपन्या व विविध सामाजिक संघटनाची मदत घेऊन कार्यक्रम राबवण्यात आला. जिल्हा परिषद पालघर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने 'पालघर सरस' कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमात हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतीचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाने सर्व तालुक्यातील गट समन्वयक/समूह समन्वयक, ग्रामसेवक यांना मोबाइल ॲपचे प्रशिक्षण देण्यात आले.

**- दत्तात्रय कोकरे**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, पालघर






**रत्नागिरी जिल्ह्यातील हवामान, फळझाडे, भाजीपाला आणि मसाला पिकांच्या उत्पादनास अत्यंत अनुकूल आहे. या पिकांचे क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनपुरस्कृत वेगवेगळ्या योजना राबवण्यात येतात. जिल्ह्यात फलोत्पादनाखालील एकूण क्षेत्र १,६४,४६८ हेक्टर आहे. त्यापैकी आंबा फळपिकाखाली ६५,५६१ हेक्टर काजू ९२, ४५५ हेक्टर, नारळ ५,१९९ हेक्टर चिकू १,१२९ हेक्टर व इतर फळपिकाखालील १,१२६ हेक्टर क्षेत्र आहे.**

# फळबाग फुलली...

पूर्वी रत्नागिरी जिल्ह्यात फळबाग लागवडीखालील क्षेत्र ३८,६४४ हे होते रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून २०१६-१७ अखेर पर्यंत जिल्ह्यात १,२७,१६३ हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आलेली असून एकूण १,५१,२१७ शेतकऱ्यांना योजनेचा लाभ झाले आहे. या योजनेंतर्गत एकूण रुपये १२८४९.५२ लाख अनुदान वाटप करण्यात आले आहे.

आंबा, काजू, नारळ, सुपारी या पिकावरील सर्व कीड व रोग नियंत्रणासाठी खरेदी केलेल्या किटनाशकावर ५० टक्के अनुदान देय आहे.

## रोपवाटिकेचे बळकटीकरण

जिल्ह्यातील ७ शासकीय फळ रोपवाटिका अस्तित्वात आहेत. शासकीय रोपवाटीकांचे बळकटीकरण करणे



**“ जिल्ह्यातील फळबाग लागवडीसाठी कृषी हवामान, रोजगार निर्मिती व उच्च मूल्यांकित पीक रचना या सर्व बाबींचा ठळकपणे विचार करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती साध्य करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पडीक जमिनीचा विकास करण्यात येत असून या हेतूने रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग लागवड योजना जिल्ह्यात प्रभावीरीत्या राबवण्यात येत आहे.**

**– रवींद्र वायकर, पालकमंत्री, रत्नागिरी ”**

योजनेंतर्गत रोपवाटिकांवरील कलमा व रोपांच्या उत्पादनात गुणात्मक व संख्यात्मक वाढ करण्याच्या दृष्टीने पायाभूत, सिंचन, तांत्रिक व यांत्रिक सुविधा या बाबींचा विकास करण्यात येतो. फलोत्पादन पिकांवरील रोगकिडींचा सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप आंबा) राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यामध्ये २८ कीड सर्वेक्षकांमार्फत निवडक गावांमध्ये निवडक आंबा बागांचे दर आठवड्याला सर्व्हेक्षण करून सल्ला देणे. तसेच ५० टक्के अनुदानावर औषधांचा पुरवठा करण्यात येतो. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आंबा व काजू या दोन महत्त्वाच्या फळपिकासाठी विमा योजना लागू करण्यात आली आहे. २०१५-१६ मध्ये ३३९१ शेतकऱ्यासाठी ३३४५.५३ हे. क्षेत्रासाठी विमा उतरवला असून विमाकंपनीकडून ३०१२ शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम म्हणून रुपये ११.९६ लाख वितरित करण्यात आले आहेत.



**रामदास कदम**
पर्यावरण मंत्री

## वृक्षलागवड

वृक्षलागवड मोहिमेत २०१६ साली निर्धारीत उद्दिष्टांच्या तुलनेत जिल्ह्यात १२५ टक्के वृक्षलागवड झाली. २०१७ सालातील या मोहिमेसाठी २.४२ लाख रोप लागवडीचे निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करण्यात आले.

**– राहुल भालेराव**
माहिती सहायक, रत्नागिरी




**राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईच्या पायाभूत विकास आणि सुरक्षेकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे गेल्या तीन वर्षात मुंबईच्या पायाभूत सुविधांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. मेट्रो-मोनोरेल सारख्या प्रकल्पांनी गती घेतली आहे. कोस्टल रोडमधील सर्व अडथळे दूर झाले आहेत. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईचा स्मार्ट आणि गतिमान विकास झाला पाहिजे या दृष्टीने गेल्या ३ वर्षात अनेक विकास कामे कार्यान्वित करण्यात आली आहेत.**

मुंबई हे महाराष्ट्राचीच नाही तर देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन आहे. त्यामुळे मुंबईकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहणे आवश्यक होते. २०१४ ला राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईच्या पायाभूत विकासाकडे आणि तिच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळेच गेल्या तीन वर्षात मुंबईच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ होत आहे. मेट्रो-मोनोरेल सारख्या प्रकल्पांनी गती घेतली आहे तर कोस्टल रोडमधील सर्व अडथळे दूर झाले आहेत. मुंबईचा विकास हा मुंबईमध्ये असलेल्या अंतर्गत ऊर्जेचा वापर करून झाला पाहिजे हे धोरण निश्चित करून मुख्यमंत्र्यांनी मुंबईच्या थेट प्रश्नांच्या सोडवणुकीवर भर दिला आहे. आर्थिक विकासाचे केंद्र बनलेल्या मुंबईमध्ये सुरक्षा, सार्वजनिक वाहतूक, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी नवीन रस्त्यांची निर्मिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे याकडे विशेष लक्ष देऊन कालबद्ध कार्यक्रम ठरवण्यात आला. त्या दृष्टीने कामे सुरू झाली आहेत. येत्या काही वर्षांत मुंबईचा चेहरामोहरा बदलेल यात शंका नाही.

### सार्वजनिक वाय-फाय सुविधा

मुंबईकरांना सार्वजनिक वायफाय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'आपले सरकार मुंबई वाय-फाय', हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. शहरात १२०० हॉटस्पॉट्स कार्यान्वित करण्यात आले आहेत. अतिशय कमी वेळेत सुरू झालेल्या हा प्रकल्प संपूर्ण देशातील एकमेव प्रकल्प आहे.

वापरकर्ते नागरिक आणि 'वायफाय लोकेशन्स'ची संख्या लक्षात घेता जगातील सर्वांत मोठ्या प्रकल्पांपैकी तो एक आहे. 'मुंबई सिटी सर्व्हेलन्स प्रोजेक्ट'साठी उभारण्यात आलेल्या सुविधांचा वापर करून ही सुविधा उपलब्ध केली आहे. वीज पुरवठा व कनेक्टिव्हिटीसह २००० सर्व्हेलन्स पोल शहरात उभारले आहेत. या प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १९४ कोटींचा निधी दिला आहे. या सुविधेमुळे डिजिटल पेमेंट या शासनाच्या महत्त्वाकांक्षी धोरणाला बळकटी मिळाली आहे.



## सीसीटीव्ही



सीसीटीव्ही या प्रकल्पासाठी ९४९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याबरोबरच ५ मोबाइल व्हिडिओ सर्व्हेलन्स व्हॅनही उपलब्ध करून देण्यात आले आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून गुन्हेगारी कृत्य, वाहतूक नियमांचे उल्लंघन या बाबींवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना ई-चलन पाठवण्याची सुविधादेखील विकसित करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे पोलिसांवरील ताण कमी होऊन, त्यांच्या कार्यशक्तीचा वापर दुसऱ्या कामांसाठी करणे शक्य झाले आहे.

## परवडणारी घरे

मुंबईतील चाकरमान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी गतीने करतानाच मुंबईतील विविध प्रकल्पांच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांचा प्रश्न सोडवण्याकडे लक्ष देण्यात आले आहे.

म्हाडा वसाहतींच्या विकासाचा प्रश्न ६ वर्षांपासून रखडला होता. त्याच्या पुनर्विकासाचा प्रश्न या शासनाने निकाली काढला असून २ हजार चौरस मीटरपर्यंतच्या भूखंडावरील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासामध्ये ३ चटई क्षेत्र निर्देशांक अधिमूल्याच्या सुविधेसह देताना



**“ मुंबई शहराची सुरक्षा हा सरकारचा प्राधान्याचा विषय असून विशेषत: महिला, बालके, ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणेच्या सक्षमीकरणाबरोबरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देण्यात आला आहे. त्या दृष्टीने मुंबई शहरांमध्ये सीसीटीव्हीचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. संपूर्ण मुंबई शहर सीसीटीव्हीच्या देखरेखेखाली आणण्यासाठी १५१० ठिकाणी एकूण ४७१७ कॅमेरे सुरू करण्याची योजना असून, बहुतांश काम पूर्ण झाले आहे.**


**– सुभाष देसाई, पालकमंत्री, मुंबई शहर ”**



**“ विकासाची गती रस्ते निर्धारित करीत असतात हे ओळखून, त्यांच्या विकासाकडे शासनाने विशेष लक्ष दिले आहे. आवश्यक त्या नवीन रस्त्यांच्या निर्मितीबरोबरच सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांमधील अडथळे दूर करून प्रवासाचा वेग वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. त्या दृष्टीने उड्डाणपूल आणि रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात येत आहे. शहरातील काही भागात वाहतुकीची कोंडी नित्याचीच होत असते, असे भाग शोधून तेथे या उपाययोजना करण्यात येत आहेत.**

**– विनोद तावडे, पालकमंत्री, मुंबई उपनगर ”**

त्यातील म्हाडाला द्यावयाच्या हाऊसिंग स्टॉकची जाचक अटही वगळली आहे. २ ते ४ हजार चौरस मीटर अथवा त्यावरील क्षेत्रफळाच्या भूखंडावरील इमारतीच्या पुनर्विकासासाठी ४ चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करताना ३ पर्यंत अधिमूल्यावर आधारित व उर्वरित १



चटईक्षेत्र निर्देशांक म्हाडाला परडवणारी घरे उपलब्ध करून देण्याकरीता वापरण्यात येणार आहे.

याबरोबरच मुंबई उपनगरातील भाडेकरू व्याप्त मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने नियम ३३ (७) (अ) चा समावेश करण्यासंदर्भात सूचना दिल्या असून, या इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## महारेरा

केंद्र शासनाने मंजूर केलेल्या स्थावर संपदा (विनियम व विकास) अधिनियम, २०१६ चा मूळ उद्देश ग्राहक व विकासक यांच्यामधील व्यवहारात पारदर्शकता आणणे हा आहे. राज्य शासनानेही महारेरा

कायदा राज्यात लागू करून घर खरेदी करणाऱ्या सर्वसामान्य माणसांची लूट किंवा फसवणूक होऊ नये याची काळजी घेतली आहे.

## सागरी मार्ग

नरिमन पॉइंट ते कांदिवलीदरम्यानच्या सागरी किनारा मार्गाच्या (कोस्टल रोड) पूर्ण प्रकल्पाला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली आहे. सकाळी आणि संध्याकाळच्या सुमारास दक्षिण मुंबईतून पश्चिम उपनगरांमध्ये जाण्यासाठी वाहनचालकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या ३५ किलोमीटर लांबीच्या सागरी मार्गामुळे हा प्रवास सुखकर होणार आहे. प्रिन्सेस स्ट्रीट ते कांदिवलीदरम्यान उभारण्यात येणाऱ्या सागरी किनारा मार्ग पश्चिम आणि उत्तर अशा दोन टप्प्यांमध्ये विभागण्यात आला आहे.



**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री

पहिल्या टप्प्यात दक्षिण मुंबईमधील प्रिन्सेस स्ट्रीट ते वरळीदरम्यान ९.९८ कि.मी. लांबीचा मार्ग उभारण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात समुद्रामध्ये ८९ हेक्टर क्षेत्रात भरणी करण्यात येणार आहे. या टप्प्यासाठी ५३०३ कोटी रुपये खर्च येणार आहे. या मार्गामुळे प्रवासाची वेळ ७० टक्क्यांनी कमी होईल आणि ३४ टक्के इंधनाची बचत होईल, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्था



**डॉ. दीपक सावंत**
सार्वजनिक आरोग्य मंत्री

मुंबईत आजच्या क्षणी उपनगरीय रेल्वेशिवाय दुसरी कुठलीही सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही. रस्त्यावरील प्रचंड वाहतुकीमुळे बेस्टच्या बसेस वेळेत पोहोचू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या वाहतूक प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी मेट्रोशिवाय दुसरा अधिक चांगला पर्याय उपलब्ध नव्हता. प्रवासी वाहून नेण्याची मेट्रोची क्षमता, वेग आणि आरामशीर प्रवास पाहता मुंबईकरांसाठी मेट्रोची निकड राज्य सरकारने ओळखली आणि विविध मेट्रो मार्गांचा पाठपुरावा करून आज मुंबईमध्ये विविध प्रकल्प राबवले जात आहेत.

दहिसर (पश्चिम) ते डि.एन.नगर मेट्रो कॉरिडॉर २ अ (पहिला टप्पा) हा १८.५ किलोमीटर, डि.एन.नगर ते बी.के.सी. ते मानखुर्द मेट्रो कॉरिडॉर २ ब (दुसरा टप्पा) हा २३.५ किलोमीटर, कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो कॉरिडॉर ३ हा ३३.५ किलोमीटर, वडाळा – घाटकोपर – मुलुंड – ठाणे – कासारवडली मेट्रो कॉरिडॉर ४ हा ३३.५ किलोमीटर आणि अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) मेट्रो कॉरिडॉर ७ हा १८ किलोमीटर लांबीचा मेट्रो प्रकल्प होत आहे. या पाच प्रकल्पांची एकूण लांबी सुमारे १२५ किलोमीटर इतकी आहे. त्यामध्ये एकूण ११४ स्थानकांचा समावेश असणार आहे. त्यातून दररोज सरासरी ५० लाख नागरिक प्रवास करू शकतील, इतकी त्याची क्षमता आहे. या पाच प्रकल्पांची मिळून एकूण किंमत सुमारे ६१ हजार २८९ कोटी रुपये इतकी असणार आहे. हे सर्व प्रकल्प एकमेकांशी जोडलेले असतील आणि मोनो ट्रेन तसेच उपनगरीय रेल्वे यांच्याशी देखील ते जोडलेले असतील. यामुळे मुंबईकरांना कोणत्याही टोकापासून कोणत्याही टोकापर्यंत, सहज, सुखकर आणि सुरक्षित, सर्वात महत्त्वाचे म्हणजे जलद प्रवास करणे शक्य होणार आहे. या प्रकल्पांच्या कामांमुळे एकूण ५० हजार व्यक्ती क्षमतेचा रोजगार निर्माण होणार आहे. उपनगरीय रेल्वे सेवेमध्ये सध्या रूळ ओलांडण्यामुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटतील. त्याचबरोबर पनगरीय रेल्वे प्रवासामध्ये होणारी गर्दी सुमारे ३५ ते ४० टक्क्यांनी घटेल. त्यामुळे या रेल्वेचा प्रवास सुखकर होईल. सर्व प्रवासी मार्गांमध्ये सुमारे ३० ते ५० मिनिटे वेळेची बचत होणार आहे. दररोज सुमारे १० लाख लिटर इंधनाची बचत होणार आहे. त्यासोबत ध्वनिप्रदूषण आणि हवेचे प्रदूषणदेखील लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.




## मुंबई पोरबंदर प्रकल्प

मुंबई पोरबंदर प्रकल्पामुळे शहरामध्ये येण्या-जाणाऱ्यांचा प्रवास सुखकर होण्यास मदत मिळणार आहे. २२ कि.मी. लांब आणि २७ मीटर रूंद हा सागरी सेतू शिवडीपासून चिर्ले मार्गे राष्ट्रीय महामार्ग ४ बी ला जाऊन मिळेल. त्यामुळे वाहतुकीच्या समस्या कमी होण्याबरोबरच संपूर्ण रायगड जिल्हा आणि आसपासचा परिसर आर्थिकदृष्ट्या विकसित होण्यास मदत मिळणार आहे. मुंबई पोर्ट ट्रस्ट, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचा प्रवासही या समुद्र सेतुमुळे सहज शक्य होईल. या जोड रस्त्यामुळे ठाणे-नाशिक, नवी मुंबई, पनवेल-पुणे आणि पुढे दक्षिण भारतापर्यंत जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. त्यावर जाण्या-येण्यासाठी प्रत्येकी तीन मार्गिका असणार आहेत. या जोड रस्त्यावर शिवडी मड फ्लॅट्सजवळ ध्वनी प्रदूषण प्रतिबंधक उपकरणे उभारली जाणार आहेत. बीएआरसी नजीक दृष्य प्रतिबंधक उपकरणे उभारली जाणार आहेत.

या बरोबरच विरारपासून अलिबागपर्यंत तब्बल १२६ कि.मी. लांबीचा विविधोपयोगी आणि विविधमार्गी रस्ता बांधण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठरवले आहे



**प्रकाश महेता**
गृहनिर्माण मंत्री

## बाबासाहेबांचे आंतरराष्ट्रीय स्मारक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी दादर

## शिवरायांचे आंतरराष्ट्रीय स्मारक

अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे भूमिपूजन व जलपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेच्या कल्याणाकरिता आपले जीवन समर्पित केले. त्यापासून सामान्यांना प्रेरणा मिळावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक मुंबईच्या अरबी समुद्रात उभारण्यात येत आहे. शिवरायांच्या पुतळ्याची उंची ११८.५० मीटर एवढी असणार आहे. शिवरायांचा पुतळा ब्रॉन्झ या मिश्र धातूपासून बनविला जाईल. मुंबईचे दमट हवामान लक्षात घेऊन मुद्दाम ब्रॉन्झची निवड करण्यात आली आहे. या स्मारकापासून शूरता आणि सुप्रशासनाची प्रेरणा मिळेल.





येथील इंदू मिलची जागा केंद्र सरकारने राज्य सरकारकडे हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साडेतीनशे फूट उंचीच्या स्मारक उभारणीसाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. या स्मारकाचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले आहे.



**विद्या ठाकूर**
महिला व बालविकास राज्यमंत्री

## चित्रनगरीत नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स

केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयातर्फे मुंबईत उभारण्यात येणाऱ्या नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट, गेमिंग ॲंड कॉमिक या राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक केंद्रासाठी गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीतील २० एकर जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र सरकारने या केंद्राची उभारणी व्हावी यासाठी केंद्र शासनाकडे विनंती केली होती. या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची निर्मिती व्हावी या उद्देशाने पदवी, पदव्युत्तर शिक्षण, संशोधन आदी सुविधा देण्यासह उद्योजकांचा सहभाग घेण्यात येणार असून त्यासाठी राष्ट्रीय स्तरावर सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयातर्फे नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट, गेमिंग ॲंड कॉमिक हे शैक्षणिक केंद्र उभारण्यात येणार आहे.



**रविंद्र वायकर**
गृहनिर्माण राज्यमंत्री

## रस्ते

गेल्या काही वर्षात विकसित झालेल्या वांद्रे-कुर्ला संकुलास भेट देणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाने कलानगर जंक्शनवरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पहिल्या टप्प्यामध्ये २ उड्डाणपूल आणि धारावीपासून सी - लिंककडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम हाती घेतले आहे. वांद्रे-कुर्ला संकुल व सांताक्रुझ-चेंबूर जंक्शनवरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी दोन उन्नत मार्ग निर्माण करण्यात येत आहेत. अशा स्वरूपाच्या कामामुळे प्रवासाचा वेळ आणि इंधन वाचणार आहेच त्याबरोबरच ध्वनी आणि वायू प्रदूषणही कमी होण्यास मदत मिळणार आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात ४ उड्डाण पूल आणि ५ उन्नत मार्ग बांधण्यात येणार आहेत.

**- प्रसाद इनामदार**
लेखक हे मुक्त पत्रकार आहेत.

# सामाजिक न्यायाच्या दिशेने



रामदास आठवले
केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री

**केंद्र सरकारला २६ मे २०१७ ला ३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कार्यकाळामध्ये देशाला सामाजिक न्यायाच्या दिशेने घेऊन जाण्यामध्ये सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाचे विशेष योगदान आहे. या विभागाचे राज्यमंत्री म्हणून सामाजिक न्यायाची जाण असणाऱ्या आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी विचारांचा प्रचार व प्रसार करणारे रामदास आठवले यांनी ५ जुलै २०१७ रोजी मंत्रिपदाचे १ वर्ष पूर्ण केले. सामाजिक न्याय विभागाला लोकाभिमुख करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्न करत आहेत.**

रामदास आठवले यांनी मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी सामाजिक न्यायाच्या दिशेने केलेली वाटचाल वाखाणण्याजोगी आहे. अनेक वर्षापासून प्रलंबित असणाऱ्या निर्णयांना कार्यान्वित करून या विभागाला नवऊर्जा प्रदान करण्याचे काम त्यांनी केले. यादरम्यान केंद्र सरकार ने सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचलेली आहेत. नव्या धोरणानुसार केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाने कात टाकत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, दिव्यांग व्यक्ती तसेच सफाई कामगारांसह इतर दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या दृष्टीने 'स्टार्ट अप व स्टँड अप इंडिया' यासारख्या योजना गतिमान केल्या.

देशातील अनुसूचित जाती (एससी), इतर मागासवर्गीय (ओबीसी), वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग, व्यसनाधीन, ट्रान्सजेंडर व्यक्ती, विमुक्त जाती व भटक्या जमाती (डीएनटी) आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग (ईबीसी) तसेच निराश्रितांसाठी विभाग कार्यरत आहे. विभागातर्फे राबवल्या जाणाऱ्या योजना – ज्यामध्ये अनुसूचित जातीच्या मुलांसाठी मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती, अनुसूचित जाती (एसस्सी)च्या मुलांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, विशेष केंद्रीय सहायता (एससीए), अनुसूचित जाती (एससी )च्या मुलांसाठी राष्ट्रीय फेलोशिप, अनुसूचित जातींच्या पात्र उमेदवारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अनुसूचित वित्त विकास महामंडळ (एनएसएफडीसी) राष्ट्रीय मागासवर्ग वित्त विकास महामंडळ, राष्ट्रीय सफाई कामगार वित्त विकास महामंडळ यांच्यामार्फत कर्ज देण्याची सुविधा, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय फेलोशिप जी यूजीसीच्या माध्यमातून लागू करण्यात आलेली आहे.

## आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना सशक्त

श्री.आठवले यांनी समाजामध्ये जर समता प्रस्थापित करावयाची असेल तर आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे. यावर विशेष भर दिला आहे. देशभरामध्ये या संदर्भात त्यांनी कार्यालयीन बैठकांमधून या विषयाचा प्रचार आणि प्रसार करून, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेला सशक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनेंतर्गत नवविवाहित आंतरजातीय दाम्पत्याला २.५० लाख रुपये प्रोत्साहन राशी प्रदान केली जाते.

## शिष्यवृत्ती वाढीस प्राधान्य

अनुसूचित जातींच्या मुलांना आर्थिक टंचाईमुळे शिक्षण मध्येच सोडावे लागू नये म्हणून सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये अधिक वाढ करण्याला श्री.आठवले यांनी प्राधान्य दिले आहे. या संदर्भात राज्यांना शिष्यवृत्ती वाटपाबाबत त्यांनी निर्देश दिले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनात प्रत्येक विद्यार्थ्याला थेट त्याच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्ती जमा करण्याचा नवा निर्णय घेण्यात आल्याने देशातील लाखो विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होणार आहे. शेड्यूल कास्ट कंपोनंट प्लान अंतर्गत राज्यांना दिलेल्या निधीची या विभागातर्फे प्रथमच देखरेख (मॉनिटरिंग) करण्यात येत आहे. अनुसूचित जातींसाठी ऋण वृद्धी हमी योजना, दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जातीच्या संवर्गातील समुदायाच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आर्थिक विकास महामंडळ यांच्यामध्ये करार करण्यात आला.



दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण करण्यात आलेले आहे. देशभरात २.६८ कोटी लोकसंख्येत असलेल्या दिव्यांगासाठी या विभागात स्वतंत्र सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. १७ सप्टेंबर २०१६ रोजी गुजरातच्या नवसारी येथे आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे १०, ३३० कर्णबधिरांना कर्ण यंत्राचे मोफत वाटप करण्यात आले.

**– मनिष गवई**
सामाजिक न्याय मंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, नवी दिल्ली

स्मरण

# येथे कर माझे जुळती...

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात २५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी केली जाते, त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती...**



पंडित दीनदयाळ उपाध्यायांचे वडील भगवतीप्रसाद हे मथुरेच्या चंद्रभान जिल्ह्यातील नगला गावचे रहिवासी होते. त्यांच्या आईचे नाव रामप्यारी होते. त्यांचा जन्म राजस्थानातील जयपुरजवळच्या धानक्या गावी २५ सप्टेंबर १९१६ रोजी झाला. बालपणी त्यांना दिनानाथ म्हणत असत. दीनदयाळजी अडीच वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे देहावसान झाले. त्यामुळे त्यांच्या आईला मोठा धक्का बसला त्यातच त्यांचे निधन झाले. दीनदयाळ तेव्हा सात वर्षांचे होते. दीनदयाळजींचे आजोबा (आईचे वडील) चुन्नीलालजी यांनी दोन्ही नातवांना मामा राधारमण यांच्याकडे गंगापुरला पाठवून दिले.

दीनदयाळजींनी कोटाच्या एका विद्यालयात पाचव्या इयत्तेत प्रवेश घेतला. तिथे विद्यार्थी वसतिगृहात राहून सातवीपर्यंतच शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर शिक्षणासाठी ते राजगढला चुलत मामा नारायण शुक्ल यांच्याकडे गेले. १९३४ मध्ये दीनदयाळजींचे धाकटे भाऊ शिवदयाळ यांचा मृत्यू झाला. याच काळात त्यांच्या चुलत मामाची राजगढहून 'सिकर'ला बदली झाली. ते येथे दहावी इयत्तेत प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. संपूर्ण अजमेर बोर्डात त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे सिकरच्या महाराजांनी त्यांना सुवर्णपदक आणि २५० रुपयांचा पुरस्कार दिला. दहा रुपये मासिक शिष्यवृत्तीही दिली.

दीनदयाळजींनी पुढील शिक्षणासाठी पिलानीच्या बिर्ला महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे ते विद्यार्थी वसतिगृहात राहू लागले. १९३६ मध्ये इंटरमिजिएटच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. पुढच्या वर्षी-१९३७ मध्ये इंटरच्या त्यांनी परीक्षेत पूर्ण इंटरमिजिएट बोर्डात प्रथम क्रमांक मिळवला. घनश्यामदास बिर्लाजींनी त्यांना २५० रुपये, सुवर्णपदक आणि मासिक शिष्यवृत्तीच्या रूपाने दरमहा १० रुपयांचा पुरस्कार दिला.

मामा राधारमण यांनी दीनदयाळजींची प्रतिभा जाणून त्यांना कानपूरच्या सनातन धर्म महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला. तिथे दीनदयाळजींनी बी.ए. परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे त्यांना मासिक ३०० रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. दीनदयाळजींनी एक स्पर्धा परीक्षाही दिली. मुलाखतीनंतर निकालाची जी यादी जाहीर करण्यात आली, तिच्यात पहिल नाव दीनदयाळजींचे होते. परंतु ही नोकरी न करता त्यांनी प्रयागाला जाऊन सरकारी ट्रेनिंग कॉलेजात प्रवेश घेतला. तिथे शिकत असतानाच ते संघकार्यही करू लागले. १९४२ मध्ये ते एल.टी.ची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शिक्षण संपल्यानंतर ते भाऊराव देवरसांकडे गेले. आपले जीवन त्यांनी पूर्णकाळ संघसेवेला अर्पण केले. कानपुरमध्ये दीनदयाळजींचे वर्गमित्र बाळूजी महाशब्दे आणि सुंदरसिंह भंडारी यांच्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले. येथेच त्यांनी संघाच्या शाखांमध्ये जायला सुरुवात केली. संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांच्याशीही त्यांची भेट झाली.

## पत्रकार आणि लेखक

१९४७ मध्ये भाऊराव देवरसजींची प्रेरणा आणि त्यांच्याशी विचारविनिमय, केल्यानंतर दीनदयाळजींनी लखनऊ मध्ये 'राष्ट्रधर्म प्रकाशन'ची स्थापना केली. 'राष्ट्रधर्म' हे मासिक प्रकाशित आणि प्रसारित केले जाऊ लागले. त्यानंतर पांचजन्यचा अधिक विस्तार झाल्यानंतर दिल्लीहून त्याचे प्रकाशन केले जाऊ लागले, जे आजही चालू आहे. 'स्वदेश'ऐवजी 'तरुण भारत'चे प्रकाशन लखनऊहून होऊ लागले. आजही राष्ट्रधर्म राजेंद्रनगर, लखनऊ येथून प्रकाशित केले जाते. दीनदयाळ उपाध्याय साहित्यिक आणि जागरुक लेखक होते. सम्राट चंद्रगुप्त मौर्य आणि जगतगुरू शंकराचार्य या कादंबऱ्या त्यांनी लिहिलेल्या आहेत. अखंड भारत का? भारतीय अर्थनीतीची दिशा इ. पुस्तकात त्यांची विविध विषयातील लेखनक्षमता सहज जाणवते. त्यांचे संपूर्ण वाङ्मय १५ खंडात प्रकाशित झाले आहे. दीनदयाळ भारतीय संस्कृतीचे उपासक होते. लोकशाही आणि समाजवादात समन्वय त्यांना शक्य वाटत होता. जगातल्या प्रत्येक देशाशी ज्ञानाची देवाणघेवाण करण्यात आपल्याला कसलाही कमीपणा वाटता कामा नये. पण असे करताना आपण आपल्या जीवनमुल्यांचे स्मरण ठेवले पाहिजे, असे उपाध्यायजींचे म्हणणे होते.

## राजकारणात पदार्पण

१९५१ मध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रवादी राजकीय पक्षाची स्थापना केली. तेव्हा दीनदयाळांनी राजकारणात पाय ठेवला. १९५२ मध्ये कानपुरात जनसंघाचे पहिले अखिल भारतीय अधिवेशन झाले. सलग १५ वर्ष दीनदयाळजी भारतीय जनसंघाचे राष्ट्रीय महामंत्री होते. पूर्ण देशभर त्यांनी पक्षासाठी जनाधार उभा केला. त्याला एका शक्तिशाली संघटनेचे रूप दिले. डिसेंबर १९६७ मध्ये कालिकत येथे झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात दीनदयाळजींना भारतीय जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष करण्यात आले.

(संदर्भ : पं. दीनदयाळ उपाध्याय, जन्मशताब्दी वर्ष १९१६-२०१६)

**संकलन: गजानन पाटील**



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

DDU-GKY
Deen Dayal Upadhyaya Grameen Kaushalya Yojana
Empowering India • Powering the World

श्रीमती पंकजा मुंडे
मा. मंत्री-ग्रामविकास, महिला व बाल विकास

श्री. दादाजी भुसे
मा. राज्यमंत्री, ग्रामविकास

## सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना

- नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या महिला बचतगटांसाठी राज्य शासनाची योजना
- उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत सहभागी बचतगट योजनेचा लाभ घेवू शकतात
- प्रभावी शून्य टक्के व्याजदराने बचतगटांना कर्ज पुरवठा
- उपजीविका बळकट व वृध्दिंगत करण्यासाठी सहाय्यभूत योजना

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

- अभियान राबविण्यात येत असलेल्या गावांची संख्या : २४,६०७
- बचतगटांची संख्या : १,६६,९७९
- सहभागी कुटुंबांची संख्या : १८,३६,७६९
- ग्रामसंघांची संख्या : ३,९५६
- बँकेमार्फत बचतगटांना अर्थसहाय्य : ३,०४४ कोटी १६ लाख रू.
- दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेअंतर्गत ४,६७३ युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध
- RSETI योजनेअंतर्गत ७३,०३८ युवक-युवतींना स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध
- उपजीविकेचे स्त्रोत उपलब्ध झालेली कुटुंबे : २,३३,०००






किंमत
रु. ३००/-

## महाराष्ट्राविषयी अधिकृत वस्तुनिष्ठ एकत्रित माहितीचा वार्षिक संदर्भग्रंथ

## महाराष्ट्र वार्षिकी २०१६-२०१७

सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध

समृद्ध महाराष्ट्राचा आरसा

Visit - www.mahanews.gov.in | Follow Us : /MahaDGIPR | Like Us : /MahaDGIPR | Subscribe Us : /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th September 2017
Date of Publication : 10th of every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह